किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434- Licence No. 53
Licenced to post without prepayment

# अर्थ

## दिवाळी अंक

१९५८



# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक

पोस्ट बॉक्स नं. ३२ ] **लिमिटेड, सोलापूर.** [ तारेचा पत्ता–कृषीबँक

फोन नं. ११७. ( स्थापना : १९१८ ) हेड ऑफिस : सोलापूर.

शाखा :—पंढरपूर, कुर्डुवाडी, करमाळा, मंगळवेढा, अक्कलकोट, अकलूज, नातेपुते, सिद्धार्थ ( सोलापूर ), वैराग व बार्शी.

पे ऑफिसेस :–मोहोळ, मोडलिंब, माढा, सांगोला. अडत दुकानें :–अकलूज व नातेपुते.

१. खपलेलें शेअर भांडवल रु. ८,४९,८१०

२. रिझर्व्ह व इतर फंडस् रु. ११,४३,६५७

३. सर्व प्रकारच्या ठेवी रु. १,०६,१७,४८५

४. एकूण खेळतें भांडवल रु. १,५१,९५,२३८

५. सन १९५७–५८ सालचा नफा रु. १,२५,७२०

जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केंद्रस्थान असलेल्या, व ठेवीदार व संबंधित गिऱ्हाइकांच्या विश्वासास पात्र झालेल्या व सतत ४० वर्षे प्रगति-पथावर असलेल्या ह्या बँकेतून पुढील प्रकारचे व्यवहार केले जातात.

१. सर्व शेतकरीवर्गाला शेतकी सोसायट्यांमार्फत अल्प मुदतीचीं व लांब मुदतीचीं कर्जें दिलीं जातात.

२. सर्व शाखांमार्फत खतांचा पुरवठा केला जातो.

३. सर्व शाखांमार्फत बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

४. सोलापूर येथील हेड ऑफिसमध्यें मौल्यवान् जिनसा सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे.

५. ठेवीवरील व्याजाचे दर आकर्षक ठेवणेंत आले आहेत.

६. मोठ्या रकमा ठेवणारांनीं समक्ष ऑफिसांत येऊन चौकशी करावी. त्यांना सवलतीचा व्याजाचा दर दिला जातो.

के. के. परवत, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर.

गणपतराव धोंडिबा साठे,
चेअरमन.

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

फो. नं. ५३ ] मुख्य कचेरी :—हरभट रोड, सांगली. जि. द. सातारा. [ स्थापना १९३५

तारेचा पत्ता :—अर्बन बँक ] शाखा :—माधवनगर, जि. द. सातारा.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : | : | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : | : | रु. १,७८,७४० |
| रिझर्व्ह फंड | : | : | रु. १,४१,७८४ |
| इतर फंड्स | : | : | रु. १,८३,३८० |
| ठेवी | : | : | रु. ३७,२६,४९० |
| एकूण खेळतें भांडवल | : | : | रु. ४४,१३,५९० |

आमचें वैशिष्ट्य

★ मुख्य कचेरीमध्यें माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळणेची सोय आहे.

★ दैनिक कमींत कमी ४ आण्यांपासून घरोघरीं जाऊन बचतनिधि गोळा करणेची व्यवस्था आहे.

★ सरकारी पेन्शन बिलें, वर्षासनें व इतर बिलें वसुलीची व्यवस्था आहे.

★ बँकेची ज्युबिली तीन वर्षांनीं होणार असलेनें ज्युबिली सर्टिफिकेटस् काढणेची योजना लौकरच सुरू होणार आहे.

★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

श्री. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.,
चेअरमन.

श्री. ल. य. लागू, B. A., LL. B.,
मॅनेजर.

# दंपतीच्या संसारनौकेचें अचूक मार्गदर्शन

[ "मधुमालतीनु सौंदर्य" ह्या नांवानें श्री. वा. काळे ह्यांच्या "तुमचें स्थान कोणतें?" ह्या पुस्तकाचा प्रा. शशिन ओझाकृत गुजराती अनुवाद प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. त्याला डॉ. प्रेमलीलाबेन ठाकरसी, उपकुलपति, श्री. ना. दा. ठाकरसी विद्यापीठ, ह्यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंतील कांहीं भागाचा मराठी अनुवाद येथें दिला आहे. ]

श्री. श्रीपाद वामन काळे यांच्या 'तुमचें स्थान कोणतें?' या पुस्तकाचें प्रा. शशिन ओझा यांनीं केलेलें हें गुजराती भाषांतर आहे. यापूर्वीं श्री. काळे यांच्या 'कण आणि क्षण' व 'पुढें पाऊल' या दोन पुस्तकांचीं भाषांतरें 'सस्तु साहित्य' प्रकाशन संस्थेतर्फे 'सुखी जीवननी पगदंडी' आणि 'सदाचारने पगले' या नांवांखालीं प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकी 'सुखी जीवननी पगदंडी' या पुस्तकाची तर सात महिन्यांच्या अल्पावधींत दुसरी आवृत्ति प्रकाशित झाली. निबंधसंग्रहाच्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति इतक्या थोड्या अवधींत काढावी लागली ही गोष्ट लेखक, वाचक आणि अनुवादक यांना खरोखरच गौरवास्पद आहे. आपल्या समाजांत याप्रकारच्या वाङ्मयाची निर्माण झालेली आवड दाखविणारी ही गोष्ट मानल्यास, खरोखर ती कोणालाहि आनंददायक अशीच वाटेल.

"मधुमालतीनुं सौंदर्य" या पुस्तकाचें मूळ नांव 'तुमचें स्थान कोणतें?'–'तमारुं स्थान क्युं?'–असें आहे. आणि या सर्व विश्वांत आपलें स्थान कोठें हा प्रश्न खरोखरच विचारण्यासारखा असाच आहे. आपल्या दर्शनकारांनीं आणि तत्त्वज्ञांनीं 'अहं ब्रह्मास्मि' या शब्दांत मानवाचें स्थान निश्चित केलें आहे. आत्मा हा परमात्म्याचा अंश असून परमेश्वरानें प्रत्येक मनुष्याच्या सुखासाठी हें जगत् निर्माण केलें आहे, अशी एक विचारधारा आहे. मानव ज्याप्रमाणें परमात्म्याचा अंश आहे त्याप्रमाणेंच समाजाचाहि एक घटक आहे. म्हणून ज्या समाजांत तो राहतो त्या समाजांत त्याला एक विशिष्ट स्थान आहे. ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्यानें मनुष्य हा एक समाजप्रिय प्राणी आहे असें सांगितलें आहे. मनुष्याला समाजावांचून करमत नाहीं; समाजाशिवाय तो जिवंत राहूं शकत नाहीं. त्याचें सांस्कृतिक जीवन या सामाजिक जीवनामुळेंच समृद्ध झालें असून प्रगतीच्या मार्गावरील वाटचाल तो सामाजिक जीवनामुळेंच करूं शकला आहे. समाजावांचून दांपत्यप्रेम, अपत्यप्रेम, देशभक्ति यांसारखे गुण व निंदा, स्वार्थ, ईर्षा यांसारखे दोष यांचें अस्तित्व शक्य झालें नसतें. मनुष्याची शारीरिक, बौद्धिक, आर्थिक आणि भावनात्मक उन्नति समाजावरच आधारलेली आहे. कुटुंब, नातलग, शेजारी, यांसारख्या समाजाच्या घटकांमुळेंच मनुष्य जिवंत राहतो व ज्ञान मिळवतो. घरांत आणि घराबाहेर अनेक निरनिराळ्या प्रकारच्या लोकांशीं आपला संबंध येतो व त्यामुळें अनेक कामांची जबाबदारी आपल्यावर पडते. हीं कामें करीत असतां कितीतरी अवधानें व पथ्यें पाळावीं, संभाळावीं लागतात आणि सामाजिक संबंधांत अवधानें, पथ्यें ज्याला नीट रीतीनें बिनचुक पाळतां येतात, त्याचेंच व्यक्तिगत जीवन सुखी होतें.

सामाजिक संबंध यथायोग्य रीतीनें कसे पाळावेत, सांभाळावेत, याचें अतिशय सरळ पण आधारभूत विवेचन श्री. श्रीपादराव काळे यांनीं या पुस्तकांत अत्यंत मार्मिकतेनें केलें आहे.

स्वतंत्र भारतांत नागरिकाचें स्थान कोणतें व कर्तव्यें कोणतीं याबद्दल चर्चा रसपूर्णरीतीनें लेखकानें पहिल्याच लेखांत केली आहे. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबरच आपलीं सर्व दुःखें नाहींशीं होतील अशा सुखस्वप्नांत आपण गुंग झालों होतों; आणि म्हणून आजच्या परिस्थितींत आपण कसे अगदीं गोंधळून गेलों आहोंत याचें वस्तुस्थिति–आधारित वर्णन श्री. काळे यांनीं मार्मिकतेनें केलें आहे. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर आपले प्रश्न आपोआप सुटणार नाहींत याची जाणीव आपल्याला नाहीं. ते सोडविण्याचा प्रयत्न करण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त झाला आहे व ती जबाबदारी आपल्यावरच आहे, ही महत्त्वाची गोष्ट आपण नेहमीं विसरतों. व्यक्तिगत काटकसरीनें देशाचें हित कसें साधतां येईल हें अनेक उदाहरणें देऊन लेखकानें याच लेखांत दाखवून दिलें आहे.

'सुशिक्षित स्त्रियांचे समृद्ध संसार' या लेखांत आजच्या सुशिक्षित स्त्रियांच्या संसाराचें उत्कृष्ट विश्लेषण लेखकानें केलें आहे. असें अनेकवेळां सांगण्यांत येतें कीं, पूर्वीच्या पिढींतील स्त्रिया सुशिक्षित स्त्रियांपेक्षा पुष्कळ सुखी होत्या. पण हा एक भ्रम आहे. त्याचें निरसन श्री. काळे ह्यांनीं केलें आहे.

आजच्या सुशिक्षित स्त्रीला बाहेरच्या जगांत मोकळेपणानें वावरण्यास संधि मिळाल्यानें तिला कितीतरी प्रकारानें स्वतः आनंद व सौख्य मिळवितां येतें व स्वतः आनंदी व सुखी राहून आपल्या निकटवर्तीयांना आनंद व सुख देतां येतें. पत्नीची अर्थोत्पादनक्षमता आणि वेळ पडल्यास अर्थोत्पादनाची मनापासूनची इच्छा म्हणजे सुखी संसाराचा एक प्रकारचा उतरविलेला विमाच होय.


## श्री. वा. काळे ह्यांचें कौटुंबिक हितगुज

"ह्या पुस्तकांत चित्ताकर्षक पद्धतीनें दिलेल्या सूचनांचें अनुकरण करणारें माणूस खरोखर व्यवहारचतुर, लोकप्रिय आणि सुखी झाल्याशिवाय राहणार नाहीं."
— चिं. वि. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | कण आणि क्षण | २॥ रु. |
| २ | पुढें पाऊल | २ रु. |
| ३ | तुमचें स्थान कोणतें ? | २ रु. |

ह्या पुस्तकांची भेट देऊन आपली आधुनिकता व्यक्त करा!

परस्पर प्रेम आणि संमतीनंतर तरुण-तरुणींचे विवाह आतां होऊं लागले आहेत. यापासून होणारी लाभ-हानि याची चर्चा करतांना लेखकानें 'मुलामुलींचे परस्पर संमतीनें विवाह' या लेखांत वैवाहिक जीवनाच्या आर्थिक बाजूचाहि प्रश्न स्पष्टपणें पुढें मांडला आहे. दुसऱ्या सर्व दृष्टींनीं मुलगा योग्य असला पण त्याला जर कायमची नोकरी नसेल किंवा त्याचे अंगांत, पोटापुरते कां होईना, पैसे मिळविण्याची धमक नसेल तर कॉलेजमध्यें शिकणाऱ्या मुलीनें त्याचेशीं लग्न ठरविणें म्हणजे एक साहस करण्यासारखेंच होऊन बसलें आहे !

तरुण मुलींनीं बाहेरचा भपका व आकर्षणें यावर लुब्ध होऊन स्वतःची फसवणूक करून घेऊं नये ही महत्त्वाची सूचना लेखकानें 'लष्करी अधिकाऱ्याची सहचारिणी' या लेखांत केली आहे. लष्करी पेशाच्या तरुणाचा रुबाब आणि वर्तन तरुणींच्या चटकन् डोळ्यांत भरतें. लष्करी अधिकाऱ्याच्या सहचारिणीच्या सहसा नजरेस न पडणाऱ्या जीवनाच्या बाजूवर लेखकानें विदारक प्रकाश पाडला असून या जीवनांत सहचारिणीला तारेवरचा नाच कसा करावा लागतो व जीवन सुखी करण्यासाठी निरनिराळ्या भूमिका कशा रीतीनें पार पाडाव्या लागतात याचें वास्तवपूर्ण वर्णन केलें आहे.

पैशासाठी मनुष्याचें बलिदान दिलें जातां कामा नये, हें थोर विकसित संस्कृतीचें लक्षण 'म्हातारा झाडूवाला आणि त्याचा अखूड खराटा' ह्या लेखांत स्पष्ट करण्यांत आलें आहे.

लेखकाची बहुश्रुतता व अभ्यासू वृत्ति यामुळें सर्व लेखांतील विवेचन रसग्राही झालें आहे. स्वर्गस्थ वामन मल्हार जोशी यांच्या निबंधांची, हें पुस्तक वाचतांना, मला वारंवार आठवण झाल्यावांचून राहात नाहीं.

श्री. काळे यांच्या सर्वच लेखांत लघुनिबंधांचें लालित्य आहे. त्यांच्या पुष्कळशा लेखांचे मथळे पण काव्यपूर्ण व सूचक आहेत. काळाला ते लाख किंमतीचें भांडवल असें संबोधतात. मैत्री ही वनस्पतीप्रमाणें आहे, तिची जोपासना केली पाहिजे, ती वाढविली पाहिजे असें त्यांना वाटतें. बँक ही आधुनिक काळांतील ग्रामदेवता आहे असेंहि ते सांगतात. 'थांबण्याची कला' हें शेवटच्या लेखाचें शीर्षक पुस्तक संपत आलें आहे अशी सूचनाच देण्यासाठी आहे असें वाटलें.

या पुस्तकांत श्री. काळे यांच्या विचारप्रणालीचें अप्रतिम सौंदर्य पाहावयास सांपडतें. त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर समाजशास्त्राची दृष्टि समोर ठेवून आदर्श पाठच जणू दिले आहेत. संसारनौका यशस्वी रीतीनें चालावी अशी इच्छा करणाऱ्या प्रत्येक दंपतीला श्री. काळे यांचें हें पुस्तक दीपगृहाप्रमाणें अचूक मार्गदर्शन करील यांत शंका नाहीं. अशा सुंदर पुस्तकाचा सरळ व सुबोध अनुवाद केल्याबद्दल प्रा. शशिन ओझा यांना मी धन्यवाद देतें; आणि मला आशा आहे कीं, अशा दुसऱ्या अनेक पुस्तकांचे अनुवाद करून गुजराती साहित्य समृद्ध करण्यास ते कारणभूत होतील. याबरोबरच माझी अशी पण इच्छा आहे कीं, गुजराती भाषेंतील श्रेष्ठ पुस्तकांचें मराठींत भाषांतर करून गुजरातच्या विशाल संस्कृतीचा परिचय महाराष्ट्राला करून देण्याचें कार्यहि त्यांचे हातन घडावें. द्विभाषिक राज्यांत दोन्ही भाषाद्वारें संस्कृतींचा समन्वय झाला नाहीं तर त्याचें भवितव्य अस्थिरच राहील.

पर्णकुटि
पुणें १ — प्रेमलीला वि. ठाकरसी


************ ************

पंचवार्षिक योजनांच्या खर्चाची तरतूद अन्य कोणत्याहि मार्गापेक्षा नागरिकांनीं स्वेच्छेनें केलेल्या बचतीच्या प्रमाणांत देशाची आर्थिक घडी मजबुतीची राहणार आहे व त्या बचतीची संचय वाढीस लावण्याचे कामीं बँकांची कामगिरी महत्त्वाची ठरते.

ग्रामीण विभागांत बँकिंगचा प्रसार करून बचतीच्या रूपानें ठेवी सदैव वाढत्या प्रमाणांत आकर्षित करण्याची बहुमोल कामगिरी

दि बेळगांव बँक लिमिटेड

ही करीत आहे.

हिच्या पंचवीस शाखा ठेवींच्या रूपानें आर्थिक मजबुती वाढवीत असतां नियोजनाचा कार्यक्रम पार पाडणाऱ्या कंपन्यांना त्या जागीं वेळेवर रकमा पुरविण्याची, तसेंच आपल्या क्षेत्रांतील उद्योगधंदे व व्यापार यांच्या विकासासाठीं वाढत्या प्रमाणांत रकमांची तरतूद करीत आहे.

या बँकेच्या स्थापनेपासून गेल्या सत्तावीस वर्षांत तिच्या कार्याचा विस्तार व कार्यक्षमता यांत स्पृहणीय वाढ सतत दिसून येते.

दि बेळगांव बँक लिमिटेड, बेळगांव

महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सरहद्दीवरील आर्थिक आघाडी सदैव मजबूत पायावर ठेवणारी लोकप्रिय बँक.

# अर्थ

दिवाळी अंक

१२ नोव्हेंबर, १९५८





स्थापना : १९३५

*संस्थापक :*

प्रो. वामन गोविंद काळे

*संपादक :*

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

## संपादकीय

### सण हवा, पण ऋण काढून नको !

'आमच्या राज्यकर्त्यांनीं नुकतेंच आम्हांला दिवाळखोरीच्या खाईचे कडेवर नेऊन पोंचविलें होतें आणि आमच्या इतर देशांतील मित्रांना भीतीनें गांगरून टाकलें होतें.' असें जबाबदार हिंदी लोकांना स्पष्ट सांगितलें गेलें असतें, तर येथें हाहा:कार उडाला असता. कारण, भारताचे प्रतिनिधि वॉशिंग्टन येथें २५ ऑगस्ट रोजीं तीन दिवसांच्या परिषदेसाठी गेले, तेव्हां भारत आर्थिक आपत्तींत सांपडण्याच्या अगदीं बेतांत होता. वॉशिंग्टन परिषदेचे निर्णय विरुद्ध गेले असते, तर भारताला परदेशांतील देणीं कमी करावीं लागलीं असतीं किंवा खाका वर करण्याची पाळी आली असती; दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा गाभा नष्ट झाला असता; कांहीं उद्योगधंदे बंद पडले असते; भारत सरकारला यांतून उद्भवणाऱ्या मोठ्या राजकीय पेंचप्रसंगाला तोंड द्यावें लागलें असतें.

ग्रेट ब्रिटन, युनायटेड स्टेट्स, प. जर्मनी, कॅनडा व जपान ह्यांचे प्रतिनिधि 'भारताची मदतीची विनंती' विचारांत घेण्यासाठी जमले, तेव्हांची परिस्थिति अशी गंभीर होती. त्यांतून भारत सुखरूप बाहेर पडला, हें नशीबच समजावयाचें! ३१ मार्च, १९६१ अखेर भारताची परराष्ट्रीय हुंडणावळींची तूट १२० कोटी डॉलर्स एवढी भरणार. त्यापैकी ३५ कोटी डॉलर्स ३१ मार्च, १९५९ पूर्वीं द्यावयाचे आहेत. म्हणजे, भारताची सोडवणूक करण्याच्या मार्गांत दोन टप्पे आहेत; त्यांपैकी येत्या सहा महिन्यांतील त्याची दिवाळखोरी थांबविणें हा पहिला टप्पा. तेव्हां, जमलेल्या सरकारी प्रतिनिधींनीं भारताच्या मदतीसाठी द्यावयाची कर्जाऊ वर्गणी आपसांत वांटून घेतली. (ग्रेट ब्रिटन १९.८ कोटी डॉलर्स, युनायटेड स्टेट्स ७.५ कोटी डॉलर्स, जर्मनी ४ कोटी डॉलर्स, कॅनडा १.७ कोटी डॉलर्स, आणि जपान १ कोटी डॉलर्स). ह्या व्यतिरिक्त, जागतिक बँक १० कोटी डॉलर्स देऊन ३५ कोटी डॉलर्स पुरे करणार. पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या दोन वर्षांसाठी ६५ कोटी डॉलर्सची अशीच तरतूद केली जाईल; त्यासाठी वर्षअखेर बोलणीं सुरू होतील.

१९५० ते १९५७ ह्या मुदतींत भारताची निर्गत १७.४% नें वाढली; इतर कित्येक देशांनीं ह्यापेक्षा जास्त प्रमाणांत निर्गत वाढविलेली आहे. अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ करण्याचें ध्येय कागदावरच राहिलेलें आहे, इतकेंच नव्हे तर तें उत्पादन १९५३-५४ मधील ६८७ लक्ष टनांवरून १९५७-५८ मध्यें ६१० लक्ष टनांवर उतरलें आहे. शेतीच्या मानानें उद्योगधंद्यांच्या वाढीवर अप्रमाण भर दिला गेला आहे. पोलादाचे तीन नवे कारखाने सुरू झाले म्हणजे परदेशी हुंडणावळीवरील आजचा ताण कमी होऊन शेतीकडे जास्त लक्ष देणें शक्य होईल. औद्योगिक योजना पुऱ्या झाल्यामुळें जी उसंत मिळेल, ती तात्कालिकच ठरेल. १९६१ चे अखेरीस भारताचें परदेशीय देणें २३० कोटी डॉलर्स म्हणजे १,००० कोटी रुपयांपेक्षाहि जास्त होऊन बसेल. ह्याची परतफेड आणि व्याज, ह्यासाठी कमालीचा संयम व स्वार्थत्याग जरुरीचा होईल; राजकीय दृष्ट्या तो जाचकच ठरेल. भारताला परराष्ट्रीय बाजारपेठेंत आपली पत टिकवावयाची असेल, तर परदेशीय हुंडणावळीच्या बचतीच्या दृष्टीनेंच त्याला धोरणें आंखावीं लागतील. भारतानें आजच आपलीं परराष्ट्रीय येणीं कर्जफेडीसाठी गहाण टाकल्यागत आहेत.

गेल्या ऑगस्टमधील संकटाच्या परिस्थितीपासून आपल्या राज्यकर्त्यांनीं धडा घेतला पाहिजे, ह्याची जाणीव 'दि बँकर' ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश मासिकांत देण्यांत आली आहे. वॉशिंग्टन येथील वाटाघाटींत ब्रिटिश प्रतिनिधींनीं भारताच्या वतीनें रतबदली केली, म्हणून भारताचें संकट तात्पुरतें का होईना, निवारलें गेलें, असें त्यांत म्हटलें आहे. वाड्यांतील एखाद्या भाडेकरूवर जप्ति आली, म्हणजे शेजाऱ्यांनीं वर्गणी करून त्याला संकटांतून सोडवावें, तशाच प्रकारची ही परिस्थिति आहे. शेतीचें उत्पादन वाढणें, लोकसंख्या आटोक्यांत राहणें, उत्पन्नाचा मोठा भाग बाजूला काढला जाऊन उत्पादक रीतीनें गुंतविला जाणें, त्यासाठी लोकांना योग्यप्रकारें मार्गदर्शन करणें, तात्कालिक राजकीय हितापेक्षा दूरगामी राष्ट्रीय हितास प्राधान्य देणें, ह्याच मार्गानें आपणांस जावें लागेल. सरकारी कारभारांत ही तळमळ कार्यक्षमतेनें व्यक्त होईल काय? दिवाळीचा सण आपण साजरा करतांना, दिवाळखोरीची भीति मनांत येणें, ही गोष्टच परिस्थितीचें गांभीर्य दर्शविते. पण तिच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणें घातक आहे. आपण वास्तववादीच बनलें पाहिजे.

देशापुढील भयानक प्रश्न व्यक्ति सोडवूं शकत नाहींत, हें खरें; परंतु त्यांच्या विचारसरणीची एकत्रित छाप सामुदायिक जीवनावर पडूं शकते, ह्या आशेच्या आधारावरच लोकसत्ताक देशांची प्रगति अवलंबून असणार, हें उघड आहे. लोकजागृतीच्या कामीं ह्यासाठींच कसूर होता कामा नये. ही दिवाळी आपला देश ऋण काढून साजरी करीत आहे; हरकत नाहीं, आपण त्यांत सहभागी होऊं या. पण, पुढील जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवूनच वाटचाल करूं या.

---

**ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो !**


## अनुक्रमणिका

१ सण हवा, पण ऋण काढून नको ( संपादकीय ) ... ५
२ यांत्रिकाची यात्रा ( शं. वा. किर्लोस्कर ) ... ७
३ भारताला नियोजनाबद्दल आलेला अनुभव ( भा. म. काळे ) ... ११
४ ग्रामीण कर्जपुरवठा व हिंदी बँकिंग ( बी. वेंकटप्पय्या ) ... १५
५ सहकारी सोसायट्यांना सचेतन कसें करतां येईल ? ( वैकुंठ ल. मेहता ) ... १७
६ नियंत्रित कर्जपुरवठ्याचा प्रश्न ( ए. यू. शेख ) ... १९
७ नागरी सहकारी बँकेंतील महिला शाखेचें स्थान ( शं. वि. संझगिरी ) ... २१
८ मुंबई राज्यांतील सहकारी गृहमंडळ्या ( " दत्त शर्मा " ) ... २३
९ बँकिंगच्या व्यवसायांतील स्त्रियांचें स्थान ... २७
१० इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ... २९
११ रिझर्व्ह बँकेचा अंतर्गत कारभार कसा चालतो ? ... ३१
१२ सल्ला देणाऱ्या बँकेची जबाबदारी ... ३५
१३ अमेरिकेच्या आर्थिक मदतीची पार्श्वभूमि ... ३६
१४ आर्थिक मंदीचे राजकीय परिणाम ... ३९
१५ १००१ कंपन्यांची प्रगति ... ४३
१६ मेट्रिक वजन-मापांची नांवें ... ४५

★ "अर्था" चा ह्या पुढील अंक नेहमींप्रमाणें दोन सुट्यांनंतर दि. ३ डिसेंबर रोजीं प्रसिद्ध होईल. ★

PRATIBHA/LIC/5

तुमची किंमत किती ?




तुम्ही म्हणजे तुमच्या कुटुंबाचे सर्वस्व ! पण पुढील हिशेब करून बघितलांत काय ?

समजा – तुमचें वय २५, पगार १५० रु. ५५ वर्षांच्या नोकरी पर्यंत ५४,००० रु. तुम्हीं मिळविणार, आणि ते सर्व घरखर्चाला लागणार. उद्यां कांहीं बरं वाईट झालं तर हें उत्पन्न थांबेल. तुम्ही नसलांत तरी तुमच्या कुटुंबाला निदान ७५ रुपये हवेतच. म्हणजे एवढे पैसे दरमहा येण्यासाठीं बँकेत २२,५०० रुपये तरी ठेवावें लागतील. पण हें कसें शक्य होईल ? ह्याला मार्ग एकच–विमा लहान हप्ता व निश्चित तरतूद.

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

# यांत्रिकाच्या यात्रेंतील कांहीं प्रसंग

(शं. वा. किर्लोस्कर)

आद्य महाराष्ट्रीय कारखानदार, श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर, ह्यांनीं बेळगांवला आपल्या सायकलच्या दुकानाच्या पिछाडीस १९०३ सालीं कडबा कापण्याचीं यंत्रें करण्यास सुरुवात केली त्या वेळीं महाराष्ट्रांत हाताच्या बोटांवर मोजतां येतील, एवढेहि यांत्रिक कारखाने नव्हते. औंधच्या राजेसाहेबांच्या योग्य वेळीं मिळालेल्या साहाय्यानें, लक्ष्मणरावांनीं किर्लोस्करवाडीची स्थापना केली. तेथें रुजलेल्या उद्योगवृक्षाचा आजचा विस्तार केवढा तरी मोठा आहे. पुणें, हरिहर, बंगलोर येथील नवे कारखाने काढण्यांत लक्ष्मणरावांचे चिरंजीव व त्यांच्या तालमींत तयार झालेले इतर चालक यांचा विशेष पुढाकार असला, तरी त्यांच्यामागील खरी प्रेरक शक्ति लक्ष्मणराव हीच असे, हें निराळें सांगावयास नको. हरिहर येथील कारखान्यांत आज १४०० कामगार काम करीत असून, मशीन टूल्स करणाऱ्या भारतांतील बिन-सरकारी कारखान्यांत तो अग्रेसर आहे. बंगलोरच्या कारखान्यांत सुमारें १००० कामगार कामावर असून त्यांत २५० हॉर्स पॉवरपर्यंतच्या इलेक्ट्रिक मोटर्स व ३००० के. व्ही. ए. पर्यंतचे ट्रॅन्स्फॉर्मर्स होतात. पुण्याच्या कारखान्यांत ७०० कामगार असून त्यांत ५, १०, २०, ४० हॉर्स पॉवरचीं महिना ८०० एंजिन्स तयार होतात. हे दोन्ही कारखाने त्यांच्या क्षेत्रांत अग्रेसर आहेत. किर्लोस्करवाडीच्या मूळ कारखान्याचीहि प्रगति चालू असून त्यांत इतर मालाच्या जोडीला सेंट्रिफ्यूगल पंप व स्लूस व्हाल्व यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे.

या कारखान्यांचें अलीकडचें भावंड म्हणजे हडपसरजवळ स्थापन होणारी किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनी लि. या कारखान्यांत एअर कॉम्प्रेसर तयार होणार आहेत.

लक्ष्मणरावांनीं लावलेल्या झाडाच्या या प्रत्यक्ष फांद्या. तसेंच त्यांचा अन्य रीतीनें हातभार लागलेले किती तरी कारखाने आज दिसतात; दक्षिण महाराष्ट्रभर ते पसरलेले आहेत.

किर्लोस्करवाडी व ओगलेवाडी येथील कारखाने आपापल्या उद्योगामुळें पुढें आले, तसेंच ज्या संस्थानानें त्यांना हातभार लावला तें औंध संस्थान पुढें आणण्यासहि ते बरेच उपयोगी पडले.

कारखान्यांपासून संस्थानाचेंहि महत्त्व वाढूं शकतें, एवढें दिसल्यावर तीच प्रथा इचलकरंजी, सांगली, मिरज, कोल्हापूर, फलटण, जमखंडी, भोर, इत्यादि संस्थानांनींहि उचलली. त्यामुळें महाराष्ट्राचे कारखाने या पूर्वीच्या संस्थानी मुलुखांतच विशेषें करून केंद्रित झालेले दिसतात.

एकानें पाडलेल्या पाऊलवाटेला पुढें कांहीं काळानें हमरस्त्याचें स्वरूप प्राप्त होतें. त्याचप्रमाणें औद्योगिक क्षेत्रांत प्रथम पदार्पण करून आपल्या यात्रेकरूनें जी नवी वाट काढली ती चोखाळणाऱ्या यांत्रिकांची संख्या सारखी वाढत आहे. याच वाटेनें जाऊन राष्ट्राचा अभ्युदय होऊं शकेल, हेंहि सिद्ध झालें आहे.

पण आघाडीच्या यात्रेकरूला पाऊलवाट पाडण्यासाठी किती तपश्चर्या करावी लागली, हें कितीकांना माहीत आहे ?

लक्ष्मणरावांच्या यात्रेंतील कांहीं निवडक प्रसंगांचें येथें वर्णन "यांत्रिकाची यात्रा" ह्या पुस्तकाचे लेखक श्री. शं. वा. किर्लोस्कर, ह्यांचे अनुज्ञेनें आम्ही येथें देत आहों; तें वाचकांना उद्बोधक वाटेल, अशी खात्री आहे.

### यात्रेला प्रारंभ : १८८४

"आबा, उद्यांपासून मी शाळेला जाणार नाहीं." पंधरा वर्षांच्या किडकिडीत अंगाच्या लखूनें वडिलांच्या कानांवर आपला विचार घातला.

काशीनाथपंत गीतापंचदशी वाचीत होते. त्यांनीं हातांतील पोथीच्या पानांतून डोळे वर उचलले व लखूकडे टक लावून विचारलें, "शाळा सोडून तूं करणार काय?"

लखूचें उत्तर तयार होतें—

"मुंबईला जाऊन चित्रकलेचं अथवा यंत्रकलेचं शिक्षण घेण्याची माझी इच्छा आहे. मला या विषयांची फार आवड आहे. मीं रामूअण्णालाहि विचारलं. त्यालाहि माझा बेत पूर्ण पसंत आहे."

"ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणं होऊं दे. पण आपण किती गरीब आहों हें लक्षांत ठेव. माझ्या बारा रुपये पगारांतून तुझ्यासाठी फार तर दोन रुपये मी तुला पाठवूं शकेन."

"त्याची काळजी तुम्ही करूं नका. माझं मी कसंहि भागवीन."

"मग लाग पुढच्या तयारीला. प्रकृतीची मात्र नीट काळजी घेत जा; आणि पत्रं पाठवायला विसरूं नको."

पिता-पुत्रांतील हा संवाद धारवाड येथील एका चार खणी घरांत चालू होता. १८८४ सालांतील ही गोष्ट.

### चित्रकलेकडून यंत्रकलेकडे

लक्ष्मणरावांनीं मुंबईत काय शिकावें याबद्दल थोडी वाटाघाट झाल्यावर नुकत्याच सुरू झालेल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्यें त्यांनीं नांव घातलें.

चित्रकला हा लक्ष्मणरावांचा आवडता विषय; तथापि या कलेचें शिक्षण देण्याची तेव्हांची पद्धत फार कंटाळवाणी असे. निरनिराळ्या रेषांच्या आकृति काढण्यांत विद्यार्थ्यांना तासचे तास घालावे लागत. तथापि, पहिल्या तिन्ही ग्रेडस् संपून पेंटिंगचा क्लास सुरू झाल्यावर लक्ष्मणराव त्यांत अधिक रमूं लागले. पण पुढें त्यांच्या डोळ्यांना रंगाची छाननी करतां येत नाहीं असें आढळून आल्यानें, चित्रकलेच्या अभ्यासाला त्यांना तिथेंच विराम द्यावा लागला.

इतर एखाद्याच्या बाबतींत ही एक आपत्तीच ठरली असती. परंतु लक्ष्मणरावांचें तसें झालें नाहीं. कारण त्यांनीं चित्रकलेचा अभ्यास सुरू केला असला तरी स्वतःचा खरा कल यांत्रिक विद्येकडे आहे याचीहि त्यांना मुंबईत जाणीव होऊं लागली व या क्षेत्रांत शिरण्याची त्यांची उत्सुकता वाढत चालली. चित्रकलेकडे पाठ होतांच ते यंत्रकलेकडे वळले.

### ड्रॉइंग टीचर

१८८७ सालीं मुंबईत यांत्रिक शिक्षण देण्यासाठी व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटची स्थापना झाली. त्यासाठी मेकॅनिकल ड्रॉइंग शिकवणाऱ्या एका शिक्षकाची जरूर असल्याचें लक्ष्मणरावांना समजलें. त्यांनीं इन्स्टिटयूटचे प्रिन्सिपाल मि. पिथियन यांची भेट घेतली. आर्ट स्कूलमध्यें शिकलेली चित्रकला वेगळी व इथें यंत्रांच्या रचनेचे नकाशे काढण्यासाठी लागणारें ज्ञान वेगळें. तेव्हां इंजिनियर होणाऱ्या विद्यार्थ्यांना ड्रॉइंग शिकवण्याचें काम लक्ष्मणराव कसें करूं शकतील, अशी प्रिन्सिपालसाहेबांनीं साहजिकच शंका व्यक्त केली.

"तसं कशाला? तुम्ही मला एक काम देऊन माझी प्रत्यक्ष परीक्षाच घ्या ना!" लक्ष्मणरावांनीं त्यावर तोड सुचविली.

दुसरे दिवशीं लक्ष्मणरावांनीं प्रिन्सिपालसाहेबांपुढें त्यांनीं दिलेल्या एका ड्रॉइंगची अचूक व काळजीपूर्वक काढलेली नक्कल ठेवतांच त्यांची खात्री खूष झाली. ते म्हणाले,

"फार छान! ड्रॉइंग टीचर म्हणून दरमहा ३५ रुपये पगारावर मी तुमची नेमणूक करतों. आपल्या कामाला आजपासून सुरुवात करा."

### मास्तरचे प्रोफेसर

इन्स्टिटयूटमध्यें "स्टीम" हा विषय शिकवणारे प्रोफेसर रजा घेऊन इंग्लंडला गेले. तेव्हां त्यांच्या गैरहजेरींत हा क्लास कसा चालवावा, ही प्रिन्सिपॉल पिथियन यांना फिकीर पडली. त्यांच्या डोळ्यांसमोर ही जबाबदारी स्वीकारण्यास योग्य अशी एकच व्यक्ति होती, ती म्हणजे लक्ष्मणराव. त्याप्रमाणें त्यांना बोलावून हें काम सांगतांच लक्ष्मणरावांनीं आनंदानें तें कबूल केलें व दुसऱ्या दिवसापासून "मास्तर" म्हणून ड्रॉइंगचा क्लास घेतल्यावर "प्रोफेसर" म्हणून "स्टीम" हा विषय ते विद्यार्थ्यांस शिकवूं लागले. यंत्रांबद्दल लक्ष्मणरावांनीं अशी विविध व भरपूर माहिती संपादन केल्यामुळें एक तज्ज्ञ म्हणून त्यांचा सल्ला विचारण्यासाठी निरनिराळी मंडळी त्यांच्याकडे येऊं लागली.

### सरकारी नोकरांची प्रतिष्ठा!

लक्ष्मणरावांच्या सासूबाई म्हणत, "माझ्या नागूताईसाठी मामलेदार नवरा हवा बरं का! फिरायला घोडा, घरीं पट्टेवाला व स्वैंपाकाला ब्राह्मण, असा त्याचा थाट पाहिजे. बायकोच्या अंगावर त्यानं मणभर दागिने घातले पाहिजेत."

तथापि, त्यांच्या गोऱ्यागोमटया नाजुक नागूताईला स्थळ मिळालें तें निराळयाच तऱ्हेचें! ना गांवांत घर, ना रानांत शेत! हातावरचें पोट आणि तें कामहि शूद्रासारखें हात मळकट करून करायचें! असला जावई सासूबाईंना कसा पसंत पडावा?

या आजीबाई पुढें पन्नास वर्षें जगल्या. त्यांतलीं शेवटचीं बरींच वर्षें त्या लेकीकडेच येऊन राहिल्या. त्यामुळें आपला हा सायकल दुकानदार जावई पुढें एक बडा कारखानदार कसा झाला व जगांत त्यांनीं केवढी मोठी प्रतिष्ठा मिळविली हें त्यांना आपल्या डोळयांनीं पाहायला मिळालें. परंतु त्यांचें पहिलें मत मात्र मुळींच बदललें नाहीं. त्या म्हणत. "उगीच डौल नका करूं! तुम्ही कारखाना काढलात तरी तुम्हांला मामलेदाराची सर थोडीच येणार?"

आजीबाईंचें हें मत कोणाला कितीहि विचित्र वाटलें, तरी त्या काळीं सरकारी नोकरीचा प्रतिष्ठित मार्ग सोडून लक्ष्मणरावांसारखा एखादा तरुण निराळया पेशांत शिरण्याचें धाडस करूं लागला तर समाजाकडून त्याची कशी संभावना होई, याचें तें एक द्योतकच होतें.

### यंत्रासाठी राधाबाईंनीं पाटल्या काढून दिल्या

इन्स्टिटयूटमधून राजीनामा देऊन बाहेर पडल्यावर लहान प्रमाणावर उत्पादन करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. भांडवलासाठी रक्कम कशी उभारावी या विवंचनेंत लक्ष्मणराव असतां राधाबाईंनीं एक दिवस खोलींत प्रवेश केला व त्यांनीं विचारलें, "आपल्याला यंत्रासाठी कांहीं पैसे पाहिजेत असं कळतं. तेव्हां मी आपल्याला थोडी मदत केली तर चालेल का?"

लक्ष्मणराव आपल्या पत्नीकडे प्रश्नार्थक मुद्रा करून पाहूं लागले.

राधाबाईंनीं अधिक न बोलतां आपल्या हातांतील सोन्याची एकएक पाटली काढली व म्हणाल्या, "ह्या घ्या!"

लक्ष्मणरावांना भावनाविवश झालेले क्वचितच कुणीं पाहिलें असावें. या वेळीं मात्र त्यांच्या नेहमींच्या भेदक नजरेंत एक निराळेंच पाणी चमकूं लागलें. ते म्हणाले, "तुझ्या या पाटल्या मी आतां घेतों; याच्या दुप्पट वजनाच्या पाटल्या एक दिवस मी तुला घालणार आहें, हें ध्यानांत ठेव!"

### लोखंडी नांगराचा जन्म

लोखंडी नांगर तयार करणें ही लक्ष्मणरावांची अभिनव कल्पना. सुधारलेल्या परदेशी शेतीच्या आउतांचे अनेक क्याटलॉग लक्ष्मणरावांनीं चाळले. जमिनीच्या मशागतीसंबंधीं शक्य ती सर्व माहिती त्यांनीं गोळा केली. त्याच सुमारास शेतकी खात्यानें कांहीं विलायती नांगर आणवून ते इकडे कितपत यशस्वी ठरतात याबद्दल प्रयोग चालवले होते ते पाहिले. सर्व झाल्यावर ज्या नमुन्याचा नांगर तयार करायचें लक्ष्मणरावांनीं ठरविलें तसला एक विलायती नांगर त्यांनीं आणवला.

या नांगराचे फाळ, पाठ, मधला भाग, इत्यादि बिडाचे होते व हाळीस आणि रुमणें लोखंडी पट्टयाचे. हे नांगर तयार करायला बिडाची भट्टी हवी. ती अगोदर उभारली पाहिजे. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी! लक्ष्मणराव त्या प्रयत्नाला लागले. पण लक्ष्मणराव सुरुवातीच्या अपयशांना थोडेच भीक घालणार! ते त्या भट्टीच्या खनपटीला बसले. ज्या चुका होत त्या दूर करण्याच्या युक्त्या अमेरिकन "फौंड्री" मासिकाचीं पारायणें करून त्यांनीं शोधून काढल्या. एवढें झाल्यावर आपल्या भट्टींतून नांगराचे भाग, मनपसंत तयार होऊन बाहेर पडूं लागले तेव्हांच ते स्वस्थ बसले.

माळावरच्या या चिमुकल्या कारखान्यांत तयार झालेले पहिले सहा नांगर जोडून रंगवून तयार होतांच त्याची 'केसरी' व "ज्ञानप्रकाश" मधून जाहिरात फडकूं लागली. आजमितीस १० लाखांहून अधिक किर्लोस्कर नांगर प्रचारांत आहेत!

### किर्लोस्करवाडीची मुहूर्तमेढ

१९१० च्या मार्च महिन्यांत एके दिवशीं दुपारीं लक्ष्मणराव व त्यांच्याबरोबर अंतोबा फळणीकर, टोपण्णा सुतार व धन्या नांवाचा गडी अशी मंडळी या स्टेशनवर उतरली. लक्ष्मणरावांनीं नकाशा काढला व आपल्याला औंधच्या राजेसाहेबांचेकडून मिळालेली जागा समोरच्या बाभळीच्या झाडांतून निरखून पाहूं लागले. त्यांना तिकडे काय दिसलें? एक उजाड टेकाड व त्यावर इतस्ततः पसरलेला निवडुंग! डोक्यावर ढगांचा एक

पुंजकाहि नसलेलें आकाश ! स्टेशनशेजारचीं मास्तरांचीं घरें व पोर्टरांच्या दोनतीन कोठड्या सोडल्या तर मनुष्यवस्तीची तिथें आणखी एकच खूण होती; ती म्हणजे एक छोटी धर्मशाळा. बेळगांवच्या प्रसन्न वातावरणांतून आलेल्या प्रवाशांना हा कडक उन्हाळा व समोरचें भयाण दृश्य पाहून काय वाटलें असेल ?

कारखान्याबरोबर नव्या ठिकाणीं येण्याची इच्छा असलेले ३०–३५ कामगार आपल्या बायकांमुलांसह व सामानसुमानासह लवकरच कुंडल रोड स्टेशनवर उतरले. स्टेशनच्या आवारांतला हा तांडा जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्यांतील प्रवाशांचें लक्ष वेधून घेई. उन्हाळ्याचे दिवस असल्यानें सर्व मंडळी उघड्यावरच झोपत. स्वैंपाकासाठी तेवढा धर्मशाळेचा उपयोग. त्यांत पंधरा-सोळा चुली जवळजवळ मांडून बायका स्वैंपाक करीत. राधाबाईंच्या चुलीशेजारीं संतू सुताराच्या बायकोची चूल, तिच्या पलीकडे तात्या न्हाव्याच्या बायकोची चूल ! असल्या गर्दीत कितीहि गैरसोयी असल्या, तरी त्यांत सहजीवनाचा एक निराळाच आनंद सर्वांना लुटायला मिळे.

### परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें

किर्लोस्करवाडीनें एक वर्षांत चांगलेंच बाळसें धरलें. तिथल्या जीवनाला किंचित् स्थैर्य आलें. धंद्याचाहि जम बरा बसत चालला. पण लक्ष्मणरावांना स्वस्थता ठाऊक नव्हती. "पुढें चला" हा त्यांचा एकच मंत्र. तोच मंत्र आपल्या सर्व तरुण साहाय्यकांच्या मनावर ते सारखा बिंबवीत; व त्यांच्यावरहि या मंत्राचा फार परिणाम होई. त्यांपैकी एखाद्यानें आपल्या कामांत थोडीशी निराळी चमक दाखविली तरी लक्ष्मणरावांकडून त्याला मोठीच शाबासकी मिळे.

परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें असें म्हणतात. तें खरें असो अगर नसो, लक्ष्मणरावांच्या अशा उत्तेजनपर शब्दांमुळें साध्या कोटींतील माणसें वरच्या कोटीला चढत, हें मात्र अक्षरशः खरें. त्यांना सुरुवातीला मिळालेले बहुतेक हस्तक अननुभवी व बेताचें शिक्षण झालेले. पण लक्ष्मणरावांच्या तालमींत तयार झाल्यावर तेच केवढीं महत्त्वाचीं व मोठमोठीं कामें करूं लागले ! तसें होतें म्हणूनच कोचऱ्यासारख्या कोकणांतल्या एका आडवळणी खेड्यांतून कारकुनी करण्यासाठी देशावर आलेला मंगेशराव रेग्यासारखा गरीब मुलगा किर्लोस्कर संस्थेचा विश्वासू प्रमुख हिशेबनीस बनला; अंतोबा फळणीकरासारखा आजऱ्यांतून एका सद्रानिशीं आलेला मुलगा एक अत्यंत कल्पक एंजिनियर व किर्लोस्कर कारखान्याचा मोठाच आधार बनला; तर कुठल्याहि छापखान्याचें तोंडहि न पाहिलेला इचलकरंजीचा गणपतराव विजापुरे मुद्रणशास्त्र व लिपिसुधारणेचा एक तज्ज्ञ म्हणून पुढें आला. ही सर्व नामावलि द्यायची तर ती यादी फार मोठी होईल.

थोडक्यांत सांगायचें तर लक्ष्मणरावांनीं अशा अनेक साध्या माणसांनाच हाताशीं धरून, त्यांची सुप्त शक्ति जागृत करून व त्यांना उत्तेजन देऊन किर्लोस्करवाडीचा विकास केला आणि एक मोठा चमत्कार घडवून आणला !

### पिऱ्या मांगाचा उद्धार

पिऱ्या मांग हा सातारा जिल्ह्यांतील एक अट्टल दरोडेखोर. शरीरानें धिप्पाड व ताकदहि दांडगी. या भागांत त्याचा मोठा दरारा. पण अशाच एका प्रकरणांत तो पोलिसांच्या हातीं सांपडून औंध येथील तुरुंगांत दीर्घ मुदतीची सजा भोगीत होता. लक्ष्मणरावांना यामुळेंच त्याचें नांव माहीत झालें होतें.

पुढें किर्लोस्करवाडी वसली आणि तिच्या संरक्षणाचा प्रश्न लक्ष्मणरावांपुढें आला. या कामासाठी संस्थानकडून दोन पोलीस मिळतील असें कळविण्यांत आलें. ती सूचना लक्ष्मणरावांना तितकीशी पसंत पडली नाहीं. त्यांनीं एक निराळीच कल्पना काढली.

त्यांनीं पिऱ्या मांगाला निरोप धाडला, कीं यापुढें पूर्वीचे मार्ग सोडून तो प्रामाणिकपणें वागण्यास तयार असेल, तर त्याची औंधाच्या तुरुंगांतून मुक्तता करून किर्लोस्करवाडीच्या कारखान्यांत ठेवून घेण्याची त्यांची इच्छा आहे. मात्र त्यानें तशी शपथ घेतली पाहिजे. पिऱ्यानें ही कल्पना आनंदानें मान्य केली.

राजेसाहेबांना लक्ष्मणरावांचा हा प्रयोग अर्थात् जरा साहसाचा वाटला. पण त्यांनीं लक्ष्मणरावांना मोडता घातला नाहीं. पिऱ्याच्या सुटकेचा त्यांनीं हुकूम दिला. त्याच्याचबरोबर तुका रामोशी, बाळा रामोशी, अशा आणखी चार-पांच जणांस लक्ष्मणरावांनीं या कामगिरीसाठी निवडले व त्यांस वाडींत आणलें.

त्यांच्या शपथविधीचा समारंभ पार पाडण्यासाठी सर्व कामगारांस व वाडींतील स्त्री-पुरुषांस एकत्र जमविण्यांत आलें. "यापुढें मी कसला गुन्हा करणार नाहीं, दारू पिणार नाहीं व कारखान्याचें काम इमानेंइतबारें करीन," ही शपथ प्रत्येकानें मोठ्यानें घेतल्यावर, त्याच्या हातावर लक्ष्मणराव चिमूटभर मीठ ठेवीत. तें त्यानें तोंडांत टाकायचें व बेलभंडारा उचलून बाजूला सरायचें. या वेळीं कांहींजणांच्या डोळ्यांतून घळघळा पाणी वाहूं लागलें व सारें वातावरण मोठें गंभीर झालें.

या लोकांना नांगर जोडण्याचें काम शिकविलें व त्या खात्यांत त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्यांच्यासाठी वाडींत घरें बांधण्यांत आलीं व त्यांचीं मुलें इतर मुलांबरोबर शाळेंत जाऊं लागलीं. हीं माणसें चांगल्या समाजांत राहूं लागलीं आणि त्यांची भाषा-बोलणेंहि सुधारलें.

### कुंडल रोडची किर्लोस्करवाडी

साताराचे कलेक्टर मि. मॉयसे, वाडीला आले असतांना लक्ष्मणरावांना म्हणाले, "माझा राजवा नांवाचा बऱ्याच वर्षांपासून नोकरीस असलेला बटलर वडूज येथें मुक्काम असतांना हार्ट ॲटॅक येऊन वारला. त्याची बायको व पांच लहान मुलं त्यामुळं उघड्यावर पडलीं. या मायलेकरांना तुमच्या स्वाधीन करावं ही माझी इच्छा. त्यांचा भार तुमच्यावर पडणार नाहीं. मुलं मोठीं होईपर्यंत त्यांच्या खर्चासाठी मी चेक पाठवीत जाईन."

"तुम्ही चेक पाठवतां कामा नये. या माणसांची सारी व्यवस्था माझ्याकडे लागली. तुम्ही त्यांना वाडीला धाडून द्या." लक्ष्मणरावांनीं सांगितलें.

हा संवाद चालू असतां लक्ष्मणरावांचा एक मदतनीस तिथें होता. त्याच्या मनांत अचानकपणें एक कल्पना आली. त्यानें मॉयसेसाहेब निघतांना त्यांच्या कानांत हळूच म्हटलें, "तुम्हाला आमचं एखादं काम करायचं असेल, तर इथल्या स्टेशनचं 'कुंडल रोड' हें नांव बदलून 'किर्लोस्करवाडी' हें नांव द्यायला रेल्वे अधिकाऱ्यांना सांगतां आलं तर पाहा. आम्ही या बाबतींत अनेकवार विनंत्या करून थकलों आहों. रेल्वे कंपनी आम्हाला मुळींच दाद देत नाहीं."

आणि आश्चर्य हें, कीं पुढें थोड्याच दिवसांत कुंडल रोड स्टेशनच्या पाट्यांवरील जुनें नांव पुसून त्यांच्यावर 'किर्लोस्करवाडी' हें नांव रंगवण्याचें काम सुरू झालेलें दिसलें !

### " काम करा, म्हणजे पैसे मिळतील "

एंजिनियरिंगच्या धंद्यांत कष्ट व यातायात फार व प्राप्ति बेताची. शिवाय लक्ष्मणरावांनीं स्वतः होऊनच आपलें प्राप्तीचें मान कमी राखलें होतें. इतकें कीं, सन १९२४ ते १९४० या मंदीच्या वर्षांत, मॅनेजिंग एजंट्स म्हणून कारखान्याची सर्व जबाबदारी त्यांच्यावर असली तरी, मॅनेजिंग एजंट्स कमिशन म्हणून त्यांना यत्किंचितहि प्राप्ति होऊं शकली नाहीं.

त्यांच्या उग्र स्वभावामुळें त्यांच्याकडे कांहीं मागायला जाण्याची कोणाची छातीहि व्हायची नाहीं, आणि असा कोणी मनुष्य त्यांच्याकडे आला तर त्याची गाठ पडणेंहि कठीण. कारण आतां पॅटर्न शॉपमध्यें तर तितक्यांत फौंड्रीमध्यें, आणि तिथें जावें तर स्वारी पोल्ट्री फार्ममध्यें गेलेली! तिथें शोध करीत गेले तर ते रामापूर अथवा बिचूदला निघून गेल्याचें समजायचें! आणि अशा गडबडींत कोणी त्यांना गाठलेंच तर त्यांचें उत्तर ठरलेलें–" काम करा म्हणजे पैसे मिळतील."

### लूट करणाऱ्या कामगाराचा सत्कार

कारखान्याचे उमाशंकर पंड्या इस्लामपूरच्या गोळीबाराला बळी पडले, त्याचप्रमाणें सदुभाऊ पेंढारकर यांचेंहि भूमिगत कार्य चालू असतां ते पोलिसांच्या हातांत सापडले व शिक्षा होऊन येरवड्याच्या तुरुंगांत असतांना अकालीं मृत्यु पावले.

हें आंदोलन चार वर्षे चालल्यावर सरकार व कॉंग्रेसमध्यें तह घडून आला. त्याबरोबर शिक्षा झालेले कार्यकर्ते तुरुंगांतून सुटले व भूमिगत राहून ब्रिटिश सरकारला जेरीस आणणारे क्रांतिवीरहि प्रकट झाले. जिकडेतिकडे त्यांच्या स्वागताचे व सत्काराचे टोलेजंग समारंभ साजरे होऊं लागले!

या क्रांतिवीरांचें ता. १२ मे १९४६ रोजीं किर्लोस्करवाडींत आगमन झालें. त्यांच्या स्वागतार्थ रस्त्यावर मोठ्या कमानी उभारण्यांत आल्या होत्या व एक खास मंडप घालण्यांत आला होता. सभेला हजारों प्रेक्षक हजर होते.

या मंडळींचें स्वागत झाल्यावर भूमिगत चळवळींचे सूत्रधार श्री. नाना पाटलांनीं, आपल्या कार्याला जनतेनें कसें साह्य केलें याची थोडक्यांत माहिती दिली व त्याबद्दल सर्वांचे आभार मानले. नंतर आपल्या एकेका सहकाऱ्याला पुढें बोलावून त्याचा परिचय करून दिला व त्यानें बजावलेल्या पराक्रमाचें थोडक्यांत पण चटकदार वर्णन केलें. प्रत्येकाचें वर्णन पुरें होतांच कारखान्याचे चालक त्या कार्यकर्त्याच्या गळ्यांत हार घालून त्याच्या हातांत गुच्छ देत. त्याबरोबर प्रेक्षकांतून टाळ्यांचा कडकडाट होई व दुसरा क्रांतिवीर पुढें येई.

हा परिचयविधि चालू असतां एक नवा वीर पुढें आला. त्याच्याकडे पाहात नाना पाटील म्हणाले—" या गड्याची तुम्हांला ओळख कशाला करून द्यायला हवी? तो तुमच्यांतलाच आहे व त्यानं आपली कामगिरीहि तुमच्या डोळ्यांदेखत इथंच पार पाडली आहे."

चालकांनीं त्याच्या तोंडाकडे पाहिलें...तों किर्लोस्करवाडींत भरदिवसा बँकेच्या शिपायांवर हल्ला करून साडेबावीस हजार रुपयांची लूट करणारा कामगार त्यांच्यापुढें उभा! त्याच्याकडे पाहून मालक किंचित् हसले व त्यांनीं त्याच्याहि गळ्यांत हार घातला।

बाहेरच्या जगांत कोणत्याहि कारणामुळें दंगल सुरू झाली म्हणजे त्या भागांत कारखाना चालविणाऱ्याला किती अवघड व आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड द्यावें लागतें याचें हें एक प्रत्यक्ष चित्र आहे. त्यावरून आपोआप हेंहि लक्षांत येईल, कीं अशा वेळीं या धकाधकीच्या मामल्यापासून अलिप्तपणें आपलें काम करीत राहायची त्या कारखानदाराची कितीहि इच्छा असली, तरी तें अशक्य होऊन बसतें!

### किर्लोस्करवाडीचा निरोप!

हा कारखाना सुरू करण्यास लक्ष्मणरावांना हाडाचीं काडें कशीं करावीं लागलीं, त्या कारखान्यापासून सर्वांचें कल्याण करण्यासाठी त्यांचे कसे प्रयत्न चालू आहेत, तसेंच या कारखान्यापासून देशाचा किती लाभ आहे, याची कामगार-पुढाऱ्यांना काय कल्पना? आणि ती कल्पना असली तरी त्याचा उच्चार ते थोडेच कामगारांपुढें करणार? त्यांचे मुद्दे ठरलेले! त्यांचे खरे कैवारी कोण असतील तर हे पुढारी! तेव्हां पुढारी सांगतील तसें वागून मालकांना वठणीवर आणायला कामगारांनीं कंबर बांधायची हेंच त्यांचें काम! हीं भाषणें ऐकून लक्ष्मणराव फार हवालदील होत.

लवकरच या सर्वांवर कडी करणारा एक अतिशय अनुचित प्रकार घडला. एका वक्त्यानें भर सभेंत लक्ष्मणरावांच्या तोंडावर त्यांना उपमर्दकारक होतील असे उद्गार काढले. बोलतांना त्याचा तोल अजीबात सुटला. त्याचे प्रलाप ऐकून सारे कामगारसुद्धां चकित झाले! लक्ष्मणरावांच्या तर तळपायाची आग मस्तकाला गेली! ते थेट घरीं आले व आपल्या खोलींत जाऊन स्वस्थ बसले!

" इथलीं सूत्रं तुम्हांला जमतील तशीं संभाळा. मी आज संध्याकाळीं येथून निघणार आहें. मी परत किर्लोस्करवाडीला येणार नाहीं हेंहि सांगून ठेवतों." असें त्यांनीं सांगितलें आणि त्याप्रमाणें संध्याकाळच्या एक्सप्रेसनें ते हरिहरला निघाले. त्यांना पोंचवायला दोघांतिघा निकटवर्तीयांशिवाय कोणी निराळें माणूस नव्हतें. किर्लोस्करवाडीचा ते निरोप घेत होते, पण ना हार ना तुरे!

याच ठिकाणीं २६ वर्षांखाली त्यांनीं पाऊल ठेवलें तेव्हां निवडुंगानें भरलेल्या एका निर्जन माळाशिवाय डोळ्याला काय दिसत होतें? त्याच जागेला आज किती रम्य व भरभराटीचें स्वरूप आलें होतें! आणि ही सारी किमया ज्यांच्या ध्येयवादांतून, कल्पकतेंतून आणि अविश्रांत मेहनतींतून निर्माण झाली ते या सर्वांना मागें ठेवून एकटेच बाहेर पडले होते! " कर्मण्येऽवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन!"

लक्ष्मणरावांनीं फिरून चार वर्षे वाडीचें तोंड पाहिलें नाहीं! इतक्यांत १९५० साल आलें. वाडीचा हा ४० वा वाढदिवस लक्ष्मणरावांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या कडाक्यानें साजरा करण्याचें चालक–कामगारांनीं योजिलें व त्याप्रमाणें "पप्पांना" कळकळीची विनंती करून समारंभासाठी आणण्यांत आलें.

लक्ष्मणरावांचें स्वागत व वाडीच्या वाढदिवसाचा समारंभ अपूर्व उत्साहानें पार पडल्यावर लक्ष्मणराव परत निघाले. त्यापूर्वी त्यांनीं कारखान्यांतल्या प्रत्येक खात्यांतून फेरफटका करून तिथल्या कामकाजाची पाहणी केली व कामगारांची प्रेमानें पाठ थोपटली. त्यांचा असा प्रेमाचा स्पर्श झाला म्हणजे कामगारांच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहात!

कायद्यानें माणुसकीवर केवढाहि मोठा घाला घातला तरी तो तिचा समूळ उच्छेद करूं शकत नाहीं, हें सुदैव.

# भारताला नियोजनाबद्दल आलेला अनुभव

( भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी. )

आपल्या देशांत रचनात्मक कार्यक्रम सुरू होऊन आतां ७॥ वर्षे पूर्ण झालीं आहेत व उद्दिष्टाप्रमाणें नियोजनाचें कार्य देशांत मोठ्या प्रमाणांत चालू आहे. आतांपर्यंत झालेल्या कार्याचा बारकाईनें विचार केला असतां कांहीं गोष्टी स्पष्टपणें दिसून येतात. त्यांचा थोडक्यांत आढावा या लेखांत घेतला आहे.

रचनात्मक कार्यक्रम भारतांत नवीनच असला तरी या दृष्टीनें वैचारिक भूमिका १९४० पासून हळूहळू तयार होत गेली होती. ती अशी कीं, काँग्रेसनें नेमिलेल्या नियोजन कमिटीनें पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली, नियोजनाबद्दल कांहीं विस्तृत अहवाल प्रसिद्ध केले होते. या अहवालांतून खूपच उपयुक्त माहिती आढळते. त्याहिपूर्वी, १९३७चे सुमाराला सुप्रसिद्ध इंजिनिअर व अर्थशास्त्रज्ञ सर विश्वेश्वरय्या यांनीं भारतांत औद्योगिक विकास कोणत्या प्रकारांनीं घडवून आणावा याबद्दल स्वतंत्र पुस्तकरूपानें आपलीं मतें व्यक्त केलीं होतीं. यंत्रसामुग्री तयार करण्याचा धंदा व इतर मूलभूत धंदे यांवर भर द्यावा व त्याचबरोबर खेडेगावांतून विजेच्या उपयोगानें बैठे धंदे सुरू करण्यांत यावे, असा सर विश्वेश्वरय्या यांच्या विचारसरणीचा मुख्य आशय आहे. दुसरें महायुद्ध चालू असतांनाच देशांतील भांडवलदारांनीं औद्योगिक विकासाची एक मोठी योजना १९४४ चे सुरुवातीला जाहीर केली. ती 'टाटा बिर्ला योजना' किंवा 'मुंबई योजना' म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच वेळीं नंतर समाजवाद्यांनीं आपली 'लोक योजना' जाहीर केली व प्रो. आगरवाल यांनीं गांधीजींच्या विचारसरणीवर आधारलेली योजना प्रसिद्ध केली. याच वेळीं नियोजनाबद्दल खासगी पातळीवरून चर्चा चालू असतांना ब्रिटिश सरकारनें प्रत्येक जिल्ह्यांत विकास कार्याच्या दृष्टीनें कांहीं खर्च कसा केला जावा याचा अंदाज करून कामालाहि थोडीशी सुरुवात केली होती व त्या वेळच्या मध्यवर्ती सरकारांत यासाठी एक खातेंहि उघडण्यांत आलें होतें.

### पहिल्या योजनेच्या यशाचें रहस्य

नियोजन मंडळानें तयार केलेली पहिली पंचवार्षिक योजना साधारणपणें सर्वांनाच मान्य होईल अशा स्वरूपाची होती व नियोजन मंडळानेंहि देशांतील प्रत्येक राजकीय पक्षाची विचारसरणी काय आहे हें नंतर समजावून घेतलें होतें. शेतीचा प्रश्न कसा सोडवावा याबद्दलची नियोजन मंडळाची विचारसरणी अगदीं योग्य अशीच होती व ग्रामीण विकास–योजनांमागील कल्पना एकप्रकारें अगदीं अभिनव होती.

पहिली पंचवार्षिक योजना एकंदरींत यशस्वी झाली असें सांगितलें जातें. खर्चाबद्दल या काळांत कोणतीच अडचण भासली नाहीं व बहुतेक सर्व गोष्टी मूळच्या अंदाजाप्रमाणें घडून आल्या. परंतु योजना यशस्वी झालेली दिसली याला एक मुख्य कारण पहिल्या योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत पाऊस चांगला पडल्यामुळें शेतीचें उत्पादन वाढलें व याचें श्रेय योजनेला जणू कांहीं मिळालें. खर्च करण्याच्या बाबतींत तर इतकी सुस्थिति होती कीं, एकूण मिळालेल्या रु. ३७८ कोटि परकी मदतीपैकी रु. १३० कोटि पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर शिल्लकच राहिले. विशेषतः स्त्रियांच्या बाबतींत कार्य करण्यासाठी ठेवलेला पैसा कोणत्याच संस्थेकडून मागणी न आल्यामुळें तसाच पडून राहिला.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत कर-वाढ, कर्जें व अल्पबचत योजना या मार्गांनीं नियोजन मंडळाच्या अपेक्षेप्रमाणें पैसा उभारतां आला व शेवटच्या वर्षांत बिनतारणाच्या नोटा प्रसृत करण्याचाहि प्रयोग सुरू झाला. शेतीचें उत्पादन निसर्गाच्या कृपेमुळें वाढल्यामुळें एक महत्त्वाचा प्रश्न सोडविण्यांत यश आलें असा भास झाला. ग्रामीण विकास-योजनांना १९५२ अखेरच सुरुवात झाल्यामुळें मार्च १९५६ पर्यंत याहि बाबतींत कार्याला व्यवस्थित सुरुवात झाली असें दिसून आलें.

या माहितीवरून पहिल्या पंचवार्षिक योजनेचें बरेंचसें यश दोन वर्षे चांगला पाऊस पडला या गोष्टीकडे जातें. कर-वाढ, कर्जें व अल्पबचत योजना आणि बिनतारणाच्या नोटा या गोष्टींना सुरुवातच असल्यामुळें याहि बाबतींत यश आलें. १९५१ च्या कोरियन प्रकरणानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थिति समाधानकारक राहिल्यामुळें परदेशांकडून भारताला अपेक्षेप्रमाणें मदतहि मिळूं शकली.

### गेल्या अडीच वर्षांतील अनुभव

परंतु नियोजनाच्या बाबतींत कांहीं निश्चित अनुभव येऊं लागला व अडचणी उपस्थित होऊं लागल्या त्या गेल्या २॥ वर्षांत. एकतर दुसरी पंचवार्षिक योजना खर्चाच्या दृष्टीनें पहिल्या योजनेच्या सव्वादोन पट असल्यामुळें सुरुवातीच्याच वर्षापासून खर्चाचें प्रमाण वाढवावें लागलें तें इतकें कीं, योजनेच्या तिसऱ्या वर्षांत म्हणजे १९५८–५९ मध्यें खर्च रु. ९६० कोटि करावा लागणार आहे. पहिल्या तीन वर्षांत, १९५६–५९ मध्यें, योजनेबद्दल एकूण सरकारी खर्च रु. २४५६ कोटि होणार आहे व या खर्चाचा ताण भारताच्या अर्थव्यवस्थेवर पडत आहे याचा स्पष्ट उल्लेख व इशारा रिझर्व्ह बँकेच्या थोडे दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या १९५७–५८ च्या ताज्या वार्षिक अहवालांत आढळतो. अन्नधान्याच्या किंमती गेल्या दीड वर्षांत १५ टक्के किंवा कांहीं बाबतींत त्याहूनहि जास्त वाढल्या आहेत. सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतींचा निर्देशांक फेब्रुवारी १९५८ मध्यें १०४ पर्यंत उतरला होता तो अगदीं अलीकडे सतत वाढत जाऊन ११६ पर्यंत चढला आहे. पोस्टल सेव्हिंग बँकांतील निव्वळ नवीन ठेवींचे १९५६, १९५७ व १९५८ या तीन वर्षांचे नुकतेच प्रसिद्ध झालेले आंकडे अनुक्रमें रु. ३२ कोटि, रु. २८ कोटि, व रु. १६ कोटि याप्रमाणें आहेत. या सर्व माहितीवरून सामान्य जनतेची क्रयशक्ति सारखी कशी घटत चालली आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. १९५७ च्या अंदाजपत्रकांत रु. ९० कोटींची करवाढ एकदम करण्यांत आली व ती सामान्य जनतेला जाचक होत आहे. सरकारचें धोरण साखर, तंबाखू, काड्यापेट्या इ. जीवनोपयोगी वस्तूंवरील उत्पादनावरील जकाती वाढविण्याचें आहे. १९५७–५८ या आर्थिक वर्षांत सर्व तऱ्हेच्या जकातींचें उत्पन्न सुमारें रु. ४५२ कोटि आलें, त्यांत रु. २७२ कोटि उत्पन्न केवळ उत्पादनावरील जकातीं-

ही दिवाळी बँकेचे भागदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाची जावो!

# दि कराड अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

स्थापना १४।१।१९१७] [फोन नं. ४३

गेलीं कित्येक वर्षें सतत 'अ' वर्गांत असलेली कराडांतील सर्वांत जुनी बँक.

अध्यक्षः—श्री. विश्वनाथ कृष्णराव तांबवेकर,
बी. ए., एलएल. बी., वकील.

| | |
|---|---|
| खेळतें भांडवल | रु. ४०,४७,००० चे वर |
| ठेवी | रु. ३३,३८,००० चे वर |
| भाग भांडवल | रु. १,४४,६०० चे वर |
| गंगाजळी | रु. १,४५,४०० चे वर |
| इतर निधि | रु. ३,५६,००० चे वर |

बँकेचीं वैशिष्ट्यें

(१) स्वल्प संचय ठेवीची योजना
(२) अद्यावत् तिजोरी घर
(३) विद्यार्थ्यांना सहकार शिक्षण देण्याची दक्षता.

शिवाय ड्राफ्टस्, हुंड्या, रेल्वे रिसिटस्, कर्ज वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार कसोशीनें केले जातात. सविस्तर माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा.

कराड, २५-१०-१९५८ — शंकर पु. कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर.

ही दीपावलि बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो!

# जनता सहकारी बँक लिमिटेड

८६६ सदाशिव पेठ, पुणें २.
फोन नं. ६६४३

शाखाः—घोले रोड, शिवाजीनगर, पुणें ५.
फोन नं. ७७९६

सेव्हिंगचा दर : द. सा. द. शें. दोन टक्के

अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

नॅशनल सेव्हिंग प्लॅन सर्टिफिकेटस् हप्त्यानें खरेदी करण्याची अभिनव योजना.

★ मध्यम व गरिबांसाठी आकर्षक बचत योजना.
★ कार्यक्षम व तत्पर व्यवस्थापक-मंडळाची देखरेख.
★ रेल्वे रिसीट, हुंड्या, चेक्स, वगैरे वसुलीची व्यवस्था.
★ शेअर्स खरेदी, विक्री, वगैरे व्यवहाराची सोय.

याशिवाय अद्यावत् बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

द. शं. जमदग्नि, मॅनेजिंग डायरेक्टर

# पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन
## सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें

स्थापना १९१४] ७३ बुधवार पेठ, पुणें २. [टेलि. नं. ७१५६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १,६९,६७० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७०,८२१ |
| खेळतें भांडवल | रु. १३,००,००० |

मा. सल्लागारमंडळ : (१) मा. कृ. द. घारमळकर, अध्यक्ष (२) मा. वि. द. नवले, उपाध्यक्ष (३) मा. रा. द. भट, बी. ए., एल. एस. जी. डी. (४) मा. बा. द. शिंदे, (५) मा. सि. धों. आवनावे.

मा. कार्यकारी मंडळ : (१) मा. पां. ग्रो. सोनवणे, कार्याध्यक्ष (२) मा. रा. ता. कांबळे, उपकार्याध्यक्ष (३) मा. ना. धों. भोकरे (४) मा. न. रा. कोतवाल, एल. एस. जी. डी. (५) मा. दि. धों. कुन्हाडे, हिंदी पारंगत (६) मा. द. ना. कुंभार (७) मा. आं. ब. टण्णू (८) मा. भि. वि. पाटील, एल. एस. जी. डी. (९) मा. म. चिं. तिखे (१०) मा. प. ना. जाधव (११) मा. प्र. ग. ठोसर, एल. एस. जी. डी.

या बँकेंत सभासद काटकसर फंडाची एकूण रक्कम रु. ७,३०,००० पर्यंत म्हणजे खेळत्या भांडवलाच्या ५५ टक्के रक्कम सभासदांचीच आहे हें वैशिष्ट्य आहे.

बँकेंत सभासद व बिगर सभासद यांच्या सेव्हिंग्ज, चालू, हस्तेबंद ठेवी व मुदत ठेवी स्वीकारल्या जातात.

इतर बँकिंगचे सर्व व्यवहार करण्यांत येतात.

नारायण कृष्ण कुलकर्णी, मॅनेजर.

महाराष्ट्रांतील नागरी सहकारी चळवळीमध्यें कित्येक वर्षें लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली आदर्श नागरी सहकारी संस्था.

# दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

पंढरपूर (जि. सोलापूर)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शेअर भांडवल | रु. | ७१,५१० |
| २ | रिझर्व्ह फंड | रु. | ७२,४३१ |
| ३ | इतर फंड्स | रु. | ६५,५१६ |
| ४ | ठेवी | रु. | ११,५२,०१२ |
| ५ | सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम | रु. | ४,८०,७९१ |
| ६ | खेळतें भांडवल | रु. | १३,६१,४६९ |

या बँकेंत मुदतीच्या ठेवी, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जे दिलीं जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

तसेंच सभासदांमध्यें बचतयोजनेचा प्रचार करणेचे दृष्टीनें या बँकेंत "सभासद प्रॉव्हिडंट फंड" पद्धति सुरू केली असून, सभासदांचे आजारीपणांत उपयुक्त अशीं उपकरणें पुरविणेकरितां "रुग्णसहाय्यक शाखा" उघडली आहे.

दागदागिने, मौल्यवान् वस्तु व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी "सेफ डिपॉझिट लॉकर्सची" व्यवस्था या बँकेंत आहे.

तरी गरजूंनीं अवश्य फायदा घ्यावा.
जास्त माहितीकरितां ऑफिसकडे लिहा.

पं. रा. कुलकर्णी, जी. डी. सी. अँण्ड ए., मॅनेजर. — औ. ह. कवठेकर, चेअरमन.

पासून मिळालें. म्हणजे, सामान्य जनतेवर दरवर्षी सरसकट प्रत्येकीं रु. ८ या प्रमाणांत उत्पादनावरील जकातींचा भार पडतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दरवर्षी अल्पबचतींपासून रु. १०० कोटि व खुल्या बाजारांतील कर्जांपासून रु. १४० कोटि उभारतां आले पाहिजेत. परंतु १९५७-५८ वर्षी कर्जांपासून रु. ६६ कोटि व अल्पबचतींच्या द्वारें रु. ६९ कोटि उभारतां आले. हे सर्व आंकडे सामान्य जनतेची क्रयशक्ति घटत जात आहे हें स्पष्टपणें दाखवितात. खासगी क्षेत्रांत १९५७-५८ या वर्षी एकूण नवीन भांडवल रु. ७१ कोटि जमा झालें. भांडवलाचें हें प्रमाणहि अगदीं अपुरें आहे.

**नियोजनाचें यश वाढतें उत्पादन, सुधारत जाणारी सामान्य जनतेची क्रयशक्ति, वाढती शिल्लक व उत्पादनाच्या कार्यांत वाढत्या प्रमाणांत भांडवल गुंतवणूक, या गोष्टींवर अवलंबून असतें.**

या दृष्टीनें विचार केला असतां फक्त उत्पादन वाढत आहे या एका बाबतींत कांहींशी समाधानकारक परिस्थिति आढळते, परंतु इतर तीनहि बाबतींतला गेल्या दोन वर्षांतला अनुभव उत्साहजनक नाहीं. औद्योगिक उत्पादन सामान्यपणें वाढत असलें तरी १९५७-५८ मध्यें त्यांत वाढ ३.५ टक्के झाली. पूर्वीचीं दोन वर्षें ७ ते ८ टक्के या प्रमाणांत वाढ होत होती. भारतांतला सर्वांत जुना यांत्रिक सुती कापड धंदा अतिशय अडचणीच्या काळांतून जात आहे व कांहीं गिरण्या बंद ठेवाव्या लागल्यामुळें सुमारें ३० हजार कामगार बेकार झाले आहेत. स्टेनलेस स्टीलचीं भांडीं तयार करण्याचा धंदा, स्टेनलेसचे पत्र्याच्या आयातीला परवानगी नसल्यामुळें हळू हळू बंद पडण्याच्या मार्गावर आहे. कलकत्त्याच्या बाजूला इंजिनिअरिंग मालाचें उत्पादन करणारे कारखाने, आयात मालाच्या अभावीं, कांहीं प्रमाणांत बंद पडले आहेत. साखरेचें उत्पादन वाढून थोडीशी साखर निर्गत होत असली तरी ती दर टनामागें रु. १० नुकसान सोसून निर्गत करावी लागत आहे. १९५७-५८ या वर्षी परराष्ट्रीय व्यापारांत अतिशय प्रचंड म्हणजे रु. ३२१ कोटि तूट आली आहे. लंडनमधील स्टर्लिंग शिल्लक १९४७ मध्यें रु. १,६१२ कोटि होती ती सप्टेंबर अखेर फक्त रु. १६९ कोटि उरली आहे. अन्नधान्य वर्षाला निदान रु. १२५ कोटि इतक्या किंमतीचें आणखी कांहीं वर्षें आयात करावेंच लागणार. उच्च पातळीवरून निर्गत वाढविण्याचे प्रयत्न चालू असले तरी त्यांत ५टक्क्यांहून जास्त यश येण्याचा संभव नाहीं. यंत्रसामुग्री, अन्नधान्य, यंत्रांचे सुटे भाग इ. आयात आवश्यकच असल्यामुळें आयातहि मोठ्या प्रमाणांत कमी करतां येणार नाहीं. यामुळें आणखी कांहीं वर्षें परराष्ट्रीय व्यापार तुटीचाच होत राहील व परकी चलनाची चणचण तीव्रतेनें जाणवत राहील.

एकाच बाबतींत समाधानकारक परिस्थिति आढळते. ही गोष्ट म्हणजे परदेशांकडून मिळणारी मदत. आतांपर्यंत परदेशांकडून रु. ८१२ कोटि मदत मिळाली आहे, व आणखी मदत मिळण्याबद्दल एकंदर वातावरण अनुकूल दिसत आहे. परंतु याला कारण म्हणजे तिसऱ्या महायुद्धाचा धोका इतक्यांतच नाहीं, ही गोष्ट. अमेरिकेंत पुन्हा गेले कांहीं महिने तेजीचें वातावरण आहे, पश्चिम जर्मनी, ब्रिटन, अमेरिका इ. देशांत उत्पादन मोठ्या प्रमाणांत होत आहे, व भारताच्या पंचशीलेच्या धोरणावर अमेरिका, इंग्लंड यांचाहि कांहीं प्रमाणांत विश्वास आहे. परंतु परराष्ट्रीय कर्जांच्या बाबतींत फार प्रमाणांत अवलंबून राहणें परिणामी धोक्याचें ठरतें व १९५८-५९ या आर्थिक वर्षापासूनच कांहीं जुन्या कर्जांच्या परतफेडीला सुरुवात व्हावयाची आहे. परदेशांच्या कर्जांवर व्याजहि सुमारें सहा टक्के इतकें पडतें.


### निष्कर्ष

सारांश, अन्नधान्याचें अपुरें उत्पादन, परराष्ट्रीय व्यापारांतील वाढती तूट, कर्जें, अल्पबचत योजना व नवीन भांडवल गुंतवणूक या बाबतींत असमाधानकारक परिस्थिति, अशा गोष्टी दिसत आहेत. आणखी कर-वाढ कदाचित् करतां येईल पण ती जनतेला झेपण्यासारखी नाहीं. गेल्या दोन वर्षांतच रु. ७०२ कोटि विनतारणाच्या नोटा प्रसृत करण्यांत आल्या व चालू वर्षी आणखी रु. २१५ कोटि किंमतीच्या नोटा प्रसृत केल्या जातील. परंतु या मार्गांनीं वस्तूंचे बाजारभाव वाढावयास मदत होते. पोलादाचें उत्पादन तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आणखी वाढवूं नये असा गंभीर इषारा श्री. जे. आर. डी. टाटा यांनीं ता. १८ सप्टेंबर रोजीं टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या वार्षिक सभेच्या वेळीं दिला, तो सरकारनें अवश्य ध्यानांत घेतला पाहिजे. कारण पोलाद मुळींच निर्गत करतां येणार नाहीं व पोलादावर अवलंबून असणारे यंत्रसामुग्री तयार करण्याचे व मोटारी सायकली तयार करण्याचे धंदे वाढविणें आवश्यक आहे, अशी श्री. टाटांची सूचना आहे. भारत सरकारचें कर्ज मार्च १९५८ अखेर रु. ४,२१६ कोटि झालें आहे व सर्व राज्य सरकारांचें कर्ज रु. १,७४९ कोटि झालें आहे. गेल्या १० वर्षांत सरकारी कर्जांत दुपटीहून कितीतरी जास्त वाढ झाली आहे. ग्रामीण विकास-योजनांवर केला जाणारा खर्च किती प्रमाणांत उपयुक्त ठरतो किंवा ग्रामीण जनतेपर्यंत जाऊन पोंचतो हाहि एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. धरणांचें पाणी व मिळूं शकणारी वीज, क्रयशक्तीच्या अभावीं, सामान्य शेतकरी व ग्रामीण जनता विकत घेऊं शकत नाहीं, असाहि अनुभव येत आहे.

याप्रमाणें गेल्या २-२॥ वर्षांत नियोजनाबद्दल व्यावहारिक स्वरूपाचा अनुभव येत आहे. शेतीचें उत्पादन वाढविणें हाच योजनेचा गाभा आहे ही गोष्ट आतां पंडित नेहरूंनाहि मान्य झाली आहे. परंतु उत्पादन वाढवावयाचें कसें हा एक प्रश्न आहे. तसेंच भांडवल गुंतवणूक व कर्जें व अल्पबचत योजनेंतील यश व वाढतें औद्योगिक उत्पादन, याहि गोष्टी योजनेच्या यशासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

---

"शुभचिंतन"
चालू दीपावलि व नवीन वर्ष सर्व भारतीयांना सुखाचें व भरभराटीचें जावो.
वामन गणेश हरचेकर, प्रायव्हेट लिमिटेड
चांदी, सोनें व जवाहिराचे व्यापारी.
आमच्या नांवाच्या चोख ९७ नं. सोन्याच्या "अंजलि" छाप ।, ॥ व १ तोळा वजनाच्या




लगडी नेहमीं तयार मिळतात.
केळकर रोड, दादर, मुंबई नं. १८. [ टेलिफोन नं. ६०४२८

आमचे भागीदार, हितचिंतक आणि ठेवीदार यांना ही दिवाळी सुखाची जावो !

# दी जमखंडी अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

जमखंडी, शाखा : बनहट्टी
( स्थापना सन १९४० )
केवळ आठरा वर्षांत झालेली लोभनीय प्रगति !

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | २,०५,६६० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | २,७६,९६३ |
| ठेवी | रु. | १९,८८,७८५ |
| खेळतें भांडवल | रु. | २१,९८,९४१ |
| ठेवीवरील व्याजाचा दर | | १½% ते ५½% |
| कर्जावरील व्याजाचा दर | | ५½% ते ९% |
| ऑडिट वर्ग | | 'अ'. |

—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—
भागीदारांना डिव्हिडंड ५ ते ६½ टक्के दरानें वाटलें जातें. ५½% दराच्या पंचवार्षिक कॅश सर्टिफिकेटांचीहि सोय आहे.

एस. एम. अथणी, चेअरमन.
म. द. खाडिलकर, मॅनेजर.

रजिस्टर नंबर ७२९८ स्थापना १९३५

# सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह
## लँड मॉर्गेज बँक, लि. कराड

शाखा :–सांगली–फलटण–इस्लामपूर.

## शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळे होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,४०,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २०,५०,००० |
| वांटलेलें कर्ज ,, | रु. | २९,००,००० |
| चालू नफा | रु. | १५,००० |

म. सि. पुदाणी, मॅनेजर.
नीलकंठ आण्णाप्पा कल्याणी, चेअरमन.

# धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुति गल्ली, बेळगांव
( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

बेळगांव, धारवाड, कारवार व विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी

## मुंबई कर्नाटकांतील प्रमुख बँक

जी. डी. सराफ
चेअरमन

*************************************

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो !

# दि मिरज स्टेट बँक, लिमिटेड, मिरज

( स्थापना १९२९ )
शेड्यूल्ड बँक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अधिकृत भांडवल | रु. | २५ लाख |
| २ | विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १२ लाख |
| ३ | वसूल भांडवल | रु. | ६ लाख |
| ४ | रिझर्व्ह फंड व इतर फंड | रु. | ७ लाखांचे वर |
| ५ | खेळतें भांडवल | रु. | ९० नव्वद लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा : पंढरपूर, कुर्डूवाडी, वार्शी, करमाळा, लक्ष्मेश्वर व सांगली.
ही दिवाळी व नवें वर्ष आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक ह्यांना उत्कर्षाचें जावो.

श्री. एन. पी. कानिटकर, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# ग्रामीण कर्जपुरवठा आणि हिंदी बँकिंग

( बी. वेंकटप्पय्या, डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया )

ग्रामीण कर्जपुरवठा ह्या विषयासंबंधीं चार वर्षांपूर्वी एका कमिटीनें आपला अहवाल पुरा केला. ह्या कमिटीचा मी एक सभासद होतों. भारतामधील एकूण जिल्ह्यांच्या एकचतुर्थांश, म्हणजे जवळजवळ ७५ जिल्ह्यांतील अनेक खेड्यांमधून प्रस्तुत विषयासंबंधीची आंकडेवार माहिती गोळा करून तपासणी करण्यांत आली. सुमारे एक लाख पंचवीस हजार ग्रामीण कुटुंबांच्या ह्या कामासाठी मुलाखती घेण्यांत आल्या. जागोजाग चवकशी करून माहिती गोळा करण्यास एका वर्षापेक्षा अधिक काळ लागला. पेरणीपासून मळणीपर्यंतच्या आणि नंतर माल बाजारांत नेण्याच्या सर्व अवस्थांची पहाणी करण्यांत आली. ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हेतर्फे तयार करण्यांत आलेला हा अहवाल आहे. ग्रामीण भागांतील कर्जाच्या पुरवठ्यासंबंधींची परिस्थिति अजमावण्याचा मोठ्या प्रमाणावरील हा पहिलाच शास्त्रीय प्रयत्न होता; म्हणून, अहवालांत काढण्यांत आलेल्या निष्कर्षांना महत्त्व आहे. त्यासंबंधीं लिहितांना मी फक्त शेती-पुरतेंच लिहिणार आहें. कुटिरोद्योग अगर ग्रामीण जीवनांतील इतर आर्थिक हालचाली ह्यांच्याबद्दल लिहिणार नाहीं.

## शेतकऱ्यांची कर्जाची गरज

शेतकऱ्याला किती कर्जाची आवश्यकता असते, किंवा अधिक काटेकोरपणानें बोलावयाचें तर त्याला किती कर्ज मिळूं शकतें हा पहिला प्रश्न. अहवालाच्या वेळीं भारतामधील शेतकऱ्याला दरसाल ७५० कोटी रुपयांच्या कर्जाची आवश्यकता लागत होती. ह्या आंकड्यांत अल्प, मध्यम व दीर्घ अशा सर्व मुदतीच्या कर्जाचा अंतर्भाव होतो. १९५१–५२ सालची ही परिस्थिति आहे. आज हा आंकडा साधारणत: १,००० कोटी रुपयांच्या आसपास असण्याचा संभव आहे. ही रक्कम मोठी आहे. अर्थातच आंकडा अगदीं बरोबर नाहीं. पण त्यानें कर्जाच्या प्रमाणाची कल्पना येते. अधिक निश्चित कल्पना करून घ्यावयाची तर असें म्हणतां येईल कीं भारतामधील सर्व राज्यसरकारांच्या महसुली अंदाजपत्रकांच्या एकूण रकमेच्या सुमारें दीडपट असा हा आंकडा आहे. ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. कारण भारतांत शेती हा अजूनहि एकच एक फार मोठा धंदा आहे. ही शेती बहुतेक भागांत व बहुतेक शेतकऱ्यांच्या दृष्टीनें जेमतेम गरजेपुरतें अगर गरजेपेक्षाहि कमी उत्पादन करणारी आहे. राष्ट्राच्या एकूण उत्पन्नापैकी निम्में उत्पन्न शेतीच्या व्यवसायाचें आहे. देशांतील ७० टक्के लोकांचा शेती हाच आधार आहे. दुसऱ्या कोणत्याहि उद्योगधंद्याप्रमाणें शेतीच्या धंद्यांतील उत्पादक हालचाली नुसत्या चालू ठेवण्यासाठींहि खेळत्या भांडवलाची आवश्यकता असते. सुधारणा व विकास करण्यासाठी व इतर कामासाठी शेतीला मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाची जरूर असते.

## कर्जपुरवठा कसा होतो ?

शेतीसाठी लागणारा हा पैसा कोठून व कसा आणावा हा दुसरा प्रश्न. शेतकऱ्याला कोण लोक कर्ज देतात आणि कोणत्या प्रकारच्या संस्था कर्जाचा पुरवठा करतात ह्यासंबंधीं तपासणींत मोठी बोधप्रद माहिती बाहेर आली. कर्जाच्या पुरवठ्याच्या कामीं धंदेवाईक सावकारांचा अनुक्रम पहिला लागतो. ४५ टक्के कर्जाचा पुरवठा त्यांच्याकडून होतो असें आढळून आलें. त्यानंतर ग्रामीण भागांत सावसावकारी करणारे लोक. त्यांनीं एकूण कर्जाच्या २५ टक्के रक्कम पुरविलेली दिसून आली. ह्यावरून असें स्पष्ट दिसते कीं, शेतकऱ्याला होणाऱ्या कर्जाच्या पुरवठ्यापैकी ७० टक्के पुरवठा धंदेवाईक सावकारांकडून अगर जमीनदार–सावकारांकडून होतो. त्यानंतर इतर धनकोंचे अनुक्रम लागतात. ग्रामीण भागांत शेतमालाचा व्यापारी हा एक महत्त्वाचा धनको आहे. त्याच्याकडून ६ टक्के कर्जपुरवठा झालेला दिसतो. पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, सरकार आणि सहकारी पतपेढ्या ह्यांच्यातर्फे प्रत्येकीं ३ टक्केच कर्जाचा पुरवठा होत असलेला आढळून आला. सर्वांत शेवटीं व्यापारी बँकांचा नंबर लागला. त्यांनीं १ टक्क्यापेक्षाहि कमी कर्जपुरवठा केला. १९५१–५२ सालची ही परिस्थिति आहे. त्यानंतर परिस्थितींत लक्षांत भरण्यासारखी सुधारणा झाली आहे. विशेषत: सहकारी पतपेढ्यांच्या हालचाली वाढल्या आहेत. तरीपण अजूनहि ग्रामीण कर्जपुरवठ्याच्या बाबतींत सावकाराचीच हुकमत चालू आहे.

## सावकारी कर्जांना पर्याय

तपासणीनिमित्त करण्यांत आलेल्या अभ्यासाच्या प्रसंगानें ग्रामीण कर्जपुरवठ्यासंबंधीं उद्बोधक माहिती तर मिळालीच पण त्याचबरोबर कांहीं गमतीदार अभिप्रायहि ऐकायला मिळाले. ह्या बाबतींत मला एका फ्रेंच म्हणीची आठवण होते. म्हण अशी आहे, "फांशी जाणाऱ्याला त्याच्या गळयाभोंवतालच्या दोराचा जसा आधार असतो, त्याच न्यायानें शेतकऱ्याला कर्जाचा आधार असतो." सर्व म्हणींप्रमाणें ह्या म्हणींत कदाचित् अतिव्याप्तीचा दोष असेल. पण, सावकाराकडून होणाऱ्या कर्जाच्या पुरवठ्याला ती लावावयाची झाली तर तींत सत्याचा अंश आहे ह्यांत शंका नाहीं. तपासणींत असें आढळून आलें कीं, कायद्यानें ठरवून देण्यांत आलेल्या व्याजाच्या कमाल दरांचा सावकाराच्या कर्जवाम-व्यवहारावर कांहींच परिणाम झालेला नव्हता. पुष्कळशा जिल्ह्यांतून सावकारांकडून काढण्यांत आलेल्या एकूण कर्जापैकी तीनचतुर्थांश कर्जावरील व्याजाचा दर २५ टक्क्यांहूनहि अधिक होता. पुष्कळशा भागांतून तर व्याजाचा दर ५० टक्क्यांहूनहि अधिक बऱ्याच वेळां आढळून आला. अशा व्यवहारानें उत्पादन अगर उत्पादक ह्यांना कोण-तेंच साह्य होत नाहीं हें उघड आहे. पण, देशाच्या खूप मोठ्या भागांत पुष्कळच शेतकऱ्यांना सावकाराशिवाय दुसरा पर्यायच नसतो. अहवालांत थोडक्यांत म्हटल्याप्रमाणें, भारतांत शेतीला लागणाऱ्या कर्जाचा पुरवठा पुरेसा नाहीं; आहे तो योग्य प्रकारचा नाहीं आणि पुन्हां तो योग्य लोकांपर्यंत पोंचत नाहीं. भारतांत शेतीचें उत्पादन हें असंख्य छोट्या शेतकऱ्यांवर मुख्यत: अवलं-बून आहे. म्हणून ह्या शेतकऱ्यांपर्यंत कर्जाचा पुरवठा पोंचता करील अशा पद्धतीची कर्जपुरवठाव्यवस्थाच उपयुक्त ठरेल. छोट्या शेतकऱ्याला ज्या प्रकारचें तारण देतां येणें शक्य असेल त्याच तारणावर कर्जाचा पुरवठा सुलभतेनें करणारी पद्धतच

येथें योग्य ठरेल. त्याचप्रमाणें ही पद्धत अशी असली पाहिजे कीं ज्या उत्पादक कामासाठी कर्जे देण्यांत येतात त्याच कामासाठी तीं वापरलीं जातात कीं नाहीं ह्यावर योग्य मार्गांनीं देखरेखहि ठेवण्यांत आली पाहिजे. सावकारी पद्धतीच्या कर्जपुरवठाव्यवस्थेला परिणामकारक पर्याय म्हणून संस्थांच्या करवीं कर्जांचा पुरवठा करणारी अशी पद्धत उभारतां येईल कीं नाहीं हाच खरा प्रश्न आहे. पण ह्याचा अर्थ कर्जपुरवठ्यांच्या खाजगी मार्गांची जागा नव्या पद्धतीनें घ्यावी, असा मात्र नाहीं.

## हिंदी बँकिंगकडून अपेक्षा

ही गरज हिंदी बँकिंगनें कितपत भागविली आहे ? कर्जपुरवठ्याची पर्यायी पद्धत उभारण्याच्या कामीं तिनें कांहीं पावलें टाकलीं आहेत काय ? रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें ह्यासंबंधीं तपशीलवार शिफारशी केल्या आहेत. ग्रामीण कर्जपुरवठ्याची पूर्णपणें सुसंगत अशी पद्धति उभारण्याच्या प्रयत्नांत हिंदी बँकिंगकडून मोठी कामगिरी बजावली जाण्याची अपेक्षा आहे, आणि हा प्रयत्न करण्यांतहि येत आहे. ह्या बाबतींत स्टेट बँक ऑफ इंडिआ, सहकारी बँका आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ काम करीत आहेत. १९५२ च्या जुलैच्या पहिल्या तारखेला स्टेट बँकेची स्थापना करण्यांत आली. बँकेचें इंपीरिअल बँक हें नामाभिधान रद्द करून तिचें स्टेट बँकेंत रूपांतर करण्यांत आलें. त्यावेळीं जितक्या शाखा होत्या तितक्याच आणखी शाखा स्टेट बँकेनें गेल्या तीन वर्षांत उघडल्या आहेत. तिच्या विस्ताराच्या कार्यक्रमास अनुसरून आज सर्व देशभर ४५० शाखा आहेत. येत्या दोन वर्षांत आणखी २०० शाखा उघडण्यांत येणार आहेत.

## स्टेट बँकेच्या शाखा

नवीन शाखा अशा भागांत उघडण्यांत आल्या आहेत कीं ज्या भागांत पैसे पाठविण्याच्या, कर्जे देण्याच्या, व इतर द्रव्यविषयक सोयींची आवश्यकता होती. स्टेट बँकेनें आपल्या शाखा उघडल्यापासून स्थानिक बँकर्स व धंदेवाईक सावकार घेत असलेले व्याजाचे दर खालीं येत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत, आणि ग्रामीण भागांत कर्जपुरवठा स्वस्त दरानें होण्यासारखी परिस्थिति निर्माण होत आहे. ग्रामीण भागांत पैसे पाठविण्याच्या सोयी स्वस्त करण्याच्या बाबतींत स्टेट बँक करीत असलेल्या कार्याचा परिणाम व्यापारी बँकांवर झाल्याखेरीज राहणार नाहीं. त्यामुळें व्यापारी बँकांना ग्रामीण भागांत जाणें सोपें जाईल आणि शेतकऱ्याला देण्यांत येणाऱ्या बँकिंगच्या सोयी-सवलतींत भर घालतां येईल. तथापि सर्वसाधारणपणें व्यापारी बँका शेतीच्या मालाच्या तारणावर कर्जे देण्यापुरतेच व्यवहार करतील अशी अपेक्षा आहे. उत्पादक-कर्जांच्या क्षेत्रांत त्या मोठ्या प्रमाणावर उतरतील असें वाटत नाहीं. पेरणीपासून मळणीपर्यंत शेतकऱ्याला साधारणपणें ९ महिन्यांसाठी अशा कर्जांची आवश्यकता असते.

## उत्पादनासाठी कर्जे : सहकारी पतपेढ्या

व्यापारी बँका बहुधा मार्केटिंग लोन्स अथवा शेतमाल बाजारपेठेंत जाईपर्यंतच्या कालापुरतींच कर्जे देण्याचें पसंत करतात. उत्पादनासाठी कर्जे ही शेतकऱ्याची सर्वांत महत्त्वाची गरज आहे आणि ती सहकारी पतपेढ्यांकडून भागविली जाते. सहकारी बँकिंगच्या पद्धतीची सर्व पातळीवर पुनर्घटना करण्याचे उपाय गेलीं कांहीं वर्षे सतत व सर्व बाजूंनीं करण्यांत येत आहेत. प्राथमिक, जिल्हा व अपेक्स ह्या सर्व पातळींना हे प्रयत्न व्यापून आहेत. सहकारी बँकांच्या भाग भांडवलांत राज्य सरकारें पैसा गुंतवीत आहेत. राज्य सरकारांना ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकेकडून कर्जांच्या रूपानें मदत करण्यांत येत आहे. अशा रीतीनें भांडवलाला बळकटी आणण्यांत येत आहे. सहकारी संस्था व खातीं ह्यांना शिक्षण देऊन तयार केलेल्या कारभाऱ्यांचा व नोकरांचा पुरवठा करण्यासाठी सर्व देशभर सहकारविषयक शिक्षण केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. काम करण्याच्या पद्धतींत व संघटनेंत सुधारणा करण्यांत आल्या आहेत. पीककर्ज ही अशी एक सुधारणा आहे. ह्या पद्धतींत शेतकऱ्याला देण्यांत येणाऱ्या कर्जाच्या पैशाची तो काढणार असलेल्या पिकाशीं सांगड घालण्यांत येते. आपला माल तो सहकारी मार्केटिंग सोसायटीला विकण्याचें बांधून घेतो आणि मूळ कर्जाची रक्कम त्या सहकारी संस्थेकडून वसूल करण्यांत येते. ह्या नवीन पद्धतींत शेतकरी हा मुख्यतः उत्पादक म्हणूनच वावरतो व त्याच आधारावर कर्जे मिळवितो. शेतकरी लहान आहे कां मोठा आहे, कूळ आहे कां जमीन मालक आहे, असा प्रश्नच मग उद्भवत नाहीं. अशा प्रकारच्या सुधारणा करण्यांत येत असतांनाच सहकारी पतपेढ्यांची उभारणी द्रुतगतीनें बळकट होत आहे.





खास दिवाळीकरितां

अन्नाचें रहस्य

बेडेकर मसाले, लोणचीं, पापड

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स प्रायव्हेट लि.

दुकानें —मुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें. —

# सहकारी सोसायट्यांना सचेतन कसें करतां येईल ?

## श्री. वैकुंठराय ल. मेहता ह्यांचे विचार

" प्राथमिक सोसायट्यांचा लहान आकार आणि अगदीं दैनंदिन कामासाठींहि विनावेतन कार्यकर्त्यांवर अवलंबन " अशीं दोन कारणें सहकारी चळवळीच्या मर्यादित प्रगतीच्या बुडाशीं आहेत, असें कोऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीनें आपल्या अहवालांत १९४६ मध्यें म्हटलें आहे. ह्या कारणांमुळें व्यवस्थेंत गैरशिस्तपणा आला. ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीच्या चौकशीनेंहि हीच गोष्ट पुनः एकवार स्पष्ट केली. " विनावेतन कार्यकर्त्यांच्या ऐवजीं पगारी लायक सेवकवर्ग नेमावा आणि व्यवहाराची उलाढाल मोठी असावी " अशी कमिटी ऑफ डायरेक्शननें शिफारस केली. एका खेड्यापेक्षा मोठ्या क्षेत्रांसाठी मोठ्या सोसायट्यांची गरज त्यासाठीच आहे.

ज्या सध्याच्या सोसायट्या नीट चालू आहेत, त्या तशाच चालू रहाव्यात असें रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें स्पष्ट केलें होतें. पण नव्या सोसायट्या स्थापतांना मात्र ही दक्षता घ्यावयास हवी.

बचत व ठेवी करण्याची सोय करून काटकसरीला उत्तेजन आणि पुरेशा कर्जाचा सत्वर पुरवठा, ह्या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ह्या दोन्हीं बाबतींत लहान आकाराच्या एका खेड्यापुरत्या स्थापन झालेल्या सोसायट्या यशस्वी झालेल्या नाहींत असें सामान्यतः म्हणावयास हरकत नाहीं; रूरल क्रेडिट सर्व्हे तेंच सांगत आहे. खंडकरी आणि लहान शेतकरी ह्यांना सोसायट्यांचे दरवाजे खुले नाहींत व त्यांना कर्जपुरवठाहि होऊं शकत नाहीं. सर्व उत्पादकांना संघटित स्वरूपाचा कर्जपुरवठा करावयाचें योजिल्यावर लहान उत्पन्नाच्या लोकांना सामुदायिक जबाबदारीच्या भीतीनें त्यांतून वगळून चालणार नाहीं.

ह्यासाठीच, सामुदायिक व अमर्याद जबाबदारीचें तत्त्व सोडून द्यावें लागेल. ह्या तत्त्वाप्रमाणें चालणाऱ्या सोसायट्यांचें कार्यक्षेत्र मर्यादितच असणें जरूर असतें. पण ज्या सोसायटींत सभासदांची जबाबदारी मर्यादित आहे, तेथें कार्यक्षेत्र संकुचित असण्याचें कारण नाहीं.

रिझर्व्ह बँकेनें आपल्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याचे द्वारां मल्टिपर्पज रूरल सोसायट्यांच्या स्थापनेचा पुरस्कार केला, त्याला कितीतरी वर्षें होऊन गेलीं आहेत. मुंबई राज्यांत हें मत १९३८ पासूनच मूळ धरून आहे. मल्टिपर्पज सोसायटीच्या कार्याचें स्वरूप लक्षांत घेतलें, तर तें अमर्याद जबाबदारीच्या तत्त्वास पोषक नाहींच मुळीं. कार्यक्षेत्रहि एकाद्या गांवापुरतें संकुचित राहणार नाहीं. म्हणून, मल्टिपर्पज सोसायटीच्या कार्याचें क्षेत्र तीन ते पांच मैलांच्या त्रिज्येइतकें असावें, हें मत वीस वर्षांपूर्वींच मान्य झालें होतें.

पुरवठा आणि विक्री ह्यांची सांगड दोन कारणांसाठी आवश्यक आहे. ज्यांना तारण देतां येणें अशक्य आहे अशा व्यक्तींना कर्जपुरवठा करावयाचा, म्हणजे त्याचा विनियोग उत्पादक कार्यांकडेच होत आहेना, हें निश्चित करणें जरूरीचें ठरतें; ज्या पिकांसाठी कर्ज दिलें जातें त्या पिकांतून कर्जाची परतफेडहि व्हायला हवी. मालाच्या स्वरूपांत कर्जपुरवठा आणि विक्रीचा संघटनेशीं संबंध जोडणें, ह्या गोष्टी रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें प्राथमिक सोसायट्यांची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीनें सुचविल्या होत्या. बी-बियाणें, खतें, जंतुनाशक औषधें, इत्यादींचा पुरवठा शेतकऱ्यांना करायला हवा. त्यासेरीज नियोजित उत्पादनवाढ कशी होईल ? ह्याला मल्टिपर्पज सोसायटी हेंच सर्वोत्कृष्ट साधन आहे.

भारतांतील परिस्थितींत, सहकारी शेतीच्या सोईस्करपणाविषयीं चाललेल्या चर्चेंत एका मुद्यावर सर्वसाधारणपणें एकमत आहे. शेतीचीं कामें सामुदायिक रीतीनें केलीं तर गोष्ट वेगळी; नाहींतर शेतकऱ्यांना लागणाऱ्या सर्व गोष्टी सहकारी पद्धतीनें पार पाडल्या पाहिजेत हें तरी निश्चित. कार्याचा विस्तार बऱ्याचैकी असेल, तरच हें शक्य होणार. हा आकार किमान केवढा असावा, असा प्रश्न वारंवार विचारला जातो. प्लॅनिंग कमिशनच्या सभासदांनीं त्याचें उत्तर देऊन ठेवलें आहे; त्या संबंधांत पुनः फेरविचार केला जाणार नाहीं अशी आशा आहे. (दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा रिपोर्ट. १० व्या प्रकरणांतील १२ वें व १७ वें प्रकरण )

कांहीं झालें, तरी सध्यांची परिस्थिति कायम राखतां येणार नाहीं. १९५६-५७ अखेर आपल्याकडे १,६१,५१० शेतकी क्रेडिट सोसायट्या होत्या, त्यांच्यांत प्रत्येकींत सरासरीनें ५६, सभासद होते आणि प्रत्येकीचें खेळतें भांडवल सरासरीनें ६,१०० रु. होते. त्यांनीं सरासरीनें ११८ रु. नफा मिळविला व त्यांना वार्षिक व्यवस्थाखर्च १०० रु. आला. आपल्या शेंकडा ८० खेड्यांची लोकसंख्या प्रत्येकी १,००० पेक्षा कमी आहे. तेव्हां शेजार-शेजारचीं खेडीं एकत्रित करून कर्जपुरवठा आणि मालविक्री ह्यांची व्यवस्था कार्यक्षमतेनें करण्याची सोय करणें क्रमप्राप्तच ठरतें.

खेड्यांची एकत्रित जबाबदारीची जाणीव अनेक खेडीं एका गटांत आणल्यानें कमी होईल, असा आक्षेप घेतला जातो. खेडुतांमध्यें अशी जाणीव आज आहे असें वाटत नाहीं. निदान ती भावना प्रबळ तरी खास नाहीं.

आजच्या परिस्थितींत चालू सोसायट्या लहान व असमर्थ असल्यानें, त्या बाहेरील अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीच (सहकारी खातें, मध्यवर्ती बँक अथवा युनियन ) चालतात; दैनंदिन कारभार जवळ जवळ कांहीं नसतोच. बहुतेक राज्यांतून, हिशेबाचें काम बाहेरील संघटनांनीं नेमलेल्या कारकुनांकडूनच करून घेतलें जातें. ह्या संस्था केवळ नांवापुरत्याच स्वायत्त असतात. ह्या स्वायत्ततेचें क्षेत्रहि इतकें मर्यादित असतें, कीं विशेष प्रयत्नांना आणि नेतृत्वाला वावच नसतो.

योग्य आकाराच्या मल्टिपर्पज सोसायटींत कामाला वाव मिळेल; स्थानिक कार्यकर्त्यांना त्यांत आकर्षण्याला क्षेत्रहि विस्तृत असेल. पूर्ण वेळ काम करणारे नेमतां येतील. अर्थात्, हे बाहेरून लादले जावेत, असें कोणीच म्हणणार नाहीं. एकाच खेड्यापुरत्या सोसायटीपेक्षा मल्टिपर्पज सोसायटी स्वायत्त होऊं शकेल; जबाबदारीनें तिचा कारभार चालविणें शक्य होईल.

महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत
अग्रस्थानीं असलेली

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : सन १९१० | हेड ऑफिस : अहमदनगर शहर

शाखाः–१ संगमनेर ( जि. नगर ) २ बेलापूर रोड–श्रीरामपूर ( जिल्हा नगर ) ३ वांबोरी ( जि. नगर. )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,८१,५०० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | ३,३०,५४४ |
| (४) इतर फंड | रु. | ३,११,४३८ |
| (५) चालू ठेवी | रु. | २१,३४,२८३ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ९,५०,८०४ |
| (७) मुदत ठेवी | रु. | २०,६१,०३३ |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ७३,१७,३११ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदीविक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

त्र्यं. वि. निसळ, मॅनेजर — कृ. ज. जोशी, जनरल मॅनेजर — श्री. वि. निसळ, चेअरमन



## नासिक डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना ता. २६ जानेवारी, १९५५

मुख्य कचेरी : १०९३ मेन रोड, नाशिक.

शाखा :— मालेगांव, सटाणा, लासलगांव, घोटी, येवला, सिन्नर, कळवण, पिंपळगांव बसवंत, मनमाड, नांदगांव, नामपूर व चांदवड.

| | | |
|---|---|---|
| खेळतें भांडवल | रु. | १ कोट ४० लाख |
| शेअर भांडवल | रु. | १५ लाख |
| ठेवी | रु. | ७० लाख |

सर्व प्रकारचें बँकिंगचें काम केलें जातें.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

अवघ्या तीन वर्षांच्या अवधींत धडाडीनें प्रगति करीत असलेली व ठेवीदारांच्या आणि सरकारच्या वाढत्या विश्वासास पात्र झालेली सहकारी मध्यवर्ती बँक.

स. ज. बूच, मॅनेजर. — एस्. जी. पुराणिक, चेअरमन.



## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळ:— सकाळीं ९ ते ११–३० व सायंकाळीं ५–३० ते ७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,४८,५८० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १,७९,८४६ |
| ठेवी | रु. | १५,९६,१९८ |
| खेळतें भांडवल | रु. | २०,८३,६९८ |

★ पन्नास वर्षांवर सतत भरीव व चोख कामगिरी.
★ मध्यमवर्गीयांची सोय पाहणारी व विश्वसनीय.
★ सतत ३५ वर्षांवर 'अ' वर्गांत.
★ मध्य वस्तींत प्रमुख ठिकाणीं स्वतःची इमारत.
★ सेफ कस्टडीची व्यवस्था.
★ कर्जेरूपानें आर्थिक मदतीच्या अनेक व्यवस्था.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

नियमासंबंधीं चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह. — वा. रा. होनप, कार्याध्यक्ष. — चिं. वा. भट, अध्यक्ष.



## दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

स्थापना वर्ष सन १९३५

पेण, जि. कुलाबा



( सहकारी कायद्यान्वयें स्थापन झालेली )

| | | |
|---|---|---|
| भागांची संकलित मर्यादा | रु. | १,००,००० |
| खपलेल्या भागांची रक्कम | रु. | ६४,८७५ |
| रिझर्व्ह फंड | रु. | ३७,८६४ |
| खेळतें भांडवल | रु. | ५,५९,२४९ |

*********************
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
*********************

ना. य. नेने, चेअरमन. — व्ही. व्ही. कोठारी, मॅनेजिंग डायरेक्टर.

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक ह्यांना सुखसमृद्धीचें जावो !

# नियंत्रित कर्जपुरवठ्याचा प्रश्न

( डॉ. ए. यू. शेख, आय. ए. एस्., रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज, डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटिंग व रजिस्ट्रार जनरल ऑफ मनीलेंडर्स, मुंबई राज्य. )

१९४६ च्या सावकारी कायद्याच्या अंमलबजावणीचें कार्य फारसें व्यवस्थित रीतीनें होत नाहीं. नव्या मुंबई राज्यांत समाविष्ट करण्यांत आलेल्या भागांचा इतिहास वेगळा होता. त्याचप्रमाणें तेथील सामाजिक व व्यापारी परंपरा वेगळ्या होत्या. शिवाय कायदे वेगळे होते अगर अजिबात नव्हते. नव्या राज्याचा कारभार अद्याप सुसंघटित झालेला नाहीं. त्यामुळें आपल्या सर्व आकांक्षा पुऱ्या झालेल्या नाहींत. उदा. जुन्या मुंबई राज्यांत जिल्ह्यांतून काम करणारे इन्स्पेक्टर्स नुकतेंच नेमण्यांत आले आहेत. त्यापूर्वी हें काम महसूलखातें करीत होतें. विदर्भात सावकारी कायद्याचें काम सब-रजिस्ट्रार्सच्या मार्फत होतें. तेव्हां सावकार कित्येक प्रकारचे गैरव्यवहार करतात ह्यांत आश्चर्य नाहीं. तथापि एकंदरीनें इतर राज्यांशीं तुलना करतां, जुन्या मुंबई राज्यांतील सावकारी कायद्याच्या अंमलबजावणीमुळें परिस्थिति अधिक बिघडली तरी नाहीं असें म्हणतां येईल.

रुरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें दाखविल्याप्रमाणें १९५०–५१ सालीं मुंबई राज्यांतील लोकांच्या कर्जाच्या मागणीपैकी फक्त १६ टक्के मागणी सहकारी संस्थांकडून भागविली गेली. अर्थातच बाकीची मागणी इतर मार्गांनीं भागविली गेली असली पाहिजे. तथापि एकंदरीनें सावकार हाच कर्जाचा पुरवठा करणारा मुख्य आधार आहे. १९५०–५१ सालीं भारतामधील शेतीच्या व्यवसायाला ७५० कोटी रुपयांचें कर्ज लागेल असा अंदाज करण्यांत आला होता. आतां ही रक्कम १,००० कोटी ते १,५०० कोटी रुपयांपर्यंत गेली असण्याची शक्यता आहे. कारण, दरम्यान पाटबंधाऱ्याखालील जमीन वाढली आहे, आणि शेतीच्या कामांचा खर्चहि वाढला आहे. भारतामधील सर्व राज्यें मिळून अवघी ९० कोटी रुपयांची रक्कम सध्या सहकारी पतपेढ्यांच्या मार्फत पुरवितात. माझा असा अंदाज आहे कीं, फक्त मुंबई राज्यांतच शेतीसाठी आज १५० कोटी रुपयांची रक्कम लागेल. सावकारी कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधींच्या अहवालांत दाखविल्याप्रमाणें, सावकारांकडून व्यापारी व बिगर-व्यापारी लोकांना मिळालेल्या कर्जाचा एकूण आंकडा १५ कोटींचा आहे. सहकारी संस्थांमार्फत अल्पमुदतीचीं कर्जें म्हणून आणखी २५ ते ३० कोटी रुपये देण्यांत येत आहेत. मुंबई सरकार शेतीचीं कर्जें म्हणून २॥ कोटी रुपये देत आहे. उरलेल्या पैकीं २० टक्के कर्जें गरजूंचे नातेवाईक अगर मित्र ह्यांच्यामार्फत मिळालीं असण्याचा संभव आहे. तरी सुद्धां एकूण गरजेचा विचार करतां बरेच कर्ज-व्यवहार अधिकृत रीत्या सावकारीचे म्हणून दाखविले जात नाहींत. माझा असा अंदाज आहे कीं, जवळ-जवळ ५० ते ६० कोटी रुपये बेकायदा व्यवहार करणाऱ्या सावकारांकडून व छोट्या व्यापाऱ्यांकडून मिळत असावे. म्हणजे सावकार व छोटे व्यापारी पैसे कर्जाऊ देण्याचा व्यवसाय चोरट्या मार्गानें करीत असावे असें दिसतें.

राष्ट्रीय उत्पादन वाढावें म्हणून शेतकऱ्यानें उत्पादनाच्या सार्थक पद्धतीचा अवलंब करावा असें आपण म्हणतों व त्यासाठीं त्याला उत्तेजन देतों. पण त्याचमुळें शेतकऱ्यावरील सावकाराची पकड अधिक घट्ट होते आणि त्याला स्वयंपूर्णतेच्या मार्गावर पावलें टाकतां येत नाहींत. प्रा. गाडगीळ ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें सावकार व छोटा व्यापारी हा वर्ग आपलें आसन अधिकाधिक बळकट करीत आहे. हे वर्ग सहकारी संस्थांच्या सभासदांवर नियंत्रण ठेवूं शकतात आणि ह्या संस्थां-मार्फत मिळणाऱ्या पैशाचा उपयोग करून आपली स्वतःची कर्जें फेडून घेतात. कांहीं वेळां कांहीं लोकांना सहकारी संस्थांचे सभासद होऊंच दिलें जात नाहीं. अर्थातच त्यांना अशा संस्थांचे फायदे मिळत नाहींत. ह्याचें उदाहरण म्हणून विदर्भातील ' संरक्षित कुळा ' कडे बोट दाखवितां येईल. कांहीं वेळा सहकारी सोसायट्यांच्या सभासदांचे गट असलेले आढळून येतात. हे लोक अधिक लोक सभासद होणार नाहींत अशी तजवीज करतात. त्यामुळें रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ आणि कर्जें पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्था ह्यांच्याकडून जें द्रव्यसाह्य वाढत्या प्रमाणावर दिलें जातें त्याचा उपयोग सहकारी संस्थांत ज्यांनीं आपलें बस्तान पक्कें बसविलें आहे, अशा लोकांनाच फक्त होतो. म्हणून सहकारी संस्थांत अधिक सभासद येतील व त्यांना त्यांचा फायदा मिळेल ह्याविषयीं प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. स्वस्त दरानें कर्जे मिळविण्याचे दुसरे मार्ग नसल्यामुळें शेतकरी पुन्हा पुन्हा सावकाराकडे जातो व कर्ज घेतो. कर्जाच्या फेडीसाठीं तो आपल्या उत्पादनापैकीं ५० टक्के उत्पादन साव-काराला स्वस्त भावांत देतो. त्यामुळें उत्पादन वाढून सुद्धां त्याची आर्थिक परिस्थिति जेमतेम जगण्याइतकी काठावरीलच राहते. दरम्यान ह्या व्यवहारांत सावकार मात्र त्याला पिळून काढत रहातो. हें एक दुष्टचक्रच आहे. गेल्या कांहीं दशकांत कांहीं शेत-कऱ्यांनीं ह्या चक्रांतून आपली सुटका करून घेतली आहे ह्यांत शंका नाहीं. पण एकंदरीनें ग्रामीण भागांतील सामाजिक व आर्थिक परिस्थिति सावकाराला व छोट्या व्यापाऱ्याला आपले पाय अधिक भक्कम रोवण्यास मदत करणारी अशी आहे. ही टीका जरा प्रखर आहे. पण सहकारी संस्था अजून इतक्या निर्बल आणि कमकुवत आहेत कीं, ह्या सावकारांना व छोट्या व्यापाऱ्यांना आपले व्यवसाय चालूं ठेवूं देणें आपणांस भागच आहे. असें केलें नाहीं तर बहुतेक छोट्या उत्पादकांना लागणारें पुरेसें कर्ज इतर मार्गानें मिळणार नाहीं. तथापि, सरकारनें केलेल्या कर्ज-विमोचनाच्या कायद्यामुळें व इतर उपायांमुळें ह्या वर्गानीं शेतकऱ्या-विरुद्ध चालविलेल्या एकांतिक कारवायांपासून शेतकऱ्यांची सुटका झाली आहे ह्यांत शंका नाहीं.

पण, बँक रेट वाढविल्यामुळें आणि किंमती भराभर वर जाऊं लागल्यामुळें, पैसा हा साहजिकच दुर्मिळ झाला आहे. ह्या परिस्थितीचा फायदा सावकार व छोटे व्यापारी घेतल्याशिवाय राहणार नाहींत. शेतीच्या उत्पादनाच्या आधुनिक पद्धतीचा अवलंब करावयाचा तर शेतकऱ्याला पूर्वीपेक्षा अधिक पैसा शेतींत गुंतवावा लागणार. त्याचें कुटुंब वाढलेलें असल्यामुळें आणि त्याच्या शेतीच्या गरजाहि वाढलेल्या असल्यामुळें त्याला धंदे-वाईक सावकाराकडे जाऊन कर्ज काढावेंच लागतें. सावकार त्यांच्या पतीचा फारसा विचार करीत नाहीं. सावकार हा

शेतकऱ्याला पेचांत धरतो. कर्जाऊ रक्कम घेणाऱ्या शेतकऱ्याकडून तो घेतलेल्या रकमेच्यापेक्षा बऱ्याच मोठ्या रकमेचा कागद करून घेतो. किंवा कर्जाच्या रकमेची फेड मालाच्या रूपांत करण्याचा करार करतो. कर्जफेडीचे दर असे ठरविण्यांत येतात कीं कागदांत दाखविण्यांत आलेलें फुगविलेलें कर्ज शेतकऱ्याला फेडावें लागतें,किंवा शेतकऱ्याला आपल्या मालापैकी बराच माल सावकाराला निम्म्या किंमतीला द्यावा लागतो. शिवाय शेतकऱ्याला फुगविलेल्या कर्जाच्या रकमेवर जादा दरानें व्याज द्यावें लागतें. मालाच्या स्वरूपांत कर्जाची फेड करण्यांत येते त्यावेळीं वजनमापांत लबाडी करूनहि शेतकऱ्याला पिळण्यांत येतें. अशा रीतीनें शेतकरी हा कर्ज घेण्याच्या वेळीं व तें फेडण्याच्या वेळीं अशा दोन्ही प्रसंगानें नागविला जातो. अशा परिस्थितींत उत्पादन वाढविण्यासाठी शेतकरी कर्ज घेतो त्यावेळीं त्याच्या आर्थिक परिस्थितींत काय सुधारणा होते ह्याचा विचार आपणांस करावा लागेल. कर्ज देण्याच्या व्यवहारावरील नियंत्रणाची हीच खरी कसोटी आहे.

म्हणून असिस्टंट रजिस्ट्रार्सनीं ऋणकोंच्या आर्थिक स्थितीची आणि त्यांच्या कौटुंबिक अंदाजपत्रकांची संपूर्ण पाहणी केली पाहिजे. कर्जाचे व्यवहार कशा रीतीनें केले जातात हें त्यांनीं तपासून पाहिलें पाहिजे. त्यांच्या कर्जाच्या मर्यादा काय आणि त्याचीं कारणें काय आहेत हेंहि त्यांनीं तपासलें पाहिजे. ऋणकोंपैकी कांहीं वर्गांची सहकारी संघटना होऊं शकेल किंवा काय हें त्यांनीं पाहिलें पाहिजे. उदा. असें आढळून येतें कीं एखाद्या विभागांतील हातमाग विणकर एखाद्या विशिष्ट सावकाराकडेच जातात. कातड्याचे कामगार दुसऱ्या एखाद्या सावकाराकडे जातात. ही सर्व माहिती गोळा करून ती असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ह्यांच्याकडे पाठविण्यांत यावी. असिस्टंट रजिस्ट्रारनें ही सर्व माहिती विचारांत घेतली पाहिजे. सावकारांविरुद्ध चौकशी करणें आणि परवाने देणें एवढेंच त्याचें काम नाहीं.

सावकारांशिवाय भागण्यासारखें नसल्यानें आपणांस त्यांच्याशीं जुळवून घेतलें पाहिजे पण त्यांच्यावर नियंत्रण ठेवलें जातें आहे अशी दक्षता घेतली जाणें जरूर आहे. ज्या ज्या ठिकाणीं पतपेढ्या आणि सहकारी मार्केटिंग सोसायट्या स्थापन झाल्या आहेत त्या त्या ठिकाणीं शेतकऱ्याला अधिक उत्पादन करण्यास व उत्पादन झालेला माल सवडीप्रमाणें विकण्यास मदत झाली आहे. आपण अधिकाधिक लोकांना सहकारी संस्थांत आणलें पाहिजे. आपलें अंतिम साध्य समाजहित हें आहे. जे लोक कर्ज काढतात त्यांची स्थिति कर्ज काढल्यामुळें घसरतां कामा नये. घेतलेल्या कर्जापैकी किती कर्ज उत्पादक कार्यासाठीं वापरलें जातें आणि किती लग्नासारख्या चैनीच्या बाबींवर खर्च होतें त्यावर नजर ठेवण्यांत आली पाहिजे. एखादें कुटुंब एकाच विवक्षित सावकाराकडे पुन्हां पुन्हां कर्ज घेण्यास जात आहे काय आणि तो सावकार कायद्याप्रमाणें वागत आहे किंवा नाहीं तेंहि पाहिलें पाहिजे. अशा प्रकारची माहिती फक्त शेतीच्या व्यवसायापुरतांच गोळा केली पाहिजे असें नाहीं. कुटिरोद्योगाबद्दलहि अशा माहितीची आवश्यकता आहे. सावकारीचा धंदा बेकायदा करण्यांत येत आहे काय, इकडेही लक्ष दिलें पाहिजे. सावकारीच्या कायद्यांतील पळवाटा बंद करण्यासाठी आणि सावकारांवरील नियंत्रण अधिक परिणामकारक करण्यासाठी कायद्यांत दुरुस्त्या करणें आवश्यक आहे काय, हेंहि पाहण्यांत आलें पाहिजे.

परवाना घेऊन जंगम मालाच्या गहाणवटाचा धंदा करणारा मनुष्य हा बहुतेक चोरीचा माल स्वीकारणारा असतो आणि तो आपला धंदा परवान्याच्या पडद्याआड चालवितो. वस्तु गहाण ठेवली तरी त्याची मालकी ऋणकोचीच असते. त्यामुळें सावकाराला चोरीचा माल स्वीकारल्याबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं. अशा गहाण टाकलेल्या वस्तू कधींच सोडविल्या जात नाहींत. अर्थातच सावकार त्या विकून टाकतो आणि दिलेल्या कर्जापेक्षा बरीच अधिक रक्कम पदरीं पाडतो. कारण ऋणकोनें त्या वस्तूच्या तारणावर मिळेल ती रक्कम घेतलेली असते. अशा रीतीनें सावकार हा चोरांना असरा देणारा परवानेवालाच होतो. म्हणून सावकार करीत असलेल्या गैरव्यवहारांची आपण खालवर जाऊन तपासणी केली पाहिजे व त्याला परवाना नाकारतां येईल काय ह्याचा विचार केला पाहिजे. तारणावरील व्याजाचा दर ९ टक्के असला आणि बिगरतारणावरील व्याजाचा दर १२ टक्के असला तरी सावकार अनेक भल्याबुऱ्या मार्गांनीं कितीतरी अधिक व्याज मिळवितात. कांहीं उदाहरणें अशीं आहेत कीं ज्यांत सहकारी संस्थांकडून कमी व्याजाच्या दरानें पैसे घेऊन ते गरजू व बेसावध लोकांना प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या अधिक व्याजाच्या दरानें देण्यांत आलेले आहेत.

मोठ्या द्विभाषिक मुंबई राज्यांतील सावकारांवर कडक नियंत्रण ठेवण्याचा व कायद्यांत एकसूत्रता आणण्याचा सरकारचा हेतु आहे. पुष्कळदां असें असतें कीं लोक सहकारी संस्थांच्या कक्षेत आलेलेच नसतात. किंवा कांहीं वेळा सहकारी संस्था व्यवहार करण्याच्या अयोग्य पद्धतीचा स्वीकार करतात. मग ऋणको बेदरकार होतो आणि सावकाराच्या जाळ्यांत सांपडतो. खेडेगांवांतून मजूर शहरांत येतात. हे मजूर गरज पडली म्हणजे नेहमीच सावकाराकडे जातात आणि फसतात. म्हणून त्यांना ह्या बाबतींत सावधगिरी शिकविण्यांत आली पाहिजे. चांगले सुशिक्षित लोक आणि लष्करी अधिकारीसुद्धां शहरांतील सावकारांच्या कारवायांना बळी पडतात. मग नुकत्याच शहरांत आलेल्या मजुरांची गोष्ट काय? हस्तव्यवसायाचीं कामें करणारे लोक आणि शेतकरी ह्यांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास विशेष उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. कारण त्यांचा माल व्यापारी व सावकार अल्प किंमतींना विकत घेत असतात. बिगर-परवाना सावकारी करणारांना शासन करण्यांत आलें पाहिजे, परवानदार सावकार गैरव्यवहार करणार नाहींत अशी दक्षता घेण्यांत आली पाहिजे, आणि सहकारी संस्थांच्या स्थापनेस उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८ | सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४. | टेलिफोन २७०१४.
विविध आकर्षक योजना
★ सिल्व्हर ज्युबिली सेव्हिंग्ज सर्टिफिकीटें : (१ ते १० वर्षे.) व्याज: ३ ते ४ टक्के
★ रिकरिंग डिपॉझिट : : : (२४ व ४५ महिने) व्याज: ३ ते ४ टक्के
★ राष्ट्रीय बचत योजना : : : (३ व ५ वर्षे.) व्याज: ३ ते ४ टक्के
★ जनता बचत योजना : व्याज: २ टक्के ★ होम सेव्हिंग सेफ : व्याज: २ टक्के
★ विशिष्ट बचत योजना : व्याज: २ टक्के
विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याही शाखेत मिळेल.
शाखा : फोर्ट · दादर · माहिम · परळी · पुणे · बेळगाव
महिला शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

# नागरी सहकारी बँकेंतील महिला शाखेचें स्थान

( शं. वि. संझगिरी, सेक्रेटरी, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. )

सारस्वत बँकेनें महिला शाखा उघडून महिलांसाठीं एक कार्यक्षेत्राचें नवें दालन उघडलें आहे. हा उपक्रम गतवर्षी १५ ऑगस्ट, १९५७ म्हणजे राष्ट्राच्या स्वातंत्र्य-शुभदिनीं सुरू करण्यांत आला. ही शाखा सुरू करण्यामध्यें मुख्यतः दोन उद्देश आहेतः—

( १ ) महिलांमध्यें उपजत वसत असलेल्या सांठा करण्याच्या प्रवृत्तीचा योग्य परिपोष व्हावा व पर्यायानें त्यामुळें राष्ट्रविकासाच्या कार्यास मदत व्हावी.

( २ ) महिला शाखांमध्यें महिलांनाच सर्व कामें करण्याची संधि देऊन अशा तऱ्हेची एखादी सहकारी संस्था उभारण्यास त्यांना उत्तेजन मिळावें व त्यायोगें महिलांची आर्थिक समस्या दूर करण्यास मदत व्हावी.

ह्या दोन उद्देशांचें आपण थोडेंसें विस्तृत विवेचन करूं. दिवसेंदिवस आर्थिक परिस्थिति बिकट होत चालली आहे. त्याचें प्रतिबिंब अर्थात् महिलांनीं नोकरपेशांत व इतर धंद्यांच्या क्षेत्रांत पडण्यास कारणीभूत झालें आहे. महिलांनीं नोकरी करावी कीं नाहीं हा त्यांच्या स्वेच्छेचा प्रश्न न राहतां ती एक आवश्यक बाब होऊन बसली आहे. विशेषतः मध्यम वर्गाची स्थिति फारच चमत्कारिक होऊं लागली आहे. एका बाजूस आपल्या दर्जाला शोभेल असें जीवनमान टिकवावयाचें व दुसऱ्या बाजूस वाढत्या महर्गतेमुळें व एकत्र कुटुंबपद्धतीची घडी विस्कटल्यामुळें उत्पन्न व खर्च यांची तोंडमिळवणी करावयाची, हा त्या वर्गापुढें न सुटणारा प्रश्न उभा आहे.

आपल्या पंचवार्षिक योजनांचें मुख्य ध्येय म्हणजे राहणीमान वाढवावयाचें. पहिली पंचवार्षिक योजना संपून गेली व दुसरी पंचवार्षिक योजना संपावयास आली आहे. पण राहणीमान उंचावण्याऐवजीं मध्यम वर्ग नुसता भरडून निघाला आहे. याला एक उपाय म्हणजे आपल्या उत्पन्नांतून अडीअडचणीसाठीं दोन पैसे बाजूस काढून ठेवावयाचे व त्या बचतींतून आपल्यापुढील प्रश्न सोडवावयाचा प्रयत्न करावयाचा.

### बचतीची कला

आतां बचत करा म्हणून सांगणें सोपें आहे, पण ही बचत कशी करावयाची ? बचत करणें ही एक कला आहे. त्यांत एकप्रकारची शिस्त आहे व संयम आहे. बचत करणें म्हणजे चिकटपणा करावयाचा व कंजूषवृत्तीनें रहावयाचें असें नव्हे. तर आपल्या उत्पन्नांतून आपण आपल्या जीवनांतील आवश्यक गोष्टींचा उपभोग घेण्यासाठीं खर्चाची योग्य मांडणी करणें. यासाठीं महिलांनीं प्रथमतः एक अंदाजपत्रक केलें पाहिजे व त्या योजनेप्रमाणें आपण खर्च करावयास शिकलें पाहिजे. पैसे मिळविण्यापेक्षां पैसे योग्य रीतीनें खर्च करणें हें कठीण काम आहे. आपण पुष्कळ वेळां विनाकारण पैसे खर्च करतों. आपल्या दर्जाबद्दलची खोटी कल्पना व मिजास ही बहुतांशीं त्याला कारणीभूत असते.

पैसे हातांत असले म्हणजे ते सहाजिकच खर्च करण्याची बुद्धि होते. तेव्हां पगार आल्यावर पहिल्याप्रथम बँकेंत ठेवण्याची शिस्त महिलांनीं आपल्यामध्यें लावून घेतली पाहिजे. खर्च करतांना बँकेंतून चेक पद्धतीनें पैसे काढावयाचे. यामुळें पैसे कशासाठीं काढले याची नोंद रहाते व महिनाअखेर आपण जर पासबुक पाहिलें तर त्यांत आपण कसा कसा पैसा खर्च केला —तो सकारण केला कीं अकारण केला—हें दिसून येतें. त्यासाठीं आपण पासबुक बँकेकडून वेळेवर लिहून घेतलें पाहिजे व आपण केलेल्या व्यवहाराची छाननी केली पाहिजे. नाहींतर एका बाजूनें पैसे ठेवावयाचे व दुसऱ्या बाजूनें लागतील तसे काढावयाचे, हा बिनहिशेबी कारभार ठरेल. त्यासाठीं आपण अंदाजपत्रक करून त्याप्रमाणें चेक काढावयाचे. म्हणजे खर्च आपल्या ताब्यांत राहून त्याप्रमाणें बचत करणें सुलभ होतें.

बचत कशी करावी यासंबंधीं एका बाईची मजेदार पण उद्बोधक गोष्ट आहे. दर महिन्याचा पगार आल्यावर आपल्या खर्चाचे तिनें ८ भाग केले होते. ( १ ) जेवण ( २ ) शिक्षण ( ३ ) कपडे ( ४ ) विमा हप्ता ( ५ ) घरभाडें ( ६ ) करमणूक ( ७ ) डॉक्टर ( ८ ) इतर. त्यासाठीं ८ पाकिटें केलीं होतीं. प्रत्येक कलमाखालीं अंदाजी खर्च ठरवून त्याप्रमाणें त्या पाकिटांत पैसे घातले होते. खर्च करतांना ज्या कारणासाठीं खर्च लागेल त्या पाकिटांतलेच पैसे काढावयाचे. दुसऱ्या पाकिटाला हात लावावयाचा नाहीं. महिनाअखेर ती पाकिटांतील शिल्लक ८ व्या पाकिटांत ठेवी व त्या पाकिटांतले पैसे फक्त नाइलाज झाला तरच काढीत असे. दर महिन्याला याप्रमाणें ती पाकिटें भरीत असे व महिनाअखेर उरलेली शिल्लक ८ व्या पाकिटांत ठेवी. कांहीं महिन्यांनीं तिला असें आढळून आलें कीं आपल्या ८ व्या पाकिटांतील शिल्लक वाढतच चालली आहे. ह्या गोष्टींतील मुख्य तत्त्व म्हणजे त्या बाईमध्यें वसत असलेली बचतीची शिस्त, संयम व खर्चाचें नियोजन; त्यामुळें अवास्तव खर्च होत नव्हता.

हेंच तत्त्व आपणाला बँक खात्याच्या बाबतींत वापरतां येईल. बँकेंत खातें उघडून आपण आपला सर्व पगार त्या खात्यांत ठेवला पाहिजे व बाईनें खर्चाचे निरनिराळे लखोटे केले होते त्या धर्तीवर आपण चेक देऊन शिल्लक ८ व्या पाकिटाप्रमाणें वाढविली पाहिजे. ही शिल्लक वाढल्यावर त्याचा कसा विनियोग करावा यासाठीं बँकेनें आकर्षक बचत योजना आंखल्या आहेत. त्या योजनांमध्यें काय तत्त्व आहे, तें आपण समजावून घेऊं.

**१. होम सेव्हिंग सेफ :**

या योजनेखालीं बँकेंतून आपणाला एक लहान तिजोरी मिळते. त्यासाठीं खात्यांत कमींत कमी २५ रुपये शिल्लक ठेवली पाहिजे. तिजोरी विनामूल्य घरीं वापरावयास मिळते. तिजोरी बंद करून दिली जाते. किल्ली अर्थात् बँकेकडे रहाते. ही तिजोरी लहान मुलांना देऊन त्यांना बचतीचें शिक्षण द्यावयाचें. त्या तिजोरींत पैसे टाकण्यासाठीं जागा केलेली असते. एक नया पैशापासून कितीहि नाणीं टाकतां येतात. तिजोरी भरली कीं बँकेकडे न्यावयाची. बँकेचा अधिकारी ती तिजोरी उघडून त्यांतील पैसे मोजतो व ते खात्यांत जमा केले जातात. " थेंबें थेंबें तळें सांचे "—ही म्हण येथें सार्थ ठरते.

**२. रिकरिंग ठेव :**

"रिकरिंग" हा इंग्रजी शब्द आहे. त्याचा अर्थ "पुनरावृत्ति". या योजनेखाली दरमहा १ रुपयापासून १०० रुपयांपर्यंत ४५ महिने रिकरिंग खात्यांत रक्कम ठेवावयाची. हप्ता मात्र एकदां ठरवावयाचा व त्याप्रमाणें तो दर महिन्याला भरावयाचा. समजा, दरमहा तुम्ही १ रुपया भरला तर ४५ महिन्यांत ४५ रुपये जमा होतील व ५५ महिन्यानंतर बँक तुम्हाला ५० रुपये देते. दरमहा २ रुपये प्रमाणें ४५ महिने भरले तर ५५ महिन्यांनीं १०० रुपये मिळतात. याप्रमाणें इतर हप्त्यांचा हिशेब करावयाचा. समजा, तुम्ही ५ रुपयांचा हप्ता स्वीकारला तर ५५ महिन्यांनीं तुम्हांला २५० रुपये मिळतील. ह्या बचत करून मिळविलेल्या रकमेचें तुम्ही कांय कराल ? महिलांना दागिन्यांची फार आवड असते. २५० रुपयांमध्यें २½ तोळे सोनें मिळेल व त्याची सुंदर माळ अगर पाटली होऊं शकेल. समजा, १ वर्षभर तुम्हांला कांहींच करावयाचें नसेल तर तुम्ही १ वर्षाचे करारानें मुदत ठेव ठेवूं शकता व बँक त्यावर तुम्हांला ३ टक्के दरानें व्याज देते; म्हणजे बचत केलेली रक्कम वाढत जाते. एवढी ही रक्कम दरमहा फक्त ५ रुपयांची बचत करून वाढवितां येते.

**३. विशिष्ट बचत योजना :**

या योजनेखाली आपण दरमहा ५ रुपये अगर त्याचीं पट याप्रमाणें २५ रुपये पर्यंत हप्ता ठरवावयाचा. हप्ता ठराविक रकमेचा पाहिजे. तो हप्ता दरमहा भरावयाचा. दर सहा महिन्यांतून एकदांच पाहिजे तेवढी रक्कम काढतां येते. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे आपल्याला पुढें लागणाऱ्या खर्चाची आधींपासून तयारी करतां येते. समजा, तुम्हांला विमा हप्ता दर सहा महिन्यांनीं भरावयाचा आहे. साधारणपणें १००० रुपयांचा २० वर्षांचा विमा उतरला तर वर्षाचा हप्ता ५० रुपये बसतो. म्हणजे ६ महिन्यांचा २५ रुपये होतो. दरमहा ५ रुपये या खात्यांत टाकले म्हणजे दर सहा महिन्यांनीं विमा हप्ता भरण्याची सोय होईल. हा हप्ता बँकेच्या मार्फत आपल्या खात्यांतून विमा कंपनीला भरतां येतो. ह्याच तत्त्वावर बाळंतपणाचा खर्च, प्रवासखर्च, शिक्षणखर्च, वगैरे ह्यांची तरतूद करतां येते.

ह्या तऱ्हेवर सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकिटें, राष्ट्रीय बचत योजना, वगैरे आकर्षक योजना बँकेनें आंखल्या आहेत. ह्या बचत योजनांचा फायदा महिलांनीं घेऊन आपली बचत वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आतां आपण दुसऱ्या उद्देशाकडे वळूं.

### बचतीचा महिलांना उपयोग

बचत कशी करावयाची याचें आतांपर्यंत विवेचन झालें. आतां या बचतीचा महिलांना कसा उपयोग करतां येईल ? सारस्वत बँकेचा ४० वा अहवाल पाहिल्यावर असें दिसून येतें कीं एकंदर सभासदांपैकी १,००० वर महिला आहेत. यांपैकी ५०० महिलांनीं जरी दर महिन्याला ५ रुपयांची बचत केली तर महिन्याला २,५०० रुपये जमा होतील व वर्षाला साधारणपणें ३०,००० रुपये जमा होतील. या भांडवलाचा उपयोग महिलांच्या आर्थिक गरजा भागविण्याकडे करतां येईल व त्याचप्रमाणें महिलांना घरगुती धंदे करण्यासाठी भांडवलपुरवठाहि करतां येईल व पर्यायानें महिलांना आपलें रहाणीचें मान वाढवितां येईल.

आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी—विशेषतः कर्जफेड करण्यासाठी—महिला सोनाराकडून खाजगीरीत्या भरमसाट व्याजाच्या दरानें पैसे उभारतात व प्रसंगीं आपले दागिने-कधीं कधीं आपलें मंगलसूत्रहि—गहाण ठेवतात. कर्जाची कधींहि परतफेड होत नाहीं व व्याजाचा मात्र तनखा एकसारखा भरावा लागतो. सहकारी बँकेंतून अल्प दरानें कर्ज मिळतें ही पुष्कळ महिलांना माहितीहि नसते व कांहींच्या बाबतींत माहिती असूनहि आपल्या दर्जाच्या खोट्या कल्पनांनीं सहकारी बँकेकडून कर्ज घेणें कमीपणाचें समजलें जातें. कर्जफेड करण्यासाठी, शिक्षणासाठी अगर दुसऱ्या कोठल्याहि योग्य कारणांसाठी महिला शाखेकडून कर्ज घेतलें तर त्याची आपल्याला झेपेल अशा हप्त्यांनीं फेड करतां येते व व्याजाचा दरहि माफक पडतो. वक्तशीर कर्जफेड केल्यास व्याजाच्या दरांतहि भरपूर सूट मिळते. अशा रीतीनें आपल्या उत्पन्नावर ताण न पडतां सोईस्कर हप्त्यानें फेड केल्यानें आपल्याला खर्चाची मांडणी करणें सुलभ होतें.

महिलांनीं घरगुती छोटे उद्योगधंदे केले तर त्यांच्या उत्पन्नांत भर पडून समाजालाहि त्याचा फायदा होतो. ह्या उद्योगधंद्याला लागणारा कच्चा माल विकत घेण्यासाठी महिला शाखेच्या भांडवलाचा उपयोग करतां येईल. त्याचप्रमाणें तयार केलेला मालहि महिला शाखेच्या मार्फत विकण्याची सोय करतां येईल. घरगुती मसाले, लोणचीं, पापड, त्याचप्रमाणें शिवणकाम, खेळणीं वै अशा तऱ्हेचे इतर लहान-लहान उद्योगधंदे महिलांना करतां येण्यासारखे आहेत.

महिला शाखेंतील सर्व कारभार महिलाच चालवीत असल्यामुळें त्यांना बँकिंग व्यवसायाची उपयुक्त माहिती होते. ह्या माहितीचा उपयोग एकादी महिलांची सहकारी पतपेढी काढण्याकडे करतां येईल. भांडवलाचा पुरवठा वर उल्लेखिलेल्या बचत योजनांतून करतां येईल. भांडवलाचा विनियोग अर्थात् महिलांची आर्थिक घडी सुसंघटित करण्याकडे व त्यांचें रहाणीचें मान वाढविण्याकडे होईल.

### परराष्ट्रीय हुंडणावळ मिळवून देणारी हिंदी कॉफी

१९५०–५१ मध्यें भारतांत २०,४७५ टन कॉफीचें पीक गोळा करण्यांत आलें. १९५७–५८ मधील पिकाचा अंदाज ४३,३३५ टन एवढा आहे. ह्यापैकी ४०%चें उत्पादन निर्गत करतां येईल. १९५७ मध्यें १३,२०० टन कॉफीच्या निर्गतीनें ७·७३ कोटी रुपयांची परराष्ट्रीय हुंडणावळ भारतास मिळवून दिली.

### बेकारीचे तुलनात्मक आंकडे

रोजगारांच्या दृष्टीनें १९३७ हें वर्ष अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांस अतिशय वाईट गेलें. त्या वर्षी अमेरिकेंत ७७,००,००० लोक आणि ग्रेट ब्रिटनमध्यें १३,२४,०२७ लोक बेकार होते. १९५१ मध्यें तत्सम आंकडे अनुक्रमें २०,९९,००० आणि २,६४,१०० असे होते; १९५८ च्या मेचे तत्सम आंकडे अनुक्रमें ४९,०४,००० व ४,०५,८८० असे झाले. म्हणजे अमेरिकेंतील व ग्रेट ब्रिटनमधील बेकारी अनुक्रमें १३३·६% नीं व ५३·७% नीं वाढली. भारतांतील उद्योगविनिमय केंद्रांत नोंदलेल्या बेकारांची संख्या १९५१ मध्यें ३,३८,४०२ होती ती मे १९५८ मध्यें ९६,३,३४५ झाली. म्हणजे, ती १८४·६% नें वाढली.

# मुंबई राज्यांतील सहकारी गृहमंडळ्या

## सोईच्या जागा माफक किंमतींत मिळण्याची अडचण

( "दत्तशर्मा" )

सन १९५४–५६ या दोन वर्षें मुदतीचें हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचें एक सिंहावलोकन छापून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांत या चळवळीच्या वेगवेगळ्या आंगोपांगांचा तपशीलवार व आंकडेवार विचार केला असून त्यावरून कांहीं निदानेंहि या बँकेनें काढलीं आहेत.

मुंबई राज्य बहुतेक सर्व बाबतींत इतर राज्यांच्या मानानें पुढें गेलेलें आहे, असें त्यावरून दिसून येतें.

मानवांच्या मुख्य गरजा "अन्न", "वस्त्र" आणि "निवारा". यांपैकी ही तिसरी गरज मुंबई राज्यांतील नागरिक हे सहकारी पद्धतीनें कितपत भागवीत आहेत तें पहावें म्हणून या सिंहावलोकनांतील नवव्या विभागाकडे आम्हीं थोडी नजर टाकली. त्यावरून इतर राज्यांच्या मानानें मुंबई राज्य सर्व बाजूनेंच पुढें गेलेलें आहे, हें ह्या पृष्ठाचे तळाशीं दिलेल्या कांहीं ठळक ठळक आंकड्यांवरून दिसून येईल.

### असमाधानकारक परिस्थिति

मुंबईसारख्या मोठ्या पुढारलेल्या व औद्योगिक वाढ झालेल्या राज्यांत सुमारें तीस-बत्तीस हजारच घरें सहकारी पद्धतीनें गेल्या पस्तीस–चाळीस वर्षांत बांधलीं जावींत ही समाधान मानण्यासारखी गोष्ट नाहीं हें या राज्यांतील कोणीहि सहकारी कार्यकर्ता कबूल करील असें आम्हांस वाटतें. या तीस–बत्तीस हजार घरांत फार तर दोन ते तीन लक्ष व्यक्तींची राहण्याची सोय होईल व ह्या आंकड्यांची मुंबई राज्यांतील लोकसंख्येशीं तुलना केली तर आपली फारच निराशा होते हें कोणासहि मान्य करावें लागेल. ही झाली मुंबईसारख्या पुढारलेल्या राज्याची परिस्थिति! इतर राज्यांचा तर मग गृहमंडळ्यांच्या दृष्टीनें विचार न करणेंच बरें. असो.

रिझर्व्ह बँकेच्या सिंहावलोकनांत गृहमंडळ्यांची मुंबई राज्यांत जास्त वाढ न होण्याचीं जीं अनेक कारणें दिलेलीं आहेत त्यांपैकी त्या बँकेचे दृष्टीनें पुढील दोन कारणें विशेष महत्वाचीं आहेत :—

(१) घरें बांधण्यासाठी लागणारें लांब मुदतीचें पुरेसें भांडवल मिळण्याचा अभाव.

(२) घरें बांधण्यास सोयीच्या योग्य व माफक किंमतींत जागा मिळण्याची अडचण.

वरीलपैकी पहिली बाब सरकार व रिझर्व्ह बँक यांच्या विशेष सहानुभूतीनें सुटण्यास फारसा त्रास होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

खरी अडचण आहे ती दुसरी बाब सोडविण्याची. कारण, या कामीं केवळ सरकारची सहानुभूति असून चालणार नाहीं, तर त्या विषयाकडे स्थानिक स्वराज्य संस्थांनीं विशेष सहानुभूतिनें व आस्थेवाईकपणें पाहिल्याशिवाय व अशा प्रकारच्या सहकारी संस्था आपल्या कार्यक्षेत्रांत जास्तींत जास्त निघून त्यांचेकरवीं मध्यम वर्गीय व गरीब जनतेची त्यांना "निवारा" मिळवून देण्याचे कामीं अधिकांत अधिक सेवा घडावी अशी मनीषा सदर संस्थांनीं बाळगल्याशिवाय सहकारी गृहमंडळ्या आपल्या राज्यांत फारशी प्रगति अगर वाढ करूं शकतील, असें आम्हांस वाटत नाहीं.

या कामीं आम्हांस प्रत्यक्ष काम करतांना जो अनुभव आला आहे तो आम्हीं याखाली थोडक्यांत देत आहों. बहुतेक सर्वांनाच असा अनुभव थोड्या–फार प्रमाणांत येत असतो अगर येत आहे आणि म्हणून तो येथें नमूद केल्यास तो इतरांस मार्गदर्शक होईल अशी आशा आहे.

### श्रीमंतांच्या व गरिबांच्या गृहमंडळ्या

आम्हांस श्रीमंत, मध्यमवर्गीय, गरीब व मागासलेले वर्ग यांनीं स्थापन केलेल्या सहकारी गृहमंडळ्यांच्या कारभाराचा थोडा–फार अनुभव आलेला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं श्रीमंत लोक स्वतःचे पैशाच्या जोरावर आपणास पाहिजे त्या

( आंकडे १९५५–५६ चे आहेत. )

| बाब | नागरी विभागांतील गृहमंडळ्या | | ग्रामीण विभागांतील गृहमंडळ्या | |
|---|---|---|---|---|
| | अखिल भारतांत | मुंबई राज्यांत | अखिल भारतांत | मुंबई राज्यांत |
| सोसायट्यांची संख्या ... | २४६२ | ८४३ | ६३७ | ४४८ |
| सभासद ... | १,७५,००० | ४५,००० | २१,९३९ | १५,६४५ |
| खेळतें भांडवल रु. ... | २६,७१,८४,००० | १३,९०,०३,००० | ६७,३४,००० | ४८,५२,००० |
| भाग भांडवल रु. ... | ५,०४,३६,००० | २,३६,१५,००० | १२,२३,००० | ७,७४,००० |
| फंड रु. ... | १,१३,१३,००० | ५३,५०,००० | २,०३,००० | १,२२,००० |
| बांधून झालेलीं घरें ... | ३०,९०० | १३,९३४ | २,७०७ | २,३०५ |
| पैकी १९५५–५६ सालीं बांधलेलीं | ५,५५७ | २,६९५ | ३५२ | १८८ |
| बांधलीं जात असलेलीं घरें ... | ५,२७७ | २,६४० | १,२७० | १,१३० |

सुखसोयी सहजीं करून घेऊं शकतात. आम्ही अशा कांहीं श्रीमंतांच्या गृहमंडळ्या पाहिल्या आहेत कीं त्यांत सहकार्याचा संपूर्ण अभाव दिसून येतो. सभासद आपल्या शेजारीं असलेल्या दुसऱ्या सभासदांची कधींहि चौकशी तर करणार नाहींतच, उलट त्यांना उपसर्ग देण्याचीच त्यांची तयारी असते. अशा वेळीं त्या श्रीमंतांत जो अधिक श्रीमंत असेल किंवा अधिकारी या नात्यानें ज्याची सत्ता अधिक चालत असेल तोच नेहमीं यशस्वी ठरून आपला स्वार्थ जास्तींत जास्त साधत असतो. असे लोक आपली संस्था सहकारी कायद्याखाली एवढ्याचसाठी नोंदवीत असतात कीं त्यामुळें या कायद्याखालील मिळणारे सर्व फायदे त्यांना सहजीं उपभोगतां येऊन तेवढ्याच प्रमाणांत प्रत्येक सभासदाचा स्वार्थ साधतो. वास्तविक अशा प्रकारच्या संस्था सहकारी कायद्याखाली नोंदविल्याच जाऊं नयेत असें आम्हांस वाटतें. "सहकार" ही बाब केवळ ऐच्छिक असल्यानें ती अशा श्रीमंतांवर लादणें श्रेयस्कर ठरणार नाहीं. या मंडळींची वृत्ति सामान्यतः सहकारी असण्याऐवजीं ती असहकारी असते व "मला काय दुसऱ्याची पर्वा" अशाच स्वरूपाचा त्यांचा गुणधर्म बनलेला असतो. सबब अशा लोकांची सहकारी गृहमंडळी सामान्य नागरिकांस उपकारक ठरत नाहीं असाच सर्वसाधारण अनुभव आहे. मागासलेल्या वर्गांच्या सोसायट्या चालविण्यासाठी लागणारें सामान्यज्ञान व अनुभव अशा वर्गांतील फारच थोड्या मंडळींत दिसून येतें व त्यामुळें मार्गदर्शनासाठी व आपल्या संस्थेचे हिशेब ठेवण्यासाठी त्यांना इतर वर्गांतील तज्ज्ञ मंडळीवर अवलंबून राहावें लागतें. असे बाहेरून आणलेले किंवा आलेले लोक विश्वासार्ह नसल्यास त्याचा उपसर्ग या प्रकारच्या गृहमंडळ्यांना आजवर अनेकवेळां पोहोंचलेला आहे. असे तज्ज्ञ त्या त्या समाजापैकी मिळणें कांहीं वेळां शक्य असल्यास असली मंडळी आपल्या अनुभवाचा किंवा ज्ञानाचा फायदा आपल्या समाजाच्या सहकारी संस्थांस निर्वेतनी किंवा अल्पवेतनी देण्यास सामान्यतः तयार नसतात असें दिसतें. यामुळें याहि प्रकारच्या संस्थांची फारशी प्रगति अगर वाढ झाल्याचें दिसत नाहीं.

### मध्यमवर्गीयांच्या गृहमंडळ्या

शेवटीं राहिल्या मध्यमवर्गीयांच्या किंवा गरिबांच्या सहकारी गृहमंडळ्या. आपल्या समाजांतील फार मोठा विभाग याच वर्गांत येतो, व त्यांचीच गरज जास्तींत जास्त सोयीची परंतु कमींत कमी खर्चांत कशी भागवितां येईल याचाच विचार आजवर करण्यांत आलेला आहे. परंतु त्यास अपेक्षेप्रमाणें पुरेसें यश अद्याप आलेलें नाहीं. त्याचीं मुख्य कारणें वर दिलेलीं आहेतच. घरें बांधण्यासाठी पुरेसें भांडवल अल्प व्याजाच्या दरानें व लांब मुदतीच्या करारावर सरकारनें स्वतः किंवा रिझर्व्ह बँकेच्या मदतीनें उपलब्ध करून दिलें पाहिजे; तसेंच सोसायट्यांच्या सभासदांचीं घरें बांधण्यासाठी लागणारें जरूर तितकें


# पूर्व खानदेश सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जळगांव

स्थापना सन १९१६

मुख्य कचेरी : महात्मा गांधी पथ, जळगांव पू. खा.

टेलिफोन नं. ३५४ ] ★ [तारेचा पत्ता : EKCOBANK

चेअरमन : श्री. जे. एस. पाटील, बी. ए., एलएल. बी.,

व्हाईस चेअरमन : बॅरिस्टर डी. एम्. निकम

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| वसूल झालेलें भाग भांडवल | | |
| भागीदारांतर्फे | रु. | ३१,४५,६०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | ५,००,००० |
| राखीव व इतर गंगाजळी | रु. | २९,१७,३३८ |
| ठेवी | रु. | ३,३८,१५,७१८ |
| सरकारी व इतर रोखे | रु. | १,३५,३२,८५२ |
| शेतकरी व इतर कर्जांत गुंतवणूक | रु. | १,९१,४०,१८३ |
| खेळतें भांडवल | रु. | ४,७९,९८,३१७ |

जिल्ह्यांत एकूण ३७ शाखा

ग्रामीण पतपहाणी मंडळाच्या शिफारशीनुसार तारीख २ ऑक्टोबर १९५५ पासून पायलट योजना या जिल्ह्यांत बँकेनें सुरू केली आहे.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरेची व्यवस्था केली जाते. तसेंच, बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. जळगांव, जामनेर, चोपडा, पारोळा, चाळिसगांव येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. अल्प मुदतीच्या ठेवीही स्वीकारण्यांत येतात. अटी व व्याजाचे दर यासाठीं लिहावें अगर भेटावें.

व्यं. रा. शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर — रा. या. सोनवणे, मॅनेजिंग डायरेक्टर



# इंदूर परस्पर सहकारी बँक
## लिमिटेड, इंदूर.

स्थापना १९०९. आज सभासद संख्या १,०००.

मालकीच्या दोन इमारती रु. ७०,५००

| | | |
|---|---|---|
| निर्धारित भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,०३,९६४ |
| गंगाजळी | रु. | १.३६.९४८ |
| इतर निधी | रु. | ८४,९२१ |
| ठेवी | रु. | १७,५२,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २२,९१,००० |
| इन्व्हेस्टमेन्ट्स | रु. | ५,३२,९०० |
| कर्जे | रु. | १४,३४,००० |

१. सभासदांना अल्प व्याजावर कर्जे देणें, बिनव्याजी औषधि कर्जे देणें, ऋणशुश्रूषा उपकरणें उपयोगासाठीं निःशुल्क पुरविणें, सभासदांच्या मागणीनुसार आवश्यक धान्यें मासिक किंवा वार्षिक पुरविणें, आदि साधनांनीं बँक सभासदांची सेवा करते.

२. शिक्षणार्थी सभासद किंवा त्यांचे विद्यार्थी मुलांमुलींना बँकेतर्फे शिष्यवृत्त्या व अभ्यासार्थ पुस्तकें दिलीं जातात. बँकेच्या शिवण यंत्रावर महिलांना अल्प भाड्यांत कपडे शिवून खर्चांत बचत करतां येते.

३. पंचवार्षिक सेव्हिंग सर्टिफिकेट्स्, बचत कुंभ योजना, अनिवार्य बचत, इत्यादि साधनांनीं बचतीकडे सभासदांची प्रवृत्ति वळविण्यांत येते.

४. बँकेंत सेफ डिपॉझिट लॉकर्स ठेविले आहेत. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व बँकिंग व्यवहार केला जातो.

ही बँक मध्य प्रदेशांतील सर्वश्रेष्ठ नागरिक सहकारी संस्था असून तिची घडण मजबूत व कार्यशैली नमुनेदार आहे.

लोखंड, पोलाद, व सिमेंट नियंत्रित भावानें बाजारांत सहजीं मिळेल अशी व्यवस्था सरकारनें घडवून आणली पाहिजे. या अडचणी सरकारच्या विशेष सहानुभूतीनें सहजीं दूर करतां येण्यासारख्या आहेत. खरी अडचण आहे ती योग्य अशीं घरें बांधण्यासाठी लागणारी जागा संपादन करण्याचीच. मध्यम वर्गीय व गरीब लोक यांची समाजांत एक विशिष्ट पातळी ठरली असल्यानें त्या पातळीस साजेल असेंच जीवन त्यांना जगणें प्राप्त होतें. वाढत्या महागाईबरोबर त्यांचे उत्पन्नाचे मान वाढतेंच असें नाहीं. कित्येकदां त्यांत मुळींच वाढ होत नाहीं. अशा वेळीं त्यांची सांपत्तिक परिस्थिति फारच बिकट होत असते. त्यांना संचय करणें मुळींच शक्य होत नाहीं. त्यामुळें अशा लोकांनीं घरें बांधतांना त्यांना आपलें नेहमींचें सामान्य उत्पन्न हें नेहमींच्या खर्चास पुरेल अशाच बेतानें त्यांना वेगवेगळ्या बाबींवर जास्तींत जास्त किती खर्च करावयाचा याचें धोरण ठरवावें लागतें व ते जें नवीन घर बांधतील अगर संपादन करतील त्यासाठी त्यांना दरमहा जो खर्च करावा लागेल तो तें जेवढें घरभाडें हल्लीं दरमहा देत असतात त्यापेक्षा फार तर शेंकडा १५ ते २० टक्के वाढ करून तेवढी रकम ते पुढें देऊं शकतील असा त्यांचा सामान्यत: अंदाज असतो. या खर्चांत बसेल व परवडेल एवढीच किंमत त्यांच्या घरास पडली तर त्यांचा अंदाज खरा ठरून "घर" ही त्यांना सुखाची बाब ठरेल; नाहीं तर "घर" ही त्यांना आपत्तीच ठरेल.

### घरें बांधण्यासाठीं जागेची निवड

ही सर्व चर्चा येथें करण्याचें कारण घराची किंमत वेगवेगळ्या बाबींवरून ठरते व त्यांपैकी कांहीं बाबींवर होणारा खर्च हा घर कोठेंहि बांधलें तरी त्यांत बचत करतां येणें शक्य नसतें. परंतु दुसऱ्या अशा कांहीं बाबी असतात कीं, त्यावर करावा लागणारा खर्च परिस्थितीनुरूप कमी-जास्त होऊं शकतो. ही बाब म्हणजे घरें बांधावयासाठीं घ्यावयाची जागा. अलीकडे सर्वच नगरांची वाढ होत असल्यानें वेगवेगळ्या शहरांना आपल्या हद्दी दिवसेंदिवस वाढविणें भाग पडत आहे. पूर्वीच्या गावठाणांतील बहुतेक सर्व जागांवर घरें बांधलीं गेलीं आहेत. तथापि जुन्या गावठाणांपैकी कांहीं मोठाल्या बखळी अगर परडी अद्याप रिकामींच आहेत. त्यांचे मालक या ठिकाणीं घरें बांधावयास स्वत: तयार नसतात किंवा या बखळी अगर परड्यांकडून त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाचे मानानें उक्ती किंमत घेऊन त्या बखळी वगैरे घरें बांधूं इच्छिणारांना योग्य किंमतीस द्यावयास ते तयार होत नाहींत; अशी त्यांची "गव्हाणींतील कुत्र्या" प्रमाणें वृत्ति असते. या बखळी आहे तशाच अनेक वर्षें पाडून ठेवून त्यावर कांहींहि खर्च न करतां त्यांना फुकटांत त्यांची जास्त जास्त किंमत मागण्याची हाव सुटते. ही परिस्थिति ठीक नाहीं. अशा सर्व बखळी स्थानिक स्वराज्य संस्थांनीं किंवा सरकारनें वाजवी किंमतीस आपल्या ताब्यांत घेऊन त्या सहकारी पद्धतीनें घरें बांधणाऱ्या गृहमंडळ्यांना अल्प किंमतीस द्याव्या म्हणजे तेथें मध्यमवर्गीय व गरीब लोकांना राहण्याची सोय करून घेतां येईल. तरी या दृष्टीनें सरकारनें चौकशी तावडतोब करून जरूर ती उपाययोजना करावी अशी आमची सरकारास सूचना आहे.

### शहराबाहेरील घरमालकांच्या अडचणी

गावठाणांत जागा योग्य किंमतीस न मिळाल्यामुळें गृहमंडळ्यांना निरुपायास्तव नगराबाहेर लांबवर जागेसाठी शोध करावा लागतो. अशा लांबीवर असलेल्या जागा माफक किंमतीस मिळूं शकतात हें खरें आहे; परंतु अशा ठिकाणीं एकदां घर बांधून झाल्यावर तेथें राहणाऱ्यांना दैनंदिन जीवनांत किती अडचणी येतात त्या लेखकानें स्वत: अनुभवल्या असल्यानें त्याला त्यांची विशेष तपशीलवार माहिती झालेली आहे. या अनेक अडचणींपैकी कांहीं ठळक अडचणी, पुढीलप्रमाणें आहेत—

(१) घरें लांबीवर व एकाकी असल्यानें नेहमींच चोराचिलटांचा उपद्रव होतो व प्रसंगोपात संघटित दरवडा पडण्याचाहि संभव असतो.

(२) या घरांकडे स्थानिक स्वराज्य संस्थांचें पुरेसें लक्ष नसल्यानें त्यांना आरोग्यकारक वातावरण उपभोगतां येत नाहीं. दिवाबत्ती व रस्त्यांची फार अडचण भासते.

(३) लहान मुलांना योग्य प्रकारचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण देणाऱ्या संस्था जवळपास नसतात. त्यामुळें मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होते.

(४) बाजार, पोस्ट ऑफिस, दवाखाना, वगैरे जवळपास नसल्यानें फारच अडचण भासते.

(५) वाहानें मिळूं शकत नाहींत त्यामुळें त्या कामीं फार खर्च होतो व कित्येक वेळां जवळपास वाहान न मिळाल्यास धोक्याचे वेळीं फारच कुचंबणा होते व वाहानाचे अभावीं फार मोठें नुकसान सोसावें लागतें.


# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड

स्थापना : सन १९३६ ★ ( शेड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २. प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग ( फोन नं. ६५६३ )

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट मुंबई—१ ( फोन नं. २५३४०८ )

—: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :—

श्री. ग. रा. साठे, ( अध्यक्ष ) श्री. सी. टी. चितळे, श्री. वि. ना. सरदेसाई, शेठ छोटालाल धरमसी जोशी
श्री. ग. उ. चितळे, ( उपाध्यक्ष ) श्री. स. कृ. भागवत शेठ मोहनलाल हंसराज लुणावत श्री. वा. पां. वैद्य

चालू खातें व्याज १ टक्का—सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के. मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबद्दल समक्ष भेटा.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., ( ऑनर्स ), बी. कॉम्., एलएल. बी.,
मॅनेजर.

( ६ ) वाहानासाठी दैनंदिन करावा लागणारा खर्च मध्यम-वर्गीयांच्या व गरिबांच्या ऐपतीबाहेर होतो. तो होण्याचें मुख्य कारण म्हणजे त्यांचें घर शहरापासून फार लांब अंतरावर बांधलेलें असतें. यामुळें प्रारंभीं जरी कमी किंमतींत घरजागा मिळाली असल्यानें घरमालकांचें तात्कालिक समाधान झालेलें असलें तरी वाहानापायीं त्यानंतर सतत करावा लागणारा खर्च हा त्यांच्या नेहमींच्या उत्पन्नाच्या मानानें फार जास्त होत राहातो. सबब जरी प्रारंभीं थोडी जास्त किंमत द्यावी लागली तरी ती देण्याची तयारी ठेवून मध्यमवर्गीयांनीं शहराच्या केंद्राच्या जितकें जवळ राहातां येईल तेवढें राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें उघड आहे व या कामीं सरकारानें व स्थानिक स्वराज्य संस्थांनीं त्यांना इरतऱ्हेनें मदत करणें हें त्यांचें नैतिक कर्तव्य आहे असें आम्हीं समजतों.

### गृहमंडळयांना सवलती

मुंबई सरकारानें आपल्या राज्यांतील सहकारी गृहमंडळयांना वेळोवेळीं अनेक लहान-मोठ्या सवलती दिल्या असून त्याबाबतचे आपले ठराव त्यांनीं त्या त्या वेळीं प्रसिद्ध केलेले आहेत. परंतु या सर्व सवलती एकत्रित छापून एकादी पुस्तिका सहकारी खात्यानें प्रसिद्ध केल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. त्यामुळें या सवलतींच्या अज्ञानामुळें कांहीं संस्थांना नाहक मुकावें लागतें असें दिसून येतें. ही बाब येथें नमूद करण्याचें कारण म्हणजे अशीच एक सवलत एका गृहमंडळीस मिळण्याचें कामीं नुकतीच फार अडचण उत्पन्न झाली होती असें आमच्या नजरेस आलें आहे, म्हणून ती बाब थोडी तपशिलानें आम्हीं या खाली देत आहों. हेतू हा कीं, अशीच अडचण दुसऱ्या एकाद्या संस्थेस आली असल्यास ती सहजीं दूर व्हावी.

गृहमंडळयांचे बाबतींत मुंबई सरकारानें आपल्या दि. २९ नोव्हेंबर १९२६ च्या ठरावानें ( गव्हर्मेंट रेझोल्यूशन, रेव्हिन्यू डिपार्टमेंट नं. ७९३९/२४ दि. २९-११-१९२६ ) अशी एक सवलत दिली आहे कीं, गृहमंडळयांनीं आपल्या वाडींत ( कॉलनीमध्यें ) जे सार्वत्रिक उपयोगाचे म्हणून रस्ते पाडलेले असतील त्या रस्त्याखालील क्षेत्रावर नॉन्-ॲग्रिकल्चरल असेसमेंट म्हणजे बिगर-शेतसारा घेण्यांत येऊं नये. शेतसारा अगर बिगर-शेतसारा वसूल करण्याचें काम रेव्हिन्यू खात्याचें असल्यानें सहकारी संस्थांसाठी सुमारें बत्तीस वर्षांपूर्वी जाहीर केलेली ही सवलत त्या खात्याच्या नोकरांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या लक्षांत असेलच असें मानणें चुकीचें होईल. तथापि ही सवलत त्यांच्या नजरेस आणून दिली तरीहि जर ते ती सवलत सहकारी संस्थांस देण्याचे कामीं खळखळ करतील तर मग मात्र तें समर्थनीय होणार नाहीं. असो. वरील सवलत ही हे सार्वत्रिक उपयोगाचे रस्ते स्थानिक स्वराज्य संस्थेकडे वर्ग झालेले नसले तरी देखील उपभोगतां येते ही गोष्ट सहकारी गृह-मंडळयांत काम करणारांनीं अवश्य लक्षांत ठेवावी अशी आमची त्यांना नम्रतापूर्वक सूचना आहे. ही सवलत सहकारी संस्थांना पूर्वींच देण्यांत आलेली आहे, ही गोष्ट आमचे एका मित्रास व्यक्तिशः माहीत होती व म्हणून एका सहकारी संस्थेचें या कामीं नाहक होणारें तीन-चार हजार रुपयांचें नुकसान ती संस्था त्या गृहस्थांच्या साहाय्यानें टाळूं शकली हें येथें नमूद करणें आम्हांस जरूर वाटतें.

---

[ स्थापना १९२१ ]

गरगट्टी अँड सन्स

शहापूर-बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो !

डोकेंदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज



रामतीर्थ ब्राम्ही तेल

[ स्पेशल नं. १ ]
आयुर्वेदिक औषधें

केस काळे रहातात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येते, केस वाढतात, दृष्टीहि सुधारते.

मोठी बाटली रु. ४=००
लहान बाटली रु. १=००

श्री रामतीर्थ योगाश्रम
मुंबई १४.

शरीर निरोगी ठेवण्यासाठीं योगासन-चार्ट मागवा.
पोस्टेजसह रु. २-५०

# बँकिंगच्या व्यवसायांतील स्त्रियांचें स्थान

## ग्रेट ब्रिटन, अमेरिका व भारत येथील परिस्थिति

### ग्रेट ब्रिटनमधील पहिली स्त्री बँक मॅनेजर

ब्रिटनमधील बारक्लेज बँकेनें मिस हार्डिंग ह्या बाईची बँक मॅनेजर म्हणून नेमणूक केली आहे. एकाद्या स्त्रीला ह्या पदाची प्राप्ति होण्याचें ब्रिटनमधील हें पहिलेंच उदाहरण आहे. मिस हार्डिंग ह्यांनीं १९३४ सालीं बँकेंत लघुलेखिका म्हणून प्रवेश केला आणि मग निरनिराळ्या जागांवरील कामाचा अनुभव घेतां घेतां १९४८ सालीं बँकेच्या जनरल मॅनेजरच्या सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक झाली. १ डिसेंबर रोजीं बँकेच्या एका नव्या शाखेच्या मॅनेजर म्हणून त्या रुजू होतील. ब्रिटनमधील बँकांत स्त्री–नोकरांचें प्रमाण अलीकडे वाढत आहे. त्यामुळें बँकिंगच्या व्यवसायांतील स्त्रियांच्या स्थानाबद्दल कांहीं मनोरंजक प्रश्न निर्माण झाले आहेत. मिस हार्डिंग ज्या शाखेच्या मॅनेजर होणार आहेत तेथें सर्व नोकर मुख्यतः स्त्रियाच आहेत. बँकेकडे स्त्री-गिऱ्हाइकांना आकर्षित करावें म्हणून ही नेमणूक करण्यांत आली आहे. हा हेतु कितपत साध्य होईल इकडे लोकांचें लक्ष लागून राहिल्यास नवल नाहीं. स्त्रियांच्या समान हक्कांचे जहाल पुरस्कर्ते असें म्हणूं शकतील कीं, आजपर्यंतच्या केवळ पुरुषांच्या मिरासदारीच्या किल्ल्यावर स्त्री-जातीनें आपलें निशाण फडकावलें आहे. पण सनातनी वृत्तीचे पुरुष बँकर्स आणि त्यांचीं पुरुष गिऱ्हाइकें ह्यांचा ह्या प्रथेला विरोध होण्याचाहि संभव आहे. इतकेंच काय, बँकेंत काम करणाऱ्या व बँकेच्या बाहेरील स्त्रियाहि विरोध करण्याची शक्यता आहे. एखाद्या प्रतिष्ठित व संभावित अशा मध्यम वयाच्या पुरुष मॅनेजर ऐवजीं स्त्री मॅनेजरवर स्त्रिया कितपत विश्वास टाकतील हा एक प्रश्नच आहे. एखादी स्त्री–डॉक्टर आणि तिचा रोगी ह्यांच्यांतील धंदेवाईक नात्यांत आणि बँक मॅनेजर व त्याचीं गिऱ्हाइकें ह्यांच्यामधील नात्यांत कांहींसें साम्य आहे. तसेंच जवळचें नातें स्त्री–बँक मॅनेजर व गिऱ्हाइकें ह्यांच्यांत निर्माण होऊं शकेल कीं नाहीं ? हा प्रश्न शिक्षण आणि मनोवृत्ती ह्यांचा आहे. पण हा मुद्दा पुरुष बँक मॅनेजरांच्या बाबतींतहि लागूं आहेच.

### संख्येवरील स्वाभाविक मर्यादा

फार सनातनी अगर नकारात्मक दृष्टिकोन न स्वीकारतांहि असें म्हणतां येईल कीं, मॅनेजरसारख्या जागेपर्यंत पोंचूं शकणाऱ्या स्त्रियांच्या संख्येवर साहजिकच कांहीं स्वाभाविक मर्यादा पडतात. पहिली गोष्ट अशी कीं, बँकांतून कामें करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत असल्यामुळें वरच्या जागांवर हक्क असणाऱ्या स्त्रियांची संख्याहि वाढत जात असते. शिवाय, प्रत्येक बँकेंतील स्त्री–नोकरांचें प्रमाण वेगवेगळें असतें. प्रत्येक बँकेच्या चालकांचें ह्या बाबतींतील धोरण वेगळें असतें व त्यांच्या गरजाहि निराळ्या असतात. दूरच्या भागांत बँकेच्या लहान लहान शाखा किती आहेत आणि त्यांत कशा प्रकारचे व्यवहार केले जातात ह्याहि प्रश्नांना महत्त्व आहे. कांहीं शाखांतून नाणीं मोठ्या प्रमाणावर हाताळावीं लागतात. तीं हाताळण्यासाठीं खास व्यवस्था असली तरीसुद्धां स्त्रियांना नाण्यांच्या जड पिशव्या हाताळणें कठीण जातें. पण, तरीसुद्धां, स्त्री–कॅशिअर अधिकाधिक दिसूं लागल्या आहेत व त्या लोकप्रियहि होत आहेत. पण पुष्कळशा स्त्रिया टंकलेखनासारखें अगर मशिन-पोस्टिंग सारखें चाकोरींतील काम करण्यासाठींच कामावर घेतल्या जातात. लग्न करून नोकरी सोडणाऱ्या स्त्रियाच पुष्कळ असतात. कांहीं स्त्रिया टंकलेखक म्हणून कामावर आल्यावर हळू हळू मॅनेजरच्या अगर इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सेक्रेटरीच्या जागेपर्यंत चढतात. ह्या शिडीच्या बाहेर पडण्याच्या संधी फारशा नसतात. पण, एकंदरीनें हीं कामें स्त्रिया चांगलीं करतात आणि त्यांत त्यांना समाधानहि लाभतें. सेक्रेटरींच्या वरिष्ठ प्रतीच्या जागा मिळविण्याच्या संधी स्त्रियांना मिळूं शकण्याचा संभव बराच असतो. पुष्कळ स्त्रिया विवाहाच्या सापळ्यांत न सांपडतां बँकांच्या वरिष्ठ प्रतीच्या जागापर्यंत पोंचतात व तांत्रिक स्वरूपाचें कामहि चांगल्या रीतीनें करतात.

### फरक पडण्यास वेळ लागेल

गेल्या युद्धापूर्वी बँकेंत काम करणाऱ्या स्त्रियांचें पुरुषांशीं प्रमाण साधारणपणें एकास दोन असें होतें. पण, आतां बहुधा तें समसमान झालें असावें. कदाचित् स्त्रियांचें प्रमाण वाढताहि असण्याचा संभव आहे. कारण, तें वाढल्यास पगाराच्या वाढत्या खर्चांत घट होणें शक्य होतें. ह्याचा अर्थ स्त्रियांना कमी वेतन द्यावें लागतें असाच केवळ नाहीं. मामुली कामाची विभागणी करून तें तरुण स्त्रियांना करतां येण्यासारखें सुकर करणें हाहि एक उद्देश असतो. शिवाय ह्यांपैकी पुष्कळशा तरुण स्त्रिया लग्न करून जातात आणि मोठ्या पगाराच्या श्रेणीपर्यंत पोंचण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. तरीसुद्धां वरिष्ठ जागांवर काम करण्यास लायक अशा स्त्रियांची संख्या वाढतच जाईल असें दिसतें. ह्यांपैकी कांहीं स्त्रियांना संधि व उत्तेजन दिल्यास त्या आपल्या कर्तबगारीनें व मनोवृत्तीनें जबाबदारीच्या जागांपर्यंत पोंचणें शक्य असतें. एकंदरीनें पहातां, चालू परिस्थितींत तूर्त तरी आमूलाग्र फरक पडणार नाहीं.

ह्या कालखंडांत वयस्कर नोकरांपैकी बरेच जण सेवानिवृत्त होण्याच्या मार्गावर येतील. १९१४ च्या पहिल्या महायुद्धानंतर भरती करण्यांत आलेला हा पुरुष नौकरवर्ग बहुतेक मामुली कामें करण्यांत गुंतलेला आहे. १९२० सालच्या सुमारास बँकेच्या नौकरींत रुजूं झालेलीं माणसें १७–१८वयाचीं होतीं असें धरलें तर १९६५ च्या सुमारास तीं मध्यम वयाचीं झालेलीं असतील. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळें बँकांतील नौकरांच्या भरतीवर वाढता परिणाम होईल; त्यामुळें स्त्री–बँक नौकरांच्या संख्येंत किती वाढ होईल तें त्यावेळीं दिसेल. पण हा केवळ संख्येचा प्रश्न नाहीं. बँकेच्या एखाद्या कचेरींतील सर्वांत मोठा अधिकारी स्त्री असेल अशा ठिकाणीं मॅनेजरच्या कामाला स्त्री कितपत योग्य असेल हाहि प्रश्न अज्ञात असतो. ब्रँच मॅनेजरचें शिक्षण सहज अगर लवकर होऊं शकत नाहीं. बँका आपल्या नौकरांना शिक्षण देण्यासाठीं ज्या योजना अंमलांत आणतात त्यामधून पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया भाग घेऊं लागण्यास अद्याप बराच काळ लागणार आहे. एखाद्या माणसानें आपल्या मुलीला खर्चिक असें विद्यापीठांतील शिक्षण दिलें तरी त्याचा ती उपयोग करून घेईल कीं लग्न करून मोकळी होईल हा प्रश्न

उरतोच. ह्या बाबतींत आर्थिक संस्थांतील सुधारणा आणि मानवी स्वभाव ह्यांच्यांत विरोध उत्पन्न होतो.

बँकिंगचा व्यवसाय हा बराचसा तांत्रिक स्वरुपाचा आहे व त्यांतील चातुर्य अनुभवानेंच येत असतें. पुष्कळशा स्त्रियांना हा व्यवसाय आवडत नाहीं हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. शिवाय असें कीं मॅनेजरसारख्या जागेसाठी संख्येनें अधिक अशा पुरुष-वर्गातूनहि योग्य असा माणूस नेहमींच मिळणें बहुधा कठीण जातें. अर्थातच, मर्यादित अशा स्त्री–नौकरवर्गातून लायक माणूस मिळणें अधिकच अवघड जाणार. स्त्रियांची आपल्या स्वतःच्या नौकरीबद्दलची वृत्ति काय असते हाहि प्रश्न आहे. ज्या स्त्रियांनीं व्यावसायिक प्रगतीच आपलें ध्येय केलें आहे, त्यांचा ओढा शिक्षणानंतर जास्तींत जास्त पैसा आणि तोहि लवकर मिळविण्याकडेच असणार. २० वर्षें किंवा अधिक काल थांबून वरिष्ठ प्रतीच्या जागा मिळविण्याची दृष्टि व वृत्ति पुरुषांत अधिक दिसून येते. तथापि, ह्या बाबतींत सर्वसामान्य नियम घालणें शक्य होणार नाहीं.

### अमेरिकन बँकांतील स्त्री–अधिकारी

अमेरिकेंत बँकिंगच्या व्यवसायांत जबाबदारीच्या जागांवर स्त्रिया नेमण्याची प्रथा बऱ्याच कालापूर्वी सुरू झालेली आहे. आज अमेरिकेंत निदान १५० स्त्रिया तरी बँकेच्या अध्यक्षपदीं अगर प्रमुखपदावर आहेत. सुमारें ४० पेक्षा अधिक बँकांच्या बोर्डाच्या अध्यक्ष स्त्रिया आहेत. अधिकारपदावर असलेल्या स्त्रियांची संख्या तर हजारोंनीं मोजावी लागेल. अमेरिकन बँकर्स बॉडी ह्या मध्यवर्ती संघटनेंतहि अनेक स्त्रिया महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत. बँकिंगच्या व्यवसायांत अमेरिकन स्त्रिया दोन मार्गांनीं प्रविष्ट झाल्या आहेत. पुष्कळशा छोट्या बँकांतील भांडवलापैकी बहुमत देण्याइतकें भाग–भांडवल त्यांना वारसाहक्कानें मिळालेलें आहे. अशा रीतीनें ज्या स्त्रियांना आर्थिक नियंत्रण प्राप्त झालें, त्यांपैकी पुष्कळशा स्त्रियांनीं बँकेचें चालकत्वच आपणांकडे घेतलेलें आहे. कांहींनीं असें करण्यापूर्वी आपआपल्या बँकांत अधिकाराचीं कामें पूर्वीपासूनच केलेलीं होतीं. अशा प्रकारचें पहिलें उदाहरण १९२३ सालीं घडलें. अंगच्या गुणांनीं वरिष्ठपदीं चढलेल्या स्त्रियांचीं उदाहरणें क्वचितच आहेत आणि अशा बढतीला काळहि खूप लागलेला दिसून येतो.

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं अमेरिकन स्त्रियांना आपल्या अंगचें कर्तृत्व दाखविण्याची संधि प्रथमच मिळाली. बऱ्याच महत्त्वाच्या जागीं पुरुषांच्या ऐवजीं त्यांची नेमणूक करण्यांत येऊं लागली. नंतर त्यांतील कांहींजणी लवकरच मोठ्या जागांपर्यंत पोंचल्या. दोन महायुद्धाच्या कालखंडांत बँकिंगच्या व्यवसायांतील स्त्रियांना बरीच धडपड करावी लागली. एक तर बढतीला पात्र असलेले पुरुष उमेदवार बरेच होते. शिवाय स्त्रियांच्या नेमणुकीबाबतचे पूर्वग्रहहि आड येत असत. दुसऱ्या महायुद्धाच्या कालांत स्त्रियांना आपली योग्यता दाखविण्यास पुनः संधि मिळाली. त्यावेळेपासून ह्या व इतर क्षेत्रांत पुढें सरकण्यास वाव अमेरिकन स्त्रियांना खूपच मिळूं लागला. ह्या बाबतींत बँकिंग मॅगेझिनच्या संपादकांनीं जमविलेले आंकडे दिशादर्शक आहेत. १९४० सालीं स्त्री–अधिकाऱ्यांची संख्या सुमारें ३,००० होती. अंदाजें ६०,००० अधिकाऱ्यांशीं त्यांचें प्रमाण ५ टक्केच होतें. गेल्या वर्षांच्या अखेरीस स्त्री–अधिकाऱ्यांची एकूण संख्या १०,५०० इतकी होती. एकूण १,०५,००० अधिकाऱ्यांशीं त्यांची टक्केवारी आतां १० टक्के झाली आहे. बँक ऑफ अमेरिका ह्या सर्वांत मोठ्या बँकेंत स्त्री–अधिकाऱ्यांची संख्या २९३ आहे. बँकांतील नौकरांत स्त्रियांचें प्रमाण जसें वाढत आहे त्या प्रमाणांत स्त्रियांना मोठ्या जागा मिळण्याची शक्यताहि वाढत आहे. सध्यां अमेरिकेंतील बँकांत प्रत्येक एका पुरुष–नौकरामागें दोन स्त्रियांना कामावर ठेवण्यांत येत आहे. बहुतेक स्त्रिया कॅशिअर, कारकून अगर जमाखर्चाचे नोंद कारकून म्हणून कामें करतात. पण हळूहळू त्यांना वरच्या दर्जाचीं, पर्यवेक्षकाचीं कामें देण्यांत येत आहेत ५ कोटी डॉलर्सच्या ठेवी असलेल्या बँकांतून आज सुमारें २० टक्के खातें-प्रमुख स्त्रिया आहेत. पूर्वी अशा जागा सहजच पुरुषांना मिळत. खालच्या जागांवर स्त्रियांच्या जितक्या अधिक नेमणुका होतील तितक्या मानानें वरच्या जागा मिळण्याची शक्यताहि वाढत जाणार हें उघड आहे. पुरुषांचा पूर्वग्रहहि अजून निवळलेला नाहीं. पुष्कळशा बँकांत अजूनहि पुरुषांचेंच काम करीत असलेल्या स्त्रियांना त्यांच्यापेक्षा कमी वेतन देण्यांत येतें, तर कांहीं बँकांत अधिकारपदावर काम करीत असतांनासुद्धां अशा स्त्रियांना अधिकाऱ्याचा दर्जा मात्र देण्यांत येत नाहीं.

### भारतीय बँकांतील परिस्थिति

भारतांतील बँकांतून स्त्रिया कामें करतांना दिसतात, परंतु त्या सर्व कारकुनी स्वरूपाचीं करणाऱ्याच असतात. अधिकारी म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीहि नसेल आणि शाखेची स्वतंत्र अधिकारी म्हणून काम करणारी तर एकहि स्त्री नाहीं. अमेरिका व ग्रेट ब्रिटन येथेंसुद्धां स्त्रियांनीं ह्याबाबतींत विशेष प्रगति केलेली नाहीं. इतर कचेऱ्यांतून स्त्रियांना अधिकारी म्हणून नेमले गेले, तरी बँक कचेऱ्यांतून त्यांची नेमणूक केली जात नाहीं. स्त्रियांच्या लायकी–नालायकीचा हा प्रश्न नसून, बँकिंगच्या व्यवसायांत यशस्वी होण्यासाठी नेट धरणाऱ्या स्त्रियांचा अभाव आहे, हेंच त्याचें कारण आहे. विवाहाला प्राधान्य मिळणें स्वाभाविक असतें आणि विवाहानंतर अपत्यें होणें क्रमप्राप्तच असतें. मुलांचें संगोपन करण्याची जबाबदारी स्त्रियांवरच असतें. विवाह ही पुरुषांच्या बाबतींत अडचणीची बाब ठरत नाहीं. भारतांतील बँकांतून स्त्री–अधिकारी नसण्याचें आणखी एक कारण म्हणजे समाजाची सांस्कृतिक पातळी त्याला अजून पोषक नाहीं. नाठाळ कर्जदारांकडून वसुलीसाठी जे प्रयत्न करावयाचे, ते स्त्री–अधिकाऱ्यांना करतां येणें अशक्यच आहे. भलत्या वस्तींत, भलत्या वेळीं जाऊन, बँकेला आपली तारण मालमत्ता मिळवावी लागते. त्याच्या मार्गांतील अडचणी इतक्या असतात, कीं पुरुषांनाहि तें साधणें कठीण जातें. केवळ कागदी व्यवहारापुरतें काम असेल, तर स्त्रियाहि तें काम कार्यक्षमतेनें करूं शकतील. बँकांच्या खातेदारांतहि अजून स्त्रियांची संख्या कमी आहे आणि त्यांचीं खातीं असलीं तरी त्यांत बहुधा फारशी देवघेव होत नाहीं असा अनुभव आहे. बँकिंगकडे स्त्रियांना आकर्षित करण्याचा प्रयत्न बऱ्याच बँकांनीं आजवर केलेला आहे. कांहीं झालें तरी, बँक शाखेची मॅनेजर एकादी स्त्री झाली, तर ती कौतुकाचीच बाब होईल. बँकेच्या संचालकपदीं मात्र स्त्रिया विराजमान झालेलीं कित्येक उदाहरणें आहेत; आणि जिची मॅनेजिंग डायरेक्टर स्त्री आहे, अशी अर्बन सहकारी बँकहि महाराष्ट्रांत आहे.

# इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

## दहा वर्षांतील कामाचा आढावा

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचें एकूण वसूल भांडवल ५ कोटी रुपये आहे, आणि तें प्रत्येकी ५,००० रुपयांच्या १०,००० भागांत विभागलेलें आहे. ह्या भागांची मालकी खालीलप्रमाणें वाटलेली आहे :—

| | भागांची संख्या |
|---|---|
| मध्यवर्ती सरकार | २,००० |
| रिझर्व्ह बँक | २,०५४ |
| शेड्यूल्ड बँका | २,४०५ |
| विमा कंपन्या, इ. | २,५९८ |
| (पैकी लाइफ इं. कॉर्पोरेशनकडे २,३४६ भाग आहेत.) | |
| सहकारी बँका | ९४३ |
| एकूण | १०,००० |

कॉर्पोरेशनचे रिझर्व्ह व इतर फंड ५६ लक्ष रुपयांचे आहेत आणि तिनें बॉंडस व डिबेंचर्सच्या स्वरूपांत १२३ कोटी रु. उभारलेलें आहेत. सरकारकडून १५ कोटी रु. कर्जाऊ घेतलेलें आहेत. डिव्हिडंडसाठी सरकारनें दिलेल्या रकमांपैकी ५८ लक्ष रुपये अद्याप परत करावयाचे आहेत. कॉर्पोरेशनचे ४ कोटि रुपये बँकांतून शिल्लक आहेत. २९ कोटि रुपयांचीं कर्जें येणें आहेत. कॉर्पोरेशनचा एकूण ताळेबंद ३५ कोटि रुपयांचा आहे.

कॉर्पोरेशनच्या कामाचा गेल्या तीन वर्षांचा आढावा खालील प्रमाणें आहे :—

### गेल्या तीन वर्षांतील कर्जांच्या अर्जांची विल्हेवाट

| | संख्या | ३०-६-१९५६ अखेरच्या वर्षी रक्कम (हजार रु.) | संख्या | ३०-६-१९५७ अखेरच्या वर्षी रक्कम (हजार रु.) | संख्या | ३०-६-१९५८ अखेरच्या वर्षी रक्कम (हजार रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ आलेले अर्ज | ८६ | २७,७०,०२ | ६७ | २१,३६,२५ | ४८ | १४,८८,५० |
| २ मंजूर केलेले अर्ज | ४४ | १५,१३,०० | ५१ | ११,९०,७५ | २२ | ७,७८,५० |
| ३ वाटलेलीं कर्जें | — | २,२०,२३ | — | ९,७७,५० | — | ८,३३,३५ |
| ४ नामंजूर केलेले अर्ज | ८ | २,१७,५० | १४ | ४,८७,५० | १ | १०,०० |
| ५ रद्द किंवा परत घेतलेले अर्ज | ७ | १,३८,०० | १० | २,७३,१० | १० | २,११,५० |
| ६ वर्षअखेर विचार चालू असलेले अर्ज | ३४ | ९,८८,६० | २६ | ११,३७,०० | ४१ | १४,९८,४० |

३० जून, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी एकूण ७,७८,५०,००० रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं. हीं सर्व कर्जे जानेवारी ते जून, १९५८ ह्या सहा महिन्यांतच मंजूर केलीं गेलीं. जुलै ते डिसेंबर, १९५७ ह्या सहामाहींत पैशांच्या तुटवड्यामुळें कर्ज-मंजुरी शक्य झाली नाहीं.

१९५७–५८ मध्यें १९५६–५७ चे मानानें कर्जांचे अर्ज कमी आले व कर्जांची रक्कमहि कमी मागण्यांत आली, ह्याचें कारण परदेशीय हुंडणावळीची चणचण, हें होय.

१४,८८,५०,००० रु. कर्ज मागणारे ४८ अर्ज कॉर्पोरेशनकडे आले. त्यांपैकीं ७,४९,५०,००० रु. कर्जांचे २० अर्ज साखरेच्या कारखान्यांचे होते; १,९८,००,००० रु. कर्जांचे १२ अर्ज टेक्सटाइल धंद्याचे होते; २,९५,००,००० रु. कर्जांचे ५ अर्ज सिमेंटच्या कारखान्यांचे होते.

### सहकारी साखर कारखान्यांना अग्रस्थान

साखरेच्या कारखान्यांच्या अर्जांपैकी १९ अर्ज सहकारी सोसायट्यांचे होते व त्यांनीं ७,०४,५०,००० रु. कर्ज मागितलें होतें. सहकारी सोसायट्यांना खास प्रोत्साहन देण्याच्या सरकारी धोरणास अनुसरून, त्यांना ३,५१,००,००० रु. कर्जें मंजूर करण्यांत आलीं. म्हणजे, आतांपर्यंत कॉर्पोरेशननें सहकारी साखर कारखान्यांना मंजूर केलेल्या कर्जांची रक्कम १३,२३,५०,००० रु. झाली आहे. साखरेच्या धंद्याला मंजूर केलेल्या कर्जांच्या रकमेच्या ६९% ही रक्कम आहे; आणि कॉर्पोरेशननें सर्व प्रकारच्या कारखान्यांना मिळून मंजूर केलेल्या एकूण कर्जांच्या २१% आहे. एकूण २६ सहकारी कारखान्यांना कॉर्पोरेशननें मदत केली आहे. आसाम, मुंबई, मद्रास, म्हैसूर, पंजाब आणि उत्तरप्रदेश ह्या राज्यांतील सहकारी कारखान्यांना हीं कर्जें मिळालीं असलीं, तरी त्यांतला मुंबई राज्याचा वांटा सर्वांत मोठा आहे. ह्या राज्यांतील सहकारी साखर कारखान्यांना ८,१७,५०,००० रु. चीं कर्जें मंजूर झालेलीं आहेत.

कॉर्पोरेशनच्या दप्तरांत अजून ४१ अर्जांचा विचार चालू आहे. त्यांपैकीं १४ अर्ज सहकारी कारखान्यांचे असून त्यांची मागणी ५,७७,००,००० रुपयांची आहे. ह्यापैकी ८ अर्ज (५,०२,००,००० रु. कर्जांचें) नव्या सोसायट्यांचे आहेत. पण त्यांपैकी ७ सोसायट्यांना आयातीचा परवाना मिळालेला नाहीं; त्यामुळें त्यांचे अर्ज विचारांत घेतले जाण्यास अवधि आहे. एका सोसायटीला परवाना जून, १९५८ मध्यें मिळाला. उरलेले ६ अर्ज ज्यांना कॉर्पोरेशननें आधीं कर्जें दिलेलीं आहेत, अशा सोसायट्यांचे आहेत.

### दहा वर्षांतील कामकाज

इं. फि. कॉर्पोरेशनला आतां दहा वर्षे पुरीं झालीं आहेत. तिनें आतांपर्यंत कर्जांचे २८१ अर्ज मंजूर केलेले आहेत. त्यांपैकी १७० अर्ज नव्या उद्योगधंद्यांचे (१५ ऑगस्ट, १९४७ नंतर सुरू झालेल्या कारखान्यांचे) आहेत व त्यांना ४०,९८,५०,००० रु. कर्ज मंजूर केलेलें आहे. उरलेल्या १११ अर्जदारांना म्हणजे जुन्या कारखान्यांना २१,९१,५०,००० रु. कर्ज मंजूर केलेलें आहे.

कॉर्पोरेशननें दहा वर्षांत केलेल्या कामाचे ३०-६-१९५८ अखेरचे थोडक्यांत आंकडे असे आहेत:—

| | संख्या | रक्कम रु. |
|---|---|---|
| आलेले कर्जाचे अर्ज | ६२३ | १२४,३४,५०,००० |
| मंजूर केलेलीं कर्जें | २८१ | ६२,९०,००,००० |
| वाटलेलीं कर्जें | | ३४,८४,०५,००० |
| येणें असलेलीं कर्जें | | २८,९४,४८,००० |

**कॉर्पोरेशननें मंजूर केलेलीं व प्रत्यक्ष दिलेलीं कर्जें**

| वर्ष अखेर | मंजूर केलेलीं कर्जें (रु.) | प्रत्यक्ष दिलेलीं कर्जें (रु.) |
|---|---|---|
| जून, १९४९ | ३,४२,२५,००० | १,३२,८९,८१३ |
| जून, १९५० | ७,१९,२५,००० | ३,४०,७४,३१२ |
| जून, १९५१ | ९,५८,२०,००० | ५,७८,६५,८०० |
| जून, १९५२ | १४,०३,४५,००० | ७,५७,०३,८०० |
| जून, १९५३ | १५,४६,७०,००० | १०,०६,७९,८०० |
| जून, १९५४ | २०,७३,७५,००० | १२,८८,६५,७५२ |
| जून, १९५५ | २८,०७,७५,००० | १४,५२,९६,३०४ |
| जून, १९५६ | ४३,२०,७५,००० | १६,७३,१९,६७७ |
| जून, १९५७ | ५५,११,५०,००० | २६,५०,७०,१७४ |
| जून, १९५८ | ६२,९०,००,००० | ३४,८४,०५,१४८ |

**थकलेलें व्याज व मुद्दल**

एकूण येणें कर्जावरील व्याजाची आकारणी १९५७-५८ अखेर ५,१४,६६,६४२ रुपये झाली. त्यांपैकी ५,०६,०१,८३९ रु. व्याज प्रत्यक्ष वसूल झालें. म्हणजे, व्याजाच्या एकूण येण्यापैकी १·७% येणें आलें नाहीं. मुदलाचें येणें ३,७९,९३,१३६ रु. होतें त्यापैकी ३,४९,१४,२३६ रु.ची वसुली झाली. म्हणजे, ६·१% मुद्दल वसूल व्हावयाचें राहिलें. मुख्यतः चार कारखान्यांकडूनच व्याज व मुद्दल थकलेलें आहे. २,२६,६५,३०२ रु. एवढी रक्कम वसुलीस पात्र होण्याच्या आधींच कांहीं कारखान्यांनीं दिली आहे.

**अर्जांना मंजूर केलेल्या रकमेच्या अनुरोधानें छाननी**

| कर्ज | अर्जांची संख्या | रक्कम (रुपये |
|---|---|---|
| १० लक्ष रु. पेक्षां कमी | ११६ | ७,१५,००,००० |
| १० ते २० लक्ष रु. | ६८ | १०,५०,००,००० |
| २० ते ३० लक्ष रु. | २७ | ७,२८,००,००० |
| ३० ते ४० लक्ष रु. | २३ | ८,७६,००,००० |
| ४० ते ५० लक्ष रु. | ३० | १४,३६,००,००० |
| ५० ते ६० लक्ष रु. | ७ | ४,०४,००,००० |
| ६० ते ७० लक्ष रु. | १ | ६४,००,००० |
| ७० ते ८० लक्ष रु. | — | — |
| ८० ते ९० लक्ष रु. | १ | ९०,००,००० |
| ९० लक्ष ते १ कोटि रु. | ५ | ५,००,००,००० |
| १ कोटि रु. पेक्षां जास्त | ३ | ४,२७,००,००० |
| | २८१ | ६२,९०,००,००० |


# सरदारगृह

कॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठीं सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

★ हीरकोत्सवानिमित्त अद्यावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

★ टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

**धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना मुंबई. १९११

मुख्य कचेरी: ९ बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

चेअरमन: श्री. रमणलाल जी. सरैय्या.



ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था [illegible] उपयोगासाठीं दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल—
भागीदारांतर्फें—रु. ४४ लाख
मुंबई सरकारतर्फें—रु. ८१ लाख
रु. १ कोटी २५ लाख

गंगाजळी व फंड रु. ५३ लाख
ठेवी रु. १९ कोटी
खेळतें भांडवल रु. २४ कोटी
बृहन्मुंबई व १० जिल्ह्यांमध्यें ४३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. जास्त माहितीसाठीं चौकशी करावी.

फोन: २५५४७४
तार: फार्मर बँक

**जी. एम. लाड.**
मॅनेजिंग डायरेक्टर

रजिस्टर्ड 'नाग छाप' ट्रेडमार्क

# सुगंधी मालाचे कारखानदार

गेलीं कैक वर्षें अखिल हिंदुस्थानांत खात्रीची म्हणून वापरण्यांत येणारी 'नाग छाप' ॲरोमॅटिक केमिकल्स, इसेन्शिअल ऑईल्स, रेझिनॉइडस् व सर्व प्रकारचे सुगंधी अर्क, इत्यादि माल वापरून आपल्या मालाचा दर्जा कायम ठेवीत आहेत.

हिंदुस्थानांत प्रथमच बनविणारे विख्यात कारखानदार

**एस्. एच्. केळकर आणि कं. (प्रा.) लि.**

३६, मंगळदास रोड, मुंबई २.
शाखा : बंगलोर सिटी.

# रिझर्व्ह बँकेचा अंतर्गत कारभार कसा चालतो ?

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची १ एप्रिल, १९३५ रोजीं स्थापना झाली. तेव्हांपासून बँकेच्या कामांत एकसारखी वाढ होत गेली आहे. नव्या नव्या जबाबदाऱ्या तिच्यावर टाकण्यांत आलेल्या आहेत. विशेषतः गेल्या दहा वर्षांत रिझर्व्ह बँकेचें महत्त्व खूपच वाढलें आहे. ३० जून, १९३९ रोजीं रिझर्व्ह बँकेंत २,५७४ लोक नोकरीवर होते; आतां त्यांची संख्या ८,७८३ झाली आहे ! रिझर्व्ह बँकेचीं मुख्य कामें चलनी नोटा आणि बँकिंगचा व्यवहार ह्यासंबंधीं आहेत. त्यासाठी इश्यू खातें व बँकिंग खातें अशीं दोन स्वतंत्र खातीं आहेत; तींच 'लोकल' ऑफिसें/ बँकेच्या शाखा होत. बँकांची तपासणी व देखरेख, बँकिंग व कर्जपुरवठा ह्याबाबत धोरणें आखणें, हुंडणावळीचें नियंत्रण, सरकारला आर्थिक व द्रव्यविषयक सल्ला देणें, इत्यादि कामें रिझर्व्ह बँकेच्या मुंबई येथील मध्यवर्ती कचेरींत केलीं जातात.

मध्यवर्ती कचेरींत १० शाखा आहेत :—(१) सेक्रेटरीची कचेरी, (२) चीफ अकौंटंटची कचेरी, (३) तपासणी खातें, (४) कायदाविषयक खातें, (५) ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें, (६) बँकिंग कारभार खातें, (७) बँकिंग वाढ खातें, (८) इंडस्ट्रिअल फिनॅन्स खातें, (९) हुंडणावळ नियंत्रण खातें व (१०) संशोधन व आंकडे खातें. बँकेच्या मूलग्राही कामांत दुय्यम कामांची भर पडत असल्यानें बँकेची संघटनाहि व्यापक होत आहे.

### बँकेच्या कचेऱ्या / शाखा

मुंबई, कलकत्ता, मद्रास, व नवी दिल्ली येथें बँकेचीं लोकल बोर्डें आहेत व त्या केंद्रांना कचेऱ्या असें म्हटलें जातें. बाकीच्या केंद्रांना शाखा असें म्हणतात.

रिझर्व्ह बँकेच्या बंगलोर, मुंबई, कलकत्ता, कानपूर, मद्रास, नागपूर आणि नवी दिल्ली येथें स्थानिक कचेऱ्या / शाखा आहेत. प्रत्येक कचेरी / शाखा म्हणजेच बँकेचीं बँकिंग व इश्यू खातीं होत. बँकिंग खातें मॅनेजरच्या हातांत असतें. इश्यू खातें हें करन्सी ऑफिसरच्या मुखत्यारींत असतें, तर संबंद्ध कचेरीचा कारभार मॅनेजर पहातो. हुंडणावळ नियंत्रण खातें, बँकिंग कारभार खातें, ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें ह्यांच्या शाखा आणि कलकत्ता येथील ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें व संशोधन विभाग, हीं सर्व बँकिंग खात्यास जोडलेलीं आहेत. मुंबई येथील मुख्य कचेरींत हीं सर्व खातीं एकत्रित आलेलीं आहेत. इतर केंद्रांत, तेथील मॅनेजरच्या हाताखालीं त्यांचा कारभार चालतो, तर सूचना मात्र मध्यवर्ती कचेरींतूनच येतात; सूत्रें मध्यवर्ती कचेरींतूनच हालतात. बँकेनें एप्रिल १९३६ मध्यें लंडनमध्यें शाखा उघडली. 'हाय कमिशन ऑफ इंडिया' चें खातें चालविणें, भारताच्या कर्जाचा व्यवहार करणें, इत्यादि तिच्याकडे कामें आहेत.

### बँकिंग खातें

सरकारचीं व बँकांचीं बँकर, ह्या नात्याचीं कामें ह्या खात्यांत चालतात. ह्या खात्याच्या सात कचेऱ्या आहेत; प्रत्येकीवर एक मॅनेजर आहे. बँकिंग खात्यांचे चार भाग पाडलेले आहेत. पब्लिक अकौंटस खातें, पब्लिक डेट ऑफिस (कानपूर व नागपूर वगळून), डिपॉझिट अकौंटस खातें व सिक्युरिटीज खातें (कानपूर व नागपूर वगळून). मुंबई येथील कचेरींत चांदीच्या आयातीचे परवाने, सरकारच्या वतीनें सोनें–चांदीची विक्री, हीं कामें बँकिंग खात्यांतच केलीं जातात.

### पब्लिक अकौंटस खातें

मध्यवर्ती सरकार, राज्य सरकारें, सरकारचीं वेगवेगळीं खातीं, मुख्यतः रेल्वेज, ह्यांच्या ठेवींची व्यवस्था पब्लिक अकौंटसकडे आहे. त्यांचे पैसे स्वीकारणें व त्यांच्या वतीनें ते देणें, पैशाची वर्गावर्गी करणें, हीं कामें त्यांत चालतात.

### पब्लिक डेट ऑफिस

मध्यवर्ती सरकारच्या कर्जाची व्यवस्था, हें रिझर्व्ह बँकेचें कायद्यानें ठरवलेलें काम आहे. राज्य सरकारांच्या कर्जाची व्यवस्थाहि बँक पहाते; त्याबद्दल बँकेचे त्या सरकारांशीं करार झालेले आहेत. नव्या कर्जाच्या अटी, रक्कम, व्याज उभारण्याच्या तारखा, पद्धती, वेगवेगळ्या राज्यांच्या कर्ज उभारणींत एकवाक्यता, हीं कामें सेक्रेटरीच्या कचेरींत होतात. सोईसाठी बंगलोर, मुंबई, कलकत्ता, मद्रास व नवी दिल्ली येथील केंद्रांतील पब्लिक डेट ऑफिसेसमध्यें कामाची वांटणी करण्यांत आलेली आहे. पब्लिक डेट ॲक्ट, १९४४ व पब्लिक डेट रूल्स १९४६, ह्यांत सरकारी रोख्यांविषयीं कायदा सांगितलेला आहे. कर्ज-उभारणी, वर्गावर्गी, रिन्युअल, व्याजाचा बटवडा, इत्यादींविषयीं नियम गव्हर्मेंट सिक्युरिटीज मॅन्युअलमध्यें सांगितलेले आहेत.

पब्लिक डेट ऑफिसचें मुख्य काम म्हणजे सरकारी रोख्यांच्या विक्रीच्या रकमा जमा करून रोखे देणें, त्यांवरील सहामाही व्याज देणें, कोणत्या ट्रेझऱ्या–सबट्रेझऱ्यांत व्याज मिळावयाचें त्याचे शेरे मारणें, वेगवेगळ्या रोख्यांचे कागद नवीन करून देणें, रूपांतर करणें, त्यांचे भाग पाडणें, मुदत भरलेल्या रोख्यांचे पैसे देणें, रोख्यांबद्दलच्या तक्रारींची चौकशी करणें, इत्यादि. ट्रेझऱ्यांच्या कामावर सरकारी रोख्यांच्या कामापुरती देखरेख पब्लिक डेट ऑफिसची असते. स्टॉक सर्टिफिकिटें व स्टॉक ह्या स्वरूपांत रोखे दिले जावात; सब्सिडिअरी जनरल लेजरमध्येंहि सरकारी रोखे धारण करतां येतात. १० वर्षांचीं ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटें व १५ वर्षांचीं ॲन्युइटी सर्टिफिकेटें देण्याचें कामहि बँकेच्या पब्लिक डेट ऑफिसकडे आहे.

### डिपॉझिट अकाउंटस

ह्या खात्याकडे बँकेचे अंतर्गत हिशेब, शेड्यूल्ड बँकांनीं कायद्याप्रमाणें ठेवावयाच्या शिलका, बिगर-शेड्यूल्ड व सहकारी बँकांच्या ठेवी, ह्याबाबत कामें आहेत. फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स, विदेशी सेंट्रल बँका, परराष्ट्रीय संस्था, इत्यादींची चालू खातींहि ह्या खात्याकडे असतात. जागतिक चलननिधि व जागतिक बँक ह्यांच्या रुपयाच्या चलनांतील चालू खातींहि संभाळलीं जातात. शेड्यूल्ड बँका व राज्य सहकारी बँका आणि इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन व स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स ह्यांचीं बिलें डिस्कौंट करणें व त्यांना कर्जें देणें डिपॉझिट अकौंटस खात्याचेंच काम आहे. रिझर्व्ह बँकेच्या 'रेमिटन्स' सोईच्या योजनाप्रमाणें पैसे इकडून तिकडे पाठविणें हेंहि ह्या खात्याचें काम आहे. स्टर्लिंगची खरेदी-विक्री, ट्रेझरी बिलांचीं टेंडर्स, इत्यादि कामेंहि केलीं जातात.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ८५,५०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *मॅनेजर.* — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., *चेअरमन*



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) — श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हे | रु. | १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७०,००,०००चे वर |

बँकेचे इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
*मॅनेजिंग डायरेक्टर्स*



स्थापना सन १९३५ — टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. बा. वेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

वेगवेगळ्या केंद्रांतील क्लिअरिंग हौसेसवर ह्याच खात्याची देखरेख असते. बंगलोर, मुंबई, कलकत्ता, कानपूर, मद्रास, नागपूर व नवी दिल्ली येथील क्लिअरिंग हौसेस बँकेच्या प्रत्यक्ष कारभाराचाच एक भाग आहे. बाकीच्या ठिकाणीं स्थानिक क्लिअरिंग हौसेस स्वायत्त आहेत.

### सिक्युरिटीज खातें

सरकारी अधिकारी ह्या भूमिकेंतून सरकारी अधिकाऱ्यांनीं व लोकल ॲथॉरिटीजनीं बँकेकडे ठेवलेल्या रोख्यांची खरेदी, विक्री, सुरक्षितता, इत्यादि कामें ह्या खात्याकडे आहेत. ट्रस्टफंड, कोर्ट ऑफ वॉर्डसच्या इस्टेटी, कंत्राटदारांच्या अनामत रकमा, लोकल ॲथॉरिटीजच्या प्रॉव्हिडंट फंडांची जमा, इत्यादि गोष्टी त्यांत येतात. बँकेजवळ तिला मान्य असलेल्या दलालांची यादी आहे, त्यांचेमार्फत रोख्यांची खरेदी–विक्री केली जाते. इश्यू व बँकिंग खात्यांतर्फे आलेले सरकारी रोखे सिक्युरिटीज खातें संभाळतें. विमा कंपन्या, विदेशी बँका, ह्यांनीं कायद्याप्रमाणें बँकेकडे ठेवावयाचे रोखे ह्याच खात्यांत असतात; कर्ज घेणाऱ्या बँकांनीं तारण म्हणून दिलेले रोखे व कागदपत्रें ह्यांचाहि त्यांत समावेश होतो. त्या सर्वांवरील व्याज वसूल करून त्या त्या मालकाकडे पाठविण्यांत येतें.

### इश्यू खातें

चलनी नोटांच्या व्यवहाराच्या कार्यक्षम कारभारासाठी भारताची सात 'सर्कल्स' मध्यें विभागणी केलेली आहे. इश्यू खात्याच्या प्रत्येक शाखेंत दोन भाग आहेत: जनरल खातें व कॅश खातें. जनरल खात्याचीं कामें म्हणजे नाशिकच्या छापखान्यांतून नोटा आणून त्या करन्सी चेस्ट्सकडे रवाना करणें, इश्यू खात्याच्या जिंदगीची बाजू कायम राखणें, इत्यादि होत. कॅश खातें रोखीचे व्यवहार हाताळतें. ज्या केंद्रांत इश्यू व बँकिंग अशीं दोन्हीं खातीं एकाच इमारतींत आहेत, तेथें दोघांना मिळून एकच ट्रेझरर असतो. जनरल खात्याचीं कित्येक उपखातीं आहेत.

### मुंबईच्या सेंट्रल ऑफिसचीं खातीं

मुंबईच्या मध्यवर्ती कचेरींत १० कचेऱ्या/खातीं आहेत. त्या प्रत्येकाचें काम येथें थोडक्यांत सांगितलें आहे.

### सेक्रेटरीची कचेरी

बँकेच्या धोरणविषयक बहुतेक कामांचें हें केंद्रस्थान आहे. ओपन मार्केट ऑपरेशन्स, मध्यवर्ती व राज्य सरकारांची कर्जउभारणी, ट्रेझरी बिलांची विक्री, मध्यवर्ती व राज्य सरकारांना तात्पुरती कर्जें देणें, सरकारच्या जादा शिलकांची गुंतवणूक, जागतिक फंड व जागतिक बँक ह्यांचेशीं व्यवहार करणें, स्थानिक स्वराज्यसंस्थांना कर्जउभारणीबाबत सल्ला, हीं त्यांतील कांहीं महत्त्वाचीं कामें आहेत. सेंट्रल बोर्ड व त्याच्या कमिट्यांच्या सभा, मध्यवर्ती व राज्य सरकारांशीं धोरणविषयक बाबींवर पत्रव्यवहार, हीं कामेंहि ह्या खात्याकडे आहेत. बँकेच्या पब्लिक डेट खात्याचें नियंत्रण सेक्रेटरीच्या कचेरीच्या द्वारांच होतें.

### चीफ अकौंटंट

चीफ अकौंटंटच्या कचेरींत बँकेचे हिशेब (इश्यू व बँकिंग खात्यांतील) चोख ठेवले जातात. बँकेच्या कारभाराची ही केंद्र कचेरी आहे. बँकेच्या कचेऱ्या व शाखा ह्यांच्या खर्चावर ती नियंत्रण ठेवते. नोकरवर्गाची नेमणूक, नोकरांच्या हितवर्धक योजना, ह्या विषयीं हें खातें वेळोवेळ इतर खात्यांना व कचेऱ्यांना सूचना देतें.

### इन्स्पेक्शन खातें

बँकेच्या इन्स्पेक्टरच्या हाताखालीं हें खातें बँकेच्या कचेऱ्यांची व शाखांची अंतर्गत तपासणी करून चीफ अकौंटंटच्या कचेरीकडे अहवाल धाडतें. त्याखेरीज, बँकेच्या हिशेबांचे तपशीलवार ऑडिट करणारें सेंट्रल ऑडिट खातें आहे.

### लीगल सेक्शन

बँकेच्या वाढत्या जबाबदाऱ्यांच्या दृष्टीनें कायदाविषयक खातें १९५१ मध्यें सुरू करण्यांत आलें. रिझर्व्ह बँक कायदा, बँकिंग कंपनीज कायदा, फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन ॲक्ट, पब्लिक डेट ॲक्ट, स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट, इत्यादि बँकिंग विषयक कायद्यांचा अर्थ हें खातें लावतें व सल्ला देतें. बँकेशीं संबंधित कायद्यांचे मसुदे तयार करणें, नियम तयार करणें, नोटिफिकेशन्स तपासून देणें, हीं कामेंहि ह्या खात्याला करावीं लागतात.

### एक्सचेंज कंट्रोल खातें

फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन ॲक्ट, १९४७ च्या तरतुदीप्रमाणें हुंडणावळ, सोनें–चांदी, रोखे, इत्यादींच्या परदेशी व्यवहाराचें नियंत्रण हें खातें करतें. बँकेचा गव्हर्नर हाच ह्या खात्याचा प्रमुख आहे.

### बँकिंग डेव्हलपमेंट खातें

ग्रामीण भागांत बँकिंगच्या सोयी वाढविणें आणि शेतकऱ्यांच्या कर्जविषयक प्रश्नांचा विचार करणें ह्या खात्याकडे आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या व्यवहाराकडे ह्या खात्याचें विशेष लक्ष असतें. कमी दरानें पैशाची वर्गावर्गी, चलनी नोटा व नाणी ह्यांच्या देवघेवींत सुकरता, ट्रेझऱ्या व सबट्रेझऱ्या ह्यांची सुधारणा, व्यापारी बँकांच्या मार्गातील अडचणींचें निवारण, रिझर्व्ह बँक आणि अल्पबचत योजना चळवळ ह्यांचें साहचर्य राखणें, हीं कामें ह्या खात्यांत चालतात.

### इंडस्ट्रियल फिनॅन्स खातें

औद्योगिक कर्जपुरवठ्याचे सर्व प्रश्न हें खातें हाताळतें.

### ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें

ग्रामीण कर्जपुरवठ्याचें काम वाढलें तसें ह्या खात्याचें कामहि खूपच वाढलें आहे. देशभर शेतमालाच्या साठवणीसाठी व विक्रीसाठी कोठारांची संकल्पित तरतूद ह्या खात्यामार्फत हाताळली जाते.

### बँकिंग ऑपरेशन्स खातें

हिंदी बँकिंगची देखरेख, हें ह्याचें प्रमुख काम. रिझर्व्ह बँकेला कायद्यांनीं तपासणीचे व नियंत्रणाचे व्यापक अधिकार दिलेले आहेत. ह्या खात्यामार्फत रिझर्व्ह बँक सर्व व्यापारी बँकांवर नजर ठेवते. बँकिंगच्या व्यवहारासाठी आलेले लायसेन्सचे अर्ज तपासणें, नव्या शाखांना मंजुरी देणें, भांडवल विक्रीच्या अर्जांचा निकाल करणें, बँकांची वरचेवर तपासणी करणें, बँकांच्या कर्जविषयक अर्जांचा विचार करणें, बँकांना व सरकारला सल्ला देणें, हीं महत्त्वाचीं कामें ह्या खात्याकडे आहेत.

### संशोधन व आंकडेवारी खातें

बँकेला स्वतःचें धोरण ठरविण्यास आणि इतर बँकांना व सरकारांना सल्ला देण्यास हें खातें माहिती पुरवितें. चालू आर्थिक घडामोडींकडे त्याचें सतत लक्ष असतें.

# दि इसलामपूर को-ऑ. पीपल्स बँक लि.

स्थापना १९१६ ] [ रजिष्टर नं. ५४०४

मुख्य कचेरी – उरण इसलामपूर, जि. द. सातारा.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. २६,४२५ |
| रिझर्व्ह फंड | रु. २३,६३८ |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एम्. डी. पवार, ( चेअरमन )
श्री. ए. बी. रोटे, ( व्हा. चेअरमन )
श्री. के. एम्. पोटे, ( सभासद )
श्री. एस. ए. वाकळे, „
श्री. एस. बी. कल्ले „
श्री. डी. टी. रानमाळे „
श्री. एस. ए. इबूशे „

बँकिंगचे सर्व व्यवहार किफायतशीरपणें केले जातात.

ही दीपावलि आमचे भागीदारांस व हितचिंतकांस सुखावह जावो.

डी. डी. लाटकर,
मॅनेजर.

# कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## कोल्हापूर.

स्थापना १९३८

शाखा : हातकणंगलें, इचलकरंजी, जयसिंगपूर, मलकापूर.

| | |
|---|---|
| शेअर भांडवल अधिकृत | रु. ३०,००,००० |
| शेअर भांडवल वसूल | रु. १७,५०,००० |
| ठेवी | रु. ३०,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. ६७,००,००० |

सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात. बँकेच्या वाढत्या व्यापामुळें नवीन शेअर्स विक्रीस काढले आहेत.

ही दिवाळी आमच्या असंख्य चाहत्यांना व सभासदांना भरभराटीची जावो.

के. जी. आंबेकर,
मॅनेजर.

यंदाची दिपवाळी आमचे हितचिंतकांना सुखाची जावो !

************************************

# दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.

कोल्हापूर.

( स्थापना सन १९३३ इ० )

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ३,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. १,०५,५७० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | रु. १,०३,३९२ |
| खेळतें भांडवल | रु. ४,०१,४५२ |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

डी. के. पाटील, मॅनेजर
डी. ए. शिंदे, प्रेसिडेंट

ही दिवाळी आमच्या सर्व भागीदारांस, ठेवीदारांस आणि आश्रयदारांस सुखाची आणि समृद्धीची जावो.

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना ] तालुका–बेळगांव [ १९४१

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. १,००,००० |
| वसूल भाग भांडवल | रु. ७२,५००चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. ७५,५००चे वर |
| ठेवी | रु. ६,९७,०००चे वर |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. २,८३,८००चे वर |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९,००,०००चे वर |

★ या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
★ या बँकेंत सभासदांस आणि ठेवीदारांस नियमितपणा, काटकसर व बचत करण्याची संवय दृढमूल होण्याकरितां निरनिराळ्या आकर्षक बचतठेव योजना चालू केल्या आहेत.
★ या बँकेंतील ठेवीवर आकर्षक व्याज दिलें जातें.
★ बँक आरंभापासून " अ " वर्गांत आहे.

विशेष माहितीसाठी भेटा.

जी. एम्. दळवी,
चेअरमन.

# सल्ला देणाऱ्या बँकेची जबाबदारी कोणती?

कांहीं बँका आपल्या जाहिरातींत ग्राहकांना पैशाच्या व्यवहारासंबंधीं तज्ज्ञांकडून खात्रीचा सल्ला देण्याचें आकर्षण दाखवितात. ग्राहकांना पैसे गुंतविण्याच्या व इतर व्यवहारासंबंधीं पुरेसें ज्ञान पुष्कळदां नसतें. त्यामुळें असा सल्ला घेऊन आपले व्यवहार करणें त्यास सुरक्षितपणाचें वाटणें साहजिक असतें. असा सल्ला एखाद्या बँकेनें आपल्या एखाद्या गिऱ्हाइकाला दिला आणि पुढें बँकेच्या सांगण्यावरून केलेल्या व्यवहारांत गिऱ्हाइकाचें नुकसान झालें, तर बँकेची जबाबदारी कोठवर व काय राहील असा प्रश्न उत्पन्न होतो. ह्यासंबंधीं इंग्लंडमधील एक न्यायनिवाडा उद्‌बोधक आहे. त्याची हकीकत अशी :

एक गृहस्थ एका बँकेकडे गेले आणि त्यांनीं बँकेच्या मॅनेजरला पैसे गुंतविण्याविषयीं सल्ला विचारला. मॅनेजरनें असा सल्ला देण्याचें कबूल केलें आणि अमुक एका 'अ' खाजगी कंपनीचे प्रेफरन्स शेअर्स बँकेमार्फत घ्यावे असा सल्ला दिला. 'अ' कंपनी ही त्याच बँकेची गिऱ्हाईक होती आणि ही गोष्ट त्या गृहस्थांना माहीत होती. पण 'अ' कंपनीनें बँकेकडून बराच मोठा ओव्हरड्राफ्ट घेतलेला होता. त्या कंपनीला नेहमीच पैशाची गरज लागत असे. तें कसेंहि असलें तरी मॅनेजरनें सल्ला दिला म्हणून त्या गृहस्थानें 'अ' कंपनीच्या प्रेफरन्स शेअर्समध्यें आपले कांहीं पैसे गुंतविले. अशा प्रकारचा सल्ला तज्ज्ञाकरवी देण्यांत येईल अशी जाहिरात ती बँक नेहमींच करीत असे.

सल्ला घेणारे गृहस्थ 'अ' कंपनींत आपले पैसे गुंतवूनच थांबले नाहींत. बँक मॅनेजरच्याच सल्ल्यावरून दुसऱ्या एका खाजगी कंपनीला त्याच बँकेनें दिलेल्या ओव्हरड्रॉफ्टबद्दल हमीहि त्यांनीं आपल्या शिरावर घेतली. ह्या दुसऱ्या कंपनीला 'ब' कंपनी असें म्हणूं. ही हमी देतांना बँकेच्या मॅनेजरनें त्या गृहस्थांना असें आश्वासन दिलें होतें कीं, हमीचे पैसे करण्याचा प्रसंग उद्‌भवण्याचा कांहींच धोका नाहीं. पण पुढें असें झालें कीं, 'अ' कंपनीला भागांत गुंतविलेले सर्व पैसे बुडाले आणि 'ब' कंपनीच्या बँकेनें दिलेल्या ओव्हरड्रॉफ्टचे पैसे भरण्याबद्दल त्या गृहस्थांना बँकेकडून नोटिसहि आली. ह्या सर्व प्रकारामुळें ते गृहस्थ अगदीं गोंधळून गेले व त्यांनीं बँकेवर व बँकेच्या मॅनेजरवर हलगर्जीपणाबद्दल दावा लावला.

दाव्याचें काम चालू झाल्यावर सल्ला घेणारे गृहस्थ म्हणाले कीं, ह्या दोन्ही बाबतींत बँकेनें मला अगदीं वाईट सल्ला दिला. पैशाच्या व्यवहाराबाबत कुशल सल्ला आपण देतों असें बँक आपल्या जाहिरातींत म्हणत असते. तो कुशल सल्ला हाच काय? त्यावर बँकेतर्फे अशी बाजू मांडण्यांत आली कीं, जाहिरात दिलेली असो अगर नसो; आपल्या गिऱ्हाइकांना द्रव्यविषयक व्यवहाराबद्दल सल्लामसलत देणें हा कांहीं बँकेच्या धंदेवाईक कामाचा भाग नाहीं. ह्याचा अर्थ असा कीं, संबंधित गृहस्थांना काळजीपूर्वक व अचूक सल्ला देण्याचें बंधन बँकेवर नव्हतें. म्हणून बँक मॅनेजरनें दोन्ही बाबतींत जो सल्ला दिला, त्याबद्दल बँक जबाबदार नाहीं.

न्यायाधीशानें दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर पुढीलप्रमाणें निकाल दिला. "बँकिंगच्या धंद्याची व्याप्ति अगर मर्यादा काय? हा खरा प्रश्न आहे. ह्या बाबतींत निश्चित असा कायदा अगर सर्वसाधारण नियम नाहीं. एखादी बँक आपले व्यवहार कसे चालविते ह्याबद्दलची वस्तुस्थिति लक्षांत घेऊनच त्या विवक्षित बँकेच्या धंदेवाईक व्यवहारांची व्याप्ति व मर्यादा ठरवितां येतील. ह्या खटल्यांतील द्रव्यविषयक सल्ला देण्याचें कार्य बँकेच्या व्यवहारांत बसतें हें बँकेनें दिलेल्या जाहिरातीवरून सिद्ध झालेलें आहे. ज्या दोन व्यवहारांच्या बाबतींत बँकेच्या मॅनेजरनें सल्ला दिला, ते व्यवहार बँकेतर्फे कुशलतनें व काळजीपूर्वक करण्यांत येणाऱ्या इतर व्यवहारांतच मोडतात. तरीसुद्धां वादीला देण्यांत आलेला सल्ला योग्य व काळजी घेऊन आणि कुशलतेनें देण्यांत आलेला नव्हता. खरें पाहिलें तर खटल्यांतील परिस्थितीचा विचार करतां सल्ला द्यावयासच नको होता. म्हणून वादीला जें नुकसान सोसावें लागलें त्याची जबाबदारी बँक व बँकेचा मॅनेजर ह्यांच्यावर पडते. पुराव्यावरून असें दिसतें कीं, बँकेच्या मॅनेजरनें दिलेला सल्ला अप्रामाणिकपणानें दिलेला नव्हता. पण 'अ' कंपनीचे शेअर्स घेण्यांत अगर 'ब' कंपनीबद्दल हमी देण्यांत वादीचें हित आहे, असें मानण्यास बँक मॅनेजरला वाजवी असें कारण नव्हतें. वादी हा बँकेचे गिऱ्हाइक होतें कीं नव्हतें, ह्या मुद्यांत फारसा अर्थ नाहीं. बँक जर नेहमीं सल्ला देत असेल तर संभाव्य गिऱ्हाइकांना सुद्धां काळजीपूर्वक व कौशल्यपूर्ण सल्ला मिळण्याचा हक्क आहे. वादी कांहीं बँकेंत गप्पाटप्पा मारण्यास आला नव्हता. तो गंभीर स्वरूपाच्या कामासाठीं आला होता. तथापि एक गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. बँकेनें दिलेला सल्ला परिणामाच्या दृष्टीनें चुकीचा ठरला एवढ्याच करता अगर सल्ला देतांना बँकेनें विशेष सावधगिरी आणि कुशलता वापरली नाहीं म्हणूनच केवळ बँक निष्काळजीपणानें वागली, असें म्हणतां येणार नाहीं. जोपर्यंत बँक आपल्या गिऱ्हाइकांना सल्ला देतांना वाजवी सावधानता व कुशलता दाखवीत आहे तोंपर्यंत बँक परिणामाबद्दल जबाबदार राहणार नाहीं."

फो. नं. ४१४८४ [ तार : माधवाश्रम, बॉम्बे

★ माधवाश्रम लि. ★

भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय

तसेंच ● उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.
● विवाह-कार्यांची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.
● कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.

★ माधवाश्रम लि., गिरगांव मुंबई ४ ★

उत्पादक:- गद्रे-बंधू सांगली मुंबईराज्य

ऑईल इंजिन्सचे व पंपाचे स्पेअरपार्टस्

प्राईसलिस्ट व व्यापारी अटी यासाठीं लिहा-

# अमेरिकेच्या आर्थिक मदतीची पार्श्वभूमि व धोरणें

अमेरिकेच्या धोरणांत परदेशांना देण्यांत येणारी मदत आणि व्यापार ह्यांना महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. तथापि एखाद्या राष्ट्राच्या हिताची योजना अंमलांत आणण्यास सुद्धां त्या नागरिकांना स्वार्थत्याग करावा लागतो. पण, त्यांतहि परदेशांना देण्यांत येणारी मदत कांहीं विशेष कारणांनीं अप्रिय होऊं शकते. जी साधनसंपत्ति देशांतच वापरली गेली तर अमेरिकन लोकांचें हित साधेल ती सालोसाल परदेशांत मदतीच्या रूपानें पाठविण्यांत यावी हें तर्कशुद्ध न वाटणें साहजिकच आहे. इतकेंहि करून मदत घेणारा देश आपली कृतज्ञता दाखविण्यास नाखूष असला तर बोलावयासच नको. अमेरिकेच्या आर्थिक जीवनांत थोडी व तात्पुरती मंदी झाली तरीसुद्धां परदेशांना करण्यांत येणाऱ्या योजना अधिकच अप्रिय होऊं लागतात. व्यापाराबाबतचें उदार धोरण त्या मानानें इतकें अप्रिय होत नाहीं. कारण, पुष्कळदा अशा धोरणानें विनासायास अनुकूल परिणाम घडवून आणतां येतात. परदेशांना मदत व परदेशांना व्यापारी सवलती ह्या दोन्हीं बाजू एकाच नाण्याच्या असल्यामुळें पुष्कळ अमेरिकन लोक दोन्हींचाहि सारखाच तिरस्कार करतात.

अलीकडे रशियानें परदेशांना उशिरा कां होईना पण मोठ्या प्रमाणावर मदत देण्यास प्रारंभ केला आहे. गेल्या दोन वर्षांत रशियानें १५० कोटी डॉलर्स आर्थिक मदत म्हणून दिले आहेत. दुसरें महायुद्ध संपल्यापासून अमेरिकेनें जे कोट्यावधि डॉलर्स मदतीदाखल खर्च केले आहेत त्यांच्याशीं तुलना करतां ही मदत अल्प वाटेल. पण कित्येक मोक्याच्या देशांना मदत देण्यांत रशियानें आघाडी मारलेली आहे. शिवाय, रशियाची मदत रस्ते, शस्त्रास्त्रें, पोलादाचे कारखाने अशा लक्षांत भरण्यासारख्या गोष्टींच्या स्वरूपांत दिली गेलेली आहे. त्यामुळें रशियाचा प्रचार फारच चांगला होतो. जे देश अद्याप ह्या ना त्या गटांत सामील झालेले नाहींत त्यांच्याशीं मैत्री जोडण्याची शर्यत रशिआ व अमेरिका ह्यांच्यांत चालू आहे. तसें असेल तर ह्या स्पर्धेतून माघार घेणें अमेरिकेला शक्यच नाहीं. रशियाची मदत अमेरिकेला बाधक आहे असें मानण्याचें कारण नाहीं. ज्यांना अविकसित देश असें म्हणतात ते देश रशियाच्या कक्षेंत जाणार नाहींत ह्यांकडे लक्ष देणें अमेरिकेच्या हिताचें आहे. कम्युनिस्ट देशांशीं व्यापार आणि ऐनजिनसी देवाणघेवाण करूनहि आशियांतील व इतर देश राजकीयदृष्ट्या त्यांच्या कच्छपी लागत नाहीं असें मानण्यास पुरेसा पुरावा आहे. पण ह्याहिपेक्षा अधिक व्यापक दृष्टीनें मागासलेल्या देशांना त्यांच्या दारिद्र्यांतून उचलून विसाव्या शतकांत आणून सोडणें हें अमेरिकेच्या अधिक हिताचें आहे. एका बाजूला ऐश्वर्य व दुसऱ्या बाजूला दारिद्र्य अशा परिस्थितींत जगांत शांतता नांदत नाहीं हें खरें असेल तर रशियाच्या मदतीचें अमेरिकेनें स्वागतच केलें पाहिजे. अमेरिकेनें मदत द्यावी आणि ही मदत आर्थिक दृष्ट्या योग्य आधारावर देण्यांत यावी हें फार महत्त्वाचें आहे.

परदेशांना देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतीच्या पायाशुद्धतेबद्दल पुष्कळ अमेरिकन नागरिकांना चिंता वाटते. भारतासारख्या देशाच्या गरजा आणि अमेरिकेतर्फे देण्यांत येणारी मदत ह्यांच्यांत इतकी तफावत आहे कीं दूरच्या कालावधीच्या


# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर, पुणें ४.
फोन नं. ७९८६

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.
[२] सर्वांनीं वाखाणलेलें:
[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली
[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच.
[५] स्वच्छता, टापटीप, कटाक्षानें ठेवली जाते.
[६] हवेशीर खोल्या.

शिवाजीराव शिरोळे
व्यवस्थापक

आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.



# दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि.

१७९ ब, बुधवार पेठ, पुणें २.
फोन नं. ६७०१ स्थापना : १९४५

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ श्री· गंगाधर शिवराम आडकर, वकील, चेअरमन
२ श्री· वसंत विष्णु वर्तक, बी. एस्सी., कारखानदार
३ श्री· महादेव बाळकृष्ण साळवेकर, व्यापारी
४ श्री· हरकचंद मोतीचंद वाफना, व्यापारी
५ श्री· शंकर नारायण वैद्य, बी. ए., एलएल. बी., वकील.
६ श्री· काशिनाथ बाळकृष्ण साळवेकर, मॅ. डायरेक्टर

भांडवल

अधिकृत : १ लक्ष रु. वसूल : ६५ हजार रु.
फंडस : १६ हजार रु. खेळतें भांडवल : ११॥ लाख रु. (अंदाजें)

ठेवीवरील दर

स्पेशल सेव्हिंग्ज ३%

| कायम ठेव | | |
|---|---|---|
| रक्कम रु. १०,००० | ६ वर्षें | रु. १२,७०० |
| रक्कम रु. १०,००० | १० वर्षें | रु. १५,००० |

के. बी. साळवेकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.

दृष्टीनें निराशा वाटण्यासारखी परिस्थिति आहे. अमरिकेची मदत अगदीं जरूर तेवढीच आणि निर्णायक अशी कशी असूं शकेल असा प्रश्न विचारण्यांत येतो. त्याचे उत्तर असें आहे कीं, आर्थिक विकासासाठी भांडवल, तांत्रिक मदत, व यंत्रसाहित्य ह्यांची जरूर असली तरी मदत घेणाऱ्या देशाची परिस्थिति अनुकूल असल्याशिवाय सर्व वायाच जाईल. म्हणून असा निष्कर्ष काढतां येईल कीं आर्थिक विकासांतील खरे मूलभूत प्रश्न बिगर आर्थिक स्वरूपाचेच आहेत. भांडवलाचा संचय आणि तांत्रिक विकास ह्यांचा परिणाम घडून येण्यास जोखीम घेणारा, पुढाकार घेणारा वर्ग तयार झालेला असला पाहिजे. त्याचप्रमाणें समाजांत बाजवी गतिमानता असली पाहिजे व विस्तृत अशी बाजारपेठहि उत्पन्न झालेली पाहिजे. अमेरिकन लोकांना लवकर व एकदम कामें उरकण्याची संवय असते. त्यामुळें पुष्कळदां त्यांची निराशा होते. म्हणून साध्यासुध्या साधनांनीं काय करतां येईल हें पाहिलें पाहिजे. केवळ साधनें साधी आहेत किंवा नाहीं, हें पाहून चालणार नाहीं.

निरोगी आणि सुसंगत आर्थिक विकास साधण्याकडे दुर्लक्ष करूनहि औद्योगिक विकास अतिशय झपाट्यानें व्हावा अशी लोकांची अपेक्षा असते. अमेरिकेचें औद्योगीकरण द्रुत गतीनें झालेलें असल्यानें इतर देशांनींहि त्याच मार्गानें जावें असें अमेरिकन लोकांना वाटतें. तथापि आर्थिक विकासाच्या नियमांचें पृथक्करण केलें असतां काय दिसतें? ज्या देशांतील शेतीचा व्यवसाय स्थिरावलेला नाहीं, ज्या देशांत परंपरागत सांचेबंद जमीनदारी मूळ धरून आहे, त्या देशांची सर्व समाजरचना मागासलेली राहते. शेतीची पुनर्वंटना आधुनिक पायांवर झालेली नसेल तर औद्योगिक क्षेत्रांत चलनवाढ व बेकारी ह्यांचा उपद्रव सुरू होतो. वसाहती म्हटल्या, कीं कच्च्या मालाचीं कोठारें असा समज पक्का रूढ झालेला आहे. त्यामुळें समतोल आर्थिक विकासावर आतां अधिक जोर देण्यांत येत असतो आणि तें बरोबरहि आहे. पण, औद्योगीकरणास लोकांची तयारी झालेली असल्याखेरीज त्यांचा आग्रह धरणें, साधनसंपत्तीच्या विकासाची संधि गमावणें ह्यामुळें पुढील निराशेची व अडथळ्यांची तयारी केल्यासारखेंच होतें. रशिया आपली मदत एखाद्या पोलादाच्या कारखान्याच्या रूपानें अगर तेलाच्या शुद्धीच्या कारखान्याच्या रूपानें देतो. अमेरिकन लोकांची मात्र अशी श्रद्धा आहे कीं औद्योगीकरणाबरोबरच सार्वजनिक आरोग्य, शिक्षण आणि शेतीच्या आधुनिक पद्धतीचा प्रसार ह्यांचाहि पाया घातला गेला पाहिजे. अमेरिकन लोकांना दुसरी अशी एक अस्वस्थता वाटते कीं, परदेशांना देण्यांत येणारी मदत पुष्कळदां त्याला त्या देशांच्या सरकारांच्या अखत्यारांत अगर समाजवादी अर्थशास्त्राच्या कक्षेंत जाते. ह्या अस्वस्थतेला असें उत्तर देतां येईल कीं दुसऱ्या देशांची अर्थव्यवस्था अमेरिकन पद्धतीचीच असावी असा आग्रह बरोबर नाहीं. औद्योगिकदृष्ट्या मागासलेले देश ज्या परिस्थितींत आहेत तिचा विचार करतां अर्थव्यवस्थेवर कांहीं प्रमाणांत सरकारांचें नियंत्रण असणें अपरिहार्य आहे.

अमेरिकेची सुरक्षितता आणि परदेशांना देण्यांत येणारी मदत ह्यांचा अगदीं निकटचा संबंध आहे हें मान्य करूनसुद्धा व्यापाराच्या बाबतींत अधिक उदार धोरण ठेवण्याविरुद्ध अनेक आक्षेप घेण्यांत येतात. अशा धोरणानें कांहीं उद्योगधंद्यांना धक्का लागेल हें खरें. पण हा धक्का सौम्य करण्याचे पुष्कळ मार्ग


श्री वीरशैव को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर [ब्रँच गडहिंग्लज

हेड ऑफिस—कोल्हापूर] स्थापना ४।२।१९४२ [ऑडिट वर्ग 'अ'

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. | १,२५,००० |
| विक्रीस काढलेलें | रु | १,१५,००० |
| खपलेलें भाग भांडवल | रु. | १,१५,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६२,५०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. | ६३,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ८॥। लाखांचे वर |

मे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) मे. एम. बी. चौगुले (अध्यक्ष), (२) मे. एस. व्ही. नष्टे (उपाध्यक्ष), (३) मे. डॉ. एस. एस. घाळी, (४) मे. एस. के. पट्टणशेट्टी, (५) मे. एस. ए. देसाई, (६) मे. के एस. करंबळी, (७) मे. सी. जी. हंशेट्टी, (८) मे. डी. बी. सोत, (९) मे. एस. एन्. मिश्रकोटी, (१०) मे. व्ही. एस. डोईजड, (११) मे. सी. एन्. आजरी (चेअरमन, ब्रँच-सल्लागार मंडळ).

मॅनेजर. श्री. एम्. जी. जोटकर B. A. (HONS.),
ब्रँच मॅनेजर एम्. एन्. सुलतानपुरे Coop. Dip.

(१) सर्व जमातींला सभासदत्व खुलें.
(२) मुंबई राज्यांतील सर्व व्यापारी पेठेवरील चेक्स व ड्राफ्ट्स मिळतात.
(३) माफक दरानें कर्ज दिलें जाऊन आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
(४) सर्व प्रकारचे अद्यावत् बँकिंगचे व्यवहार केले जातात.
(५) भारताच्या नियोजनबद्ध अर्थसंकलनास स्वतःच्या ताकतीप्रमाणें मदत करून अंतिम ध्येयसिद्धि समाजवादी समाजरचना निर्मिण्याप्रत अव्याहत धडपड व वाटचाल करीत आहे. सहकारी साम्राज्य स्थापन होण्याबद्दल प्रयत्न करीत असलेल्या राज्ययंत्रणेस अल्पशी मदत करीत आहे.



दि इसलांपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

इसलांपूर ( जि. द. सातारा )
( स्थापना १९३५ )



| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. | २६,२०५ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ११,६२२ |
| खेळतें भांडवल | रु. | २,१६,२२४ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


कृ. द. बोरकर
सेक्रेटरी.

गो. ल. फडणीस,
बी. ए., एलएल. बी.,
चेअरमन.

आहेत. कामगारांना पुन्हां शिक्षण देतां येईल, दुसऱ्या प्रकारचा माल निर्माण करतां येईल आणि आपत्तींत सांपडलेल्या उद्योग-धंद्यांना सरकारला प्रत्यक्ष मदतहि करतां येईल. परदेशांना मदत देण्याच्या ज्या धोरणाला उदार व्यापारी धोरणाचा आधार नसेल तें धोरण अयशस्वी होईल ह्यांत मुळींच शंका नाहीं. अविकसित देशांचें निरोगी औद्योगीकरण साधण्यासाठी कच्च्या मालाच्या बाजारपेठांची आवश्यकता आहे. अमेरिकेलाहि त्याची जरूर आहे. अमेरिकेला लागणाऱ्या लष्करी महत्त्वाच्या कच्च्या मालापैकी तीन चतुर्थांश माल मागासलेल्या देशांकडूनच येतो. रशिआ मागासलेल्या देशांना पक्का माल व शस्त्रास्त्रें पुरवितो आणि त्याच्या बदला गहूं, कापूस, तांदूळ, इत्यादि माल घेतो. अमेरिकेला हें उदाहरण गिरवितां आलें नाहीं तरी मागासलेल्या देशांत तयार होणाऱ्या मालाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यासाठी स्वतंत्र जगांतील बाजारपेठांची संघटना करतां येणें शक्य व्हावें. जगांत दूरवर पसरलेल्या लोकांचें राहाणीचें मान सुधारावें हा परदेशांना देण्यांत येणाऱ्या मदतीचा सर्वसामान्य हेतु आहे. त्याचप्रमाणें अमेरिकेच्या दोस्तांना सामर्थ्यशाली करणें आणि अमेरिकेचे युद्धतळ सुरक्षित राखणें हाहि एक हेतू आहे. हाच युक्तिवाद व्यापारालाहि लागू आहे. आज देण्यांत येणाऱ्या मदतीचें हळूहळू कर्जांत व खाजगी उद्योगधंद्यांत गुंतविलेल्या भांडवलांत रूपांतर करतां येणें शक्य आहे.


दि बँक ऑफ कराड लिमिटेड

शाखा : सातारा ] हेड ऑफिस : कराड [ शाखा : इस्लामपूर




| | रु. |
|---|---|
| वसूल भांडवल | २,३०,००० |
| रिझर्व्हज् | ९०,००० |
| ठेवी | २७,००,००० |

अद्यावत पद्धतीचे सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.
चेअरमन : श्री. ना. बा. बुधकर
व्हा. चेअरमन : श्री. म. रा. देशपांडे,
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर
मॅनेजर.

३१-१०-१९५८.

दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली



| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ७,६७,१७० |
| गंगाजळी | रु. | २,५८,४१० |
| ठेवी | रु. | ५१,१६,७७४ |
| खेळतें भांडवल | रु. | ९०,४१,५३० |

:: शाखा ::

१ जत २ मिरज ३ तासगांव
४ विटें ५ आटपाडी ६ शिराळें
७ इस्लामपूर ८ मार्केट यार्ड, सांगली. ९ कडेगांव

पी. वी. टाकवेकर, मॅनेजर.
गुलाबराव आर. पाटील, चेअरमन.

# आर्थिक मंदीचे राजकीय परिणाम

आशिआ आणि आफ्रिका खंडांतील देशांतून सध्यां कमी-अधिक प्रमाणांत राजकीय अस्थैर्य दिसून येत आहे. ह्या अस्थैर्याच्या कारणांपैकीं एक कारण त्या त्या देशांतील मालाच्या उतरत्या किंमती हें आहे. बहुतेक देश कापूस, ताग, मसाल्याचे पदार्थ, चहा, अशासारख्या निवडक वस्तू पाश्चिमात्य देशांना निर्यात करतात व परदेशीय चलन मिळवितात. त्या चलनाचा उपयोग करून त्यांना लागणारा भांडवली व रोजखपाचा माल ते विकत घेतात. ह्या वस्तू दुर्लभ होऊं लागल्या कीं त्यांच्या किंमती वाढतात व त्यामुळें स्थानिक सरकारें डळमळूं लागतात.

सूदानमध्यें सध्यां अशीच परिस्थिति निर्माण झाली आहे. सूदानला आपला कच्चा कापूस आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत योग्य किंमतीला विकता येत नाहीं. ह्या परिस्थितीचा फायदा देशांतील विरोधी पक्षांनीं घेऊं नये म्हणून सूदानच्या सरकारनें राजकीय स्वरूपाच्या सभांना व मिरवणुकींना बंदी केली आहे. त्याचबरोबर फ्रान्स व पूर्व युरोपांतील राष्ट्रें ह्यांच्याबरोबर ऐनजिनसी बदल्याचे करारहि करण्यांत आले आहेत. सूदानची परदेशीय चलनाबाबतची स्थिति बिकट झाल्यानें अमेरिकेनें जरूर त्या मालाची आयात करण्यासाठी सूदानला ५० लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे पण, ह्याचा अर्थ सूदानला आर्थिकदृष्ट्या परावलंबी करण्याचा अमेरिकेचा डाव आहे, असा करण्यांत येत आहे. केवळ सूदानमध्येंच अशी परिस्थिति उद्भवली आहे असें नाहीं. भारत, ब्रह्मदेश, सीलोन, पाकिस्तान आणि दक्षिण अमेरिकेंतील कित्येक देशांतहि अशीच परिस्थिति निर्माण होऊं पहात आहे. ब्रिटनसारखे देश पूर्वेकडील देशांकडून अनेक प्रकारचा कच्चा माल आयात करीत असतात. त्यांची मात्र उतरलेल्या किंमतीमुळें चंगळ झाली आहे.

व्यापारांत मंदी येते तशी तेजीहि येते, हें खरें. पण, ज्या उद्योगप्रधान देशांना मंदीचा फायदा मिळत आहे, त्यांनीं एका गोष्टीकडे लक्ष देणें आवश्यक आहे. मागासलेल्या देशांत पैदा होणाऱ्या कच्च्या व इतर मालाच्या किंमती उतरल्यामुळें आर्थिक अनवस्था तर माजतेच. पण त्याचबरोबर राजकीय दृष्ट्याहि मोठी किंमत द्यावी लागते. म्हणून उद्योग-प्रधान देशांनीं आयातीच्या बाबतींत अधिक उदार धोरण ठेवण्याची आवश्यकता आहे. अमेरिकन सरकारनें आयातीवर लादलेलीं बंधनें आतां जरूरीचीं राहिलेलीं नाहींत. अमेरिकन उद्योगधंदे ज्यावेळीं बाल्यावस्थेंत होते तेव्हांची गोष्ट वेगळी होती. खुल्या व्यापाराबद्दल पश्चिम जर्मनी आपली पाठ थोपटून घेतो. पण आयातीच्या बाबतींत त्याहि देशाचें धोरण संरक्षण-वादीच आढळून येतें. गरीब देशांना मदत करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे उदार हातानें कर्जे देणें आणि खाजगी भांडवल गुंतविणें. हा मार्ग अनुसरण्यांत येत आहे. पण पुष्कळदां देण्यांत येणारीं कर्जे फार थोडीं असतात व तींहि फार उशिरा दिलीं जातात. शिवाय, रशिआ व अमेरिका ह्यांच्यांतील थंड्या युद्धामुळें ही आर्थिक मदत दिली जाते. योग्य वेळीं व योग्य प्रकारानें मदत दिली गेली नाहीं तर कम्युनिझमच्या प्रसाराला उपकारक अशी परिस्थिति निर्माण होऊं लागते.

---




ही दीपावलि आमचे भागीदारांना व खातेदारांना सुखसमृद्धीची जावो !

***********************************

वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर

सुप्रतिष्ठित व अग्रेसर बँकेंत खातें उघडा.

***

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

मध्यें खातेदार होऊन आर्थिक व व्यापारी व्यवहार सोयीचे करा. बँकिंगच्या विविध व वैशिष्ट्यपूर्ण सेवेंत महाराष्ट्र बँक कृतार्थता मानते !

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे श्री. फ. दो. पदमजी
श्री. मा. वी. शहा श्री. भा. म. गुप्ते
श्री. म. बा. जांभेकर श्री. म. स. पारखे

बँकेच्या ४४ शाखा

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर–तीन शाखा, जव्हेरी बाजार व शींव ), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर, हिंगोली, हुबळी, दृ. हैदराबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, लातूर, मोमिनाबाद, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें ( भवानी पेठ, डेक्कन जिमखाना, खडकी, सोमवार पेठ, टिळकरोड व शिवाजीनगर ), परळी वैजनाथ, रत्नागिरी, सांगली, सोलापूर, ( फलटण गल्ली व मुरारजी पेठ ), श्रीरामपूर व ठाणें.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

हीं दिवाळी व नवें वर्ष सर्वांना
सुखसमृद्धीचें जावो !

देना बँक
देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड
स्थापना १९३८

नवी सेव्हिंग योजना व्याज २½%
पांच वर्षांची कॅश सर्टिफिकिटें व्याज ४¼%

भविष्यकाळासाठी
बचत करा.

प्रवीणचंद्र व्ही. गांधी
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि सातारा स्वदेशी
कमर्शिअल बँक लिमिटेड
सातारा.

स्थापना : १९०७ ] [ हेड ऑफिस : सातारा

सुवर्णमहोत्सव साजरा केलेली महाराष्ट्रांतील
पहिली बँक

] भांडवल [

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | २,४०,८८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | २,७४,७०० |
| ठेवी | रु. | ४४,६७,००० |

शाखा :—कराड, ओगलेवाडी, कोरेगांव व मसूर.

अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें
स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कृ. दि. माजगांवकर,
चेअरमन.

म. ह. जोगळेकर,
बी. ए., बी. कॉम.
मॅनेजर.

दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
मुख्य कचेरी : १५०, भांदूर गल्ली, बेळगांव.
शाखा ११

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. | १४,४३,५५० |
| गंगाजळी व इतर फंड | रु. | ८,७१,५१० |
| ठेवी | रु. | १,८०,१४,२११ |
| खेळतें भांडवल | रु. | २,०७,५१,९५६ |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बैलहोंगल व बेळगांव बझार शाखेंत मौल्यवान् वस्तूंच्या
सुरक्षिततेसाठी लॉकर्सची व्यवस्था आहे.

व्ही. सी. मेडलेरी,
बी. कॉम.
मॅनेजर.

एम. एस. होसमनी
चेअरमन.

फोन नं. १०३ बेलापूर रोड एक्सचेंज :: तारेचा पत्ता :–छत्रपती

दि राहुरी सहकारी
साखर कारखाना लि.
श्रीशिवाजीनगर
ता. राहुरी, जि. अहमदनगर.
रेल्वे स्टेशन :—राहुरी, सेंट्रल रेल्वे

पांढरी शुभ्र व दाणेदार साखर उत्पादन होत असून बाजारपेठांमध्यें ती चांगल्या प्रतीची ठरलेली आहे. राहुरी तालुक्यांतील ४३ खेड्यांतील ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं सहकारी तत्त्वावर चालविलेला कारखाना.

कारखान्याच्या मशिनरीची शक्ति दररोज १००० टन ऊंस गाळण्याची असून सन १९५७–५८ सालचा हंगाम हा पहिलाच हंगाम असूनहि उत्कृष्ट दर्जाच्या १,२७,०४९ पोतीं साखरेचें उत्पादन झालें आहे.

के. वि. कालेवार,
मॅनेजिंग डायरेक्टर.

बा. बा. तनपुरे,
व्हाइस चेअरमन.

## साखरेचा आंतरराष्ट्रीय व्यापार

साखरेच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी ५ वर्षें मुदतीचा करार संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या साखर परिषदेनें नुकताच केला आहे. ह्या कराराप्रमाणें भारताला १ लाख टन साखर निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. साखरेच्या जागतिक व्यापारांत भारताचें स्थान फारसें मोठें नाहीं. क्यूबा ह्या देशाला सर्वांत जास्ती म्हणजे दरसाल २० लाख टनावर साखर निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. साखरेची निर्यात करणाऱ्या इतर देशांच्या मानानें भारताला देण्यांत आलेला वांटा अगदीं अल्प आहे. तथापि ही कांहीं मुख्य अडचण नाहीं. भारतापुढें खरा प्रश्न आहे तो असा कीं, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत साखरेच्या किंमतींत जी स्पर्धा होते तिला तोंड कसें द्यावयाचें? शिवाय दुसरें असें कीं, भारतामधील साखरेची मागणी वाढत आहे आणि किंमतीहि वाढल्या आहेत. तेव्हां ही मागणी पुरी करून परवानगी असलेली निर्यात तरी कितपत करतां येईल हाहि प्रश्नच आहे. तरीसुद्धां, ५०,००० टन साखर निर्यात करतां येईल. असा अंदाज करण्यांत आला आहे. साखरेवरील अबकारी करांत देण्यांत आलेली सूट आणि उसावरील पट्टीचे कमी करण्यांत आलेले दर लक्षांत घेऊन सुद्धां वरील निर्यातींत तोटाच येण्याचा संभव आहे. गेल्या कांहीं वर्षांत दक्षिण भारतांत साखरेच्या धंद्याची बरीच वाढ झाली आहे. ह्या भागांतील साखरेच्या कारखान्यांतील साखरेच्या उताऱ्यांत व एकरीं उसाच्या पिकांत लक्षांत घेण्यासारखी वाढ होणें शक्य आहे असें सांगण्यांत येतें. तसें झाल्यास साखरेच्या उत्पादनाची किंमत कमी करतां येईल आणि आजूबाजूच्या बाजारपेठांत भारताला आपलें बस्तान बसवितां येईल.

## रशिआ व चीन धान्य निर्यात करण्याची शक्यता

संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या अन्न व शेतीविषयक उपसंघटनेचा ताजा अहवाल तयार झाला आहे. अहवालांतील माहितिप्रमाणें जगांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढत असून रशिआ व चीन हे देश अन्नधान्याची निर्यात करूं लागतील अशीं चिन्हें दिसत आहेत. जगांतील अन्नधान्याच्या बाजारपेठांवर त्यामुळें परिणाम होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षीं जगभर अन्नधान्याच्या उत्पादनांत घट झालेली होती. अमेरिका, रशिआ आणि चीन ह्या देशांतील हवामान पिकांना अनुकूल असें राहिल्यामुळें अन्नधान्याची वाढ शक्य झाली आहे. १९५८–५९ सालांतील अमेरिकेचें गव्हाचें उत्पादन ३·९ कोटी टन होईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या मानानें गव्हाच्या बाबतींत ५० टक्के वाढ होणें संभवनीय दिसते. मक्यासारख्या कमी प्रतीच्या अन्नधान्याचें उत्पादन १ कोटी टनांनीं वाढेल असें दिसत आहे. कॅनडांतील गव्हाचें उत्पादन १ कोटी टनाच्या आसपास स्थिर राहील असा अंदाज आहे. तांदुळाच्या बाबतींतहि १९५८–५९ साल हें त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें बरें जाण्याचीं लक्षणें आहेत. ब्रह्मदेश व सयाम हे देश तांदुळाच्या निर्यातींत प्रमुख असतात. दोन्ही देशांतील भाताचें पीक चांगलें आहे. चीन व रशिआंत तर अन्नधान्याचीं पिकें अमाप आलेलीं आहेत. रशिआला पूर्व युरोपांतील आपल्या मित्रराष्ट्रांसाठी अन्नधान्याची आयात करावी लागत होती. पण नवीन पिकें चांगलीं आल्यामुळें त्या देशांच्या गरजा खुद्द रशिआच भागवूं शकेल. चीनमध्यें तांदुळाचें उत्पादन वाढलेलें आहे. चीन आशिआंतील कांहीं राष्ट्रांना तांदूळ निर्यात करूं लागला आहे. युरोपांतील कांहीं राष्ट्रांनाहि चीनकडून तांदूळ मिळण्याची शक्यता आहे.


ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो!

# दी बँक ऑफ औंध लि.

(सरकारी कंपनी) (स्थापना : १९३८)

हेड ऑफिस :—१११–११२, सदाशिव पेठ, सातारा शहर.

शाखा:—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... ... | रु. १,४१,००० |
| वसूल भांडवल | ... ... | रु. १,७०,५०० |
| रिझर्व्हस् | ... ... | रु. १,०३,००० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. ११,००,००० |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल्. बी. वकील, सातारा.

श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल्. बी. वकील, सातारा.

डॉ. माधव दत्तात्रय वकील, एल्. सी. पी. ॲंड एस्. डी. ओ. एम्. एस्. (बॉबे).

श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

श्री. रंगराव पांडुरंग शालगर, बी. एस्. सी., व्यापारी, सातारा.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

खालील वाढलेल्या दरानें मुदत ठेवी स्वीकारण्यांत येतात
१ वर्ष–३॥ टक्के, ३ वर्षें–४ टक्के, ५ वर्षें–४। टक्के, ७ वर्षें–४॥ टक्के, १० वर्षें–५ टक्के.

मुंबई, पुणें, अहमदाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, बंगलोर, भिवंडी, नागपूर, हुबळी, कोपरगांव, वगैरे प्रमुख ठिकाणांवर माफक दरांत ड्राफ्ट दिले जातात.

शेअर्स व गव्हर्मेंट सिक्युरिटीजची खरेदी–विक्री केली जाते.

विशेष माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

वा. वा. धमंडे, C. A. I. I. B., मॅनेजर. न. गं. जोशी, B. A., LL. B., चेअरमन.



# दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लिमिटेड, हुपरी

स्थापना ] जिल्हा कोल्हापूर [ २६-१-५०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें व वसूल शेअर | रु. | ७०,४६० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १६,५०३ |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५७,५२१ |

सभासदांच्या शक्य तों सर्व प्रकारच्या अडचणी सहकार्यानें दूर करण्याचा प्रयत्न करणें, हें ह्या बँकेचें एक वैशिष्ट्य आहे.

आ. बा. नाईक
मॅनेजिंग डायरेक्टर

### भूमिगत अणुस्फोटानें घबराट

अमेरिकेनें आपल्या चालू अणुस्फोटाच्या सत्रांत सर्वांत प्रचंड असा भूमिगत अणुस्फोट केला. अणुस्फोट लॉस अँजेलिस शहरापासून १५० मैल दूर असलेल्या नेव्हाडा ओसाड भागांत करण्यांत आला. पण त्यानंतर लवकरच शहरावरील वातावरण दूषित झाल्याचें आढळून आलें. दूषित वातावरणाची माहिती रेडिओवरून देण्यांत आल्याबरोबर शहरांतील कचेऱ्यांनीं आपल्या खिडक्या बंद केल्या. ह्या स्फोटामुळें जमिनीच्या पोटांतील दगड व माती १,००० फुटांपर्यंत वर फेकली गेली, व स्फोटाच्या जागेपासून ४॥ मैलांवरील असलेली जमीन हादरली.

### वैमानिक प्रवासाचे स्वस्त दर

ब्रिटिश युरोपिअन एअरवेज ह्या ब्रिटिश कंपनीनें प्रवाशांना जगांत सर्वांत कमी दरानें वैमानिक प्रवास घडविण्याचें ठरविलें आहे. हा दर प्रत्येक मैलाला २ पेन्स ३ फार्दिंग असा असून तो ब्रिटनमधील चार प्रमुख विमानमार्गांवरच चालू राहील. आठवड्याच्या शेवटीं गमतीनें प्रवासास जाणाऱ्यांची त्यामुळें चांगली सोय झाली आहे. तिकिटें परतप्रवासाचीं असतात व तीं ८ दिवसपर्यंत चालतात.

### तांत्रिक-कुशल कामगार

आंध्र प्रदेश सरकारनें आपल्या भागांत केलेल्या पाहणीवरून असें दिसून आलें कीं, तांत्रिक शिक्षण घेऊन तयार झालेल्या कामगारांचा बराच तुटवडा आहे. सिव्हिल एंजिनिअरिंगच्या पदवी–परीक्षा पास झालेल्या व डिप्लोमा प्राप्त करून घेतलेल्या लोकांची दरसाल प्रत्येकी ४०० इतकी तूट आहे. ही तूट भरून काढण्यासाठी ऑल इंडिआ कौन्सिल फॉर टेकनिकल एज्युकेशननें तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांतून २० टक्के विद्यार्थी अधिक घेण्यांत यावेत, असें ठरविलें आहे.

### इमारतींवरील आक्षेपार्ह जाहिराती

ज्या इमारती लोकांना सहज दिसण्यासारख्या आहेत अशा इमारतींच्या भिंतींवर आक्षेपार्ह भित्तीपत्रकें अगर जाहिराती लावण्यास बंदी करणारें एक बिल मद्रासच्या विधानपरिषदेंत प्रविष्ट करण्यांत आलें आहे. अशा प्रकारच्या आक्षेपार्ह जाहिराती लावणाऱ्याला १ वर्षाची कैद अगर १,००० रुपये दंड किंवा दोन्हीं शिक्षा देण्याची तरतूद बिलांत करण्यांत आली आहे. ही बंदी घोषवाक्यांनाहि लागू आहे.

रुचकर जेवणाकरितां प्रसिद्ध
जनसेवा भोजनालय
लॉजिंग-बोर्डिंग
प्रोप्रा: डी. जी. गोरे, डे जि पोस्टाजवळ, पुणें नं. ४
टे. नं. ७१२६

सुक्या मेव्याचे आद्य प्रवर्तक
द. ना. हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी,
२० शुक्रवार पेठ, पुणें १.

ढेकूण, झुरळें, पिकावरील कीटक, वाळवी आणि इतर अन्य कीटकांचा पूर्ण नाश करणारा
कर्दनकाळ
"डी. डी. टी ६६६" वापरा.
"डी. डी. टी स्प्रे सर्व्हिसकरितां आम्हांस पाचारण करा !
टेलिफोन नं. २७५५७
अन्ना लॅबॉरेटरीज, ३३, मंगळवाडी, मुंबई ४.

सांडू अनुभवसिद्ध औषधें
बाळकडू
तान्ह्या मुलांकरितां..
अरविंदासव
मुलांच्या रिकेटस्वर..
कुमारी आसव नं. ३
मुलांचें लिव्हर टॉनिक..
बालामृत
(व्हिटॅमिनयुक्त)
मुलांचें टॉनिक..
ग्रिपनो
ग्राईप मिक्श्चर
लहान मुलांकरितां..

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
चेंबूर–मुंबई ३८
पुणें शाखा :— सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड ( गोखले हॉल शेजारी ), पुणें २.

# १००१ कंपन्यांची प्रगति

रिझर्व्ह बँकेनें भारतांतील १००१ लिमिटेड कंपन्यांविषयीं १९५५ व १९५६ सालविषयक एकत्रित आंकडे प्रसिद्ध केले आहेत. त्यांत बँकिंग, विमा व इन्व्हेस्टमेंट कंपन्यांचा समावेश केलेला नाहीं.

या आंकड्यांवरून दिसून येतें, कीं कंपन्यांची जिंदगी, विक्री, नफा, कराची तरतूद, डिव्हिडंड, ह्या सर्वांत वाढ झाली. परंतु, न वाटतां कंपन्यांतच मुरविलेल्या नफ्यांत फरक पडला नाहीं.

१००१ कंपन्यांची प्रगति
( आंकडे कोटि रुपयांचे )

| | १९५५ | १९५६ | वाढ % |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल अधिक रिझर्व्हज् | ७,४२ | ८,०९ | ९·१ |
| ग्रॉस फिक्स्ड असेटस् ... | ९,३२ | १०,६५ | १४·३ |
| नेट फिक्स्ड असेटस् .... | ५,२५ | ६,२१ | १८·२ |
| इन्व्हेंटरी ... | ४,१७ | ५,०६ | २१·४ |
| एकूण जिंदगी ... | १४,२० | १६,३८ | १५·३ |
| एकूण उत्पन्न ... | १६,०३ | १८,१९ | १३·५ |
| मालाची विक्री ... | १३,८८ | १५,५१ | ११·८ |
| करापूर्वी नफा ... | १,१७ | १,२८ | ९·७ |
| करानंतर नफा ... | ६६ | ७० | ५·० |
| डिव्हिडंड ... | ३९ | ४२ | ९·० |
| न वांटलेला नफा ... | २८ | २८ | –०·५ |
| एकूण गुंतवलेल्या भांडवलाशीं ठोक नफ्याचें प्रमाण ... | १०·१ | ९·५ | |
| ठोक विक्रीशीं ठोक नफ्याचें प्रमाण ... | १०·४ | १०·० | |
| वसूल भांडवलाशीं (ऑर्डिनरी भाग) डिव्हिडंडचें प्रमाण | ८·९ | ९·४ | |

### विक्रींत वाढ

ह्या १००१ कंपन्यांची एकूण विक्री १९५५ मध्यें १३८८ कोटि रु. होती, ती १९५६ मध्यें १५५१ कोटि रु. झाली. म्हणजे, विक्रींत ११·८% वाढ दिसून आली. साखर, इंजिनिअरिंग व मळे ह्यांच्या विक्रींतील वाढ ३०% भरली. पगार व मजुरी ह्यांत २४ कोटि रुपयांची वाढ होऊन त्यांची रक्कम २५७ कोटि रु. झाली. मॅनेजिंग एजंटांचा मोबदला मात्र १५ कोटि रु. चा १२ कोटि रु. वर आला.

### नफ्यांत वाढ

कराची तरतूद करण्यापूर्वीचा नफा १९५६ मध्यें ९·७% वाढून तो ११७ कोटि रु. चा १२८ कोटि रु. झाला. कराची तरतूद मोठ्या प्रमाणावर करावी लागल्यामुळें, करानंतरचा नफा फक्त ३·३ कोटि रु. नीं वाढून तो ७० कोटि रु. भरला. शिपिंग व चहा ह्यांच्या नफ्यांत कमालीची वाढ झाली. वाटलेला नफा ३·५ कोटींनीं वाढून तो ४२ कोटि रु. भरला.

ऑर्डिनरी डिव्हिडंडवरील सरासरी दर ८·९% चा ९·४% वर गेला. डिव्हिडंडचा दर १९५२ पासून दरसाल वाढत गेलेला आहे.

### बँकांनीं केलेला कर्जपुरवठा

कंपन्यांनीं १९५६ मध्यें बाहेरील रकमांचा वापर मोठ्या




## दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

यंदाची दिवाळी आमचे ग्राहकांस सुखसमृद्धीची जावो.

★ ठेवी ( दि. ३१–१२–५७ )
रु. १,५५,१४,५०,६६४ ( एक अब्ज, पंचावन कोटी, चौदा लक्ष, पन्नास हजार, सहाशें चौसष्ट )

★ ४ टक्के चक्रवाढ व्याजाचीं तीन वर्षें मुदतीचीं कॅश सर्टिफिकेटस्.

★ अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर.

★ टिळक रोड शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.

– पुण्यांतील शाखा –

ईस्ट स्ट्रीट पुणें १, टिळक रोड पुणें २, लक्ष्मी रोड पुणें २.

## बँक ऑफ पूना लि.

–शेड्यूल्ड बँक–

बँकेचे खातेदार, भागीदार व हितचिंतक यांना दीपावलि व नवीन वर्ष सुखाचें जावो.

: मुख्य ऑफिस :

४५५ रविवार पेठ, पुणें २.

शाखा

( १ ) ३६१ सदाशिव ( २ ) डेक्कन जिमखाना पुणें ( ३ ) सांगली.

प्रमाणावर केला. १९५५ सालीं एकूण फंडांपैकी ४४% रक्कम बाहेरची होती; १९५६ मध्यें ती ६३% भरून १६१ कोटि रुपयांवर गेली. ह्या बाहेरील फंडापैकी बँकांचें कर्ज ७३ कोटि रु. ( २८% ) होतें; १९५५ सालीं तें फक्त ६% होतें. व्यापारी व चालू देणीं ४३ कोटि रु. ( १७% ) होतीं. इंजिनिअरिंग, सिमेंट, लोखंड–पोलाद, वनस्पति, वीज, साखर, कपास, कापड, शिपिंग, इत्यादींनीं बँक कर्जांचा अवलंब मोठ्या प्रमाणावर केला.

### नवें शेअर भांडवल

कंपन्यांनीं नवें शेअर भांडवल व डिबेंचर्स ह्यांची उभारणी केली, त्यांची रक्कम २४ कोटि रु. भरली. त्यांपैकी ७६% रक्कम ऑर्डिनरी भागांची होती; १८% प्रेफरन्स भागांची होती व ६% डिबेंचर्सची होती.

---

### शार्कलिव्हर ऑइलचा कारखाना

आंध्र राज्य-सरकारनें शार्कलिव्हर ऑइल तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. सरकारच्या मच्छीमारी खात्यानें शार्क मासे पकडण्याची स्वस्त पद्धत कोळ्यांना शिकविण्याची योजना आंखली आहे. आंध्रच्या समुद्रकिनाऱ्या-लगत शार्क मासे मोठ्या प्रमाणावर आढळून येत असल्यानें कारखान्याला ह्या माशांचा भरपूर पुरवठा करतां येण्यासारखा आहे.

### हॉरलिक्सच्या १४,००० बाटल्या जप्त

कलकत्त्यामधील पोलिसांनीं कलकत्ता म्युनिसिपल मॉर्केट भागांतील तीन गुदामांवर धाड घालून हॉरलिक्सच्या १४,००० बाटल्या ताब्यांत घेतल्या. सर्व बाटल्या एक पौंडाच्या आहेत. तीन लोकांना ह्या प्रकरणीं अटक करण्यांत आली आहे. संबंधित व्यापाऱ्यांनीं आपल्याजवळील मालाच्या योग्य अशा याद्या ठेवलेल्या नाहींत असें आढळून आलें. बंगाल सरकारनें नफेबाजीविरुद्ध वटहुकुमाप्रमाणें ही कारवाई केली.

---

### गुजरातमधील नदीखोरें योजना

मुंबई राज्यांतील सर्वांत उत्तरेकडील बानसकंठा जिल्ह्यांत ९ कोटि रुपये खर्च येणारी एक नदीखोरें योजना हातीं घेण्यांत आली आहे. योजनेचा पायाभरणी समारंभ नुकताच झाला. ह्या योजनेमुळें एक लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. योजनेंत बांधण्यांत येणारें धरण हें मुंबई राज्यांतील सर्वांत उंच धरण होईल. धरणाचा मध्यभाग पक्का बांधण्यांत येणार असून त्याच्या बाजू मातीच्या साह्यानें बांधण्यांत येतील. मध्यभागाची लांबी ८५५ फूट होईल व मातीच्या भागांची लांबी सुमारें तीन मैल होईल.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि विटें मर्चंट्स्

### को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटें

( जि. द. सातारा )

दि. ३०–६–५८ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें भाग भांडवल | रु. १,१२,९८० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. १,०८,९८५ |
| ठेवी | रु. ८,८५,४५७ |
| खेळतें भांडवल | रु. ११,८४,४७२ |

ठेवींवरील व्याजाचे दर :—

५० न. पै. पासून ४·५० न. पै. पर्यंत.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवींवरील व्याजाचे दराबाबत ऑफिसमध्यें समक्ष चौकशी करावी.

गो. रा. ब्रह्मनाळकर, एल्एल्. बी., मॅनेजर.

रा. ब. दिवटे, चेअरमन

## दि मोर्शी को-ऑ. सेंट्रल बँक लिमिटेड

( स्थापना १९१८ )

— जमलेलें भांडवल —

| | |
|---|---|
| ( १ ) मुदतीच्या व इतर ठेवी | रु. २,३७,४४६ |
| ( २ ) बचत व इतर फंड्स् | रु. १,५७,४३४ |
| ( ३ ) हिश्यांचें भांडवल | रु. ३,०२,०६५ |
| ( ४ ) प्रांतिक बँकेचें कर्ज | रु. ८,६८,३०३ |
| एकूण भांडवल | रु. १५,६५,२४८ |

— मुदतीचे ठेवींवरील व्याजाचे दर —

| | | |
|---|---|---|
| एक वर्षांकरितां | द. सा. द. शें. | ३ = ०० रु. |
| दोन | ,, ,, | ३ = ५० रु. |
| तीन | ,, ,, | ३ = ७५ रु. |
| चार | ,, ,, | ४ = ०० रु. |
| पांच व अधिक वर्षांकरितां | | ४ = २५ रु. |

— सेव्हिंग्ज डिपॉझिट्स —

या ठेवीवर द. सा. द. शें. २ = ५० रु.

विशेष माहितीसाठी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

रु. गो. कानफाडे, ऑनररी सेक्रेटरी.

# मेट्रिक वजन-मापांचीं नांवें

## भारतीय कां नाहींत ?

मेट्रिक पद्धतीचा अवलंब करण्यांत आल्यापासून ग्रॅम, किलोग्रॅम, मीटर, किलोमीटर व लिटर यांसारख्या नव्या मेट्रिक वजनामापांच्या नांवांसंबंधीं एक प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो. तो असा कीं, आपण ही पद्धति स्वीकारली असली तरी या वजनामापांची आंतरराष्ट्रीय नामावलि आपण जशीच्या तशी अनुसरली पाहिजेच का ? या नांवांचें संपूर्णपणें वा कांहीं बाबतींत भारतीयीकरण केल्यानें ही पद्धत अधिक सोपी होऊन अधिक सुलभपणें आपल्या पचनीं पडणार नाहीं का ? या प्रश्नाचा आपण व्यावहारिक दृष्टिकोणांतून विचार करूं या. सुरुवातीलाच ही गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं, मीटर, लिटर व ग्रॅम यांसारख्या मेट्रिक वजनामापांचीं भारतीय सममूल्यें अस्तित्वांत नाहींत. प्रश्न केवळ नांवाचाच आहे. या नांवांचें भारतीयीकरण करावयाचें म्हणजे निश्चितपणें काय करावें अशी कल्पना आहे ? एक अर्थ असा होईल कीं, मीटर, ग्रॅम, लिटर, इत्यादि वजनां-मापांसाठी हिंदी नांवें शोधून काढणें. परंतु सध्यां तरी या नांवांची भारतीय नांवें प्रचलित नाहींत. शास्त्रीय शब्दप्रयोगांसाठी हिंदी संज्ञा शोधून काढण्याच्या कार्यक्रमानुसार कांहीं नवीन संज्ञा संस्कृत भाषेंतून तयार करण्यांत आल्या असल्या तरी सर्वसाधारण जनतेला या संज्ञा मेट्रिक पद्धतींतील नांवापेक्षांहि कदाचित् अधिक चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे.

भारतांतील कांहीं लोकांना तरी आतां मीटर, ग्रॅम, हे शब्द-प्रयोग कळतात. दुसरी गोष्ट अशी कीं, या नांवांसाठी संस्कृत संज्ञा तयार केल्यानंतर निरनिराळ्या भाषांत त्यावर वाद माजतील. तेव्हां हा मार्ग अनुसरण्यांत कांहींच लभ्यांश नाहीं. यावर आतां प्रश्न विचारण्यांत येतो की, दशमान नाणें पद्धतींत ज्याप्रमाणें पैसा हा शब्द तसाच ठेवण्यांत आला, त्याप्रमाणें शेर, मण व गज हे शब्द तसेच ठेवून नवीन वजनामापासाठी नया शेर, नया मण, नया गज, इत्यादि शब्दप्रयोग कां करूं नयेत ? या प्रश्नाचा आपण विचार करूं या.

प्रथम वजनांचा विचार करूं. सध्यां भारतांत वजनांच्या बाबतींत टन–हंड्रेडवेट–पौंड अशी मालिका आहे. त्याचप्रमाणें मण––शेर—छटाक अशीहि मालिका आहे. त्याचप्रमाणें दक्षिणेंत खंडी—रत्तल—पिसा—शेर—पालम अशीहि वजनमालिका आहे. देशाच्या अनेक भागांत आपणांस अपरिचित अशीं अनेक वजनेंहि आहेत.

शेराचें मूल्यहि सगळीकडे सारखें नाहीं, इतकेंच नव्हे तर एकाच ठिकाणीं निरनिराळ्या वस्तूंसाठींहि शेराचें मूल्य सारखें नाहीं. तर मग या वजनांपैकी किलोग्रॅमऐवजीं कोठल्या शेराचा वजन म्हणून स्वीकार करावयाचा ?

किलोग्रॅम या वजनाला जर आपण नया शेर असें म्हटलें तर निरनिराळ्या मूल्यांचे शेर वापरणाऱ्यांच्या मनांत गोंधळ नाहीं का उडणार ? किलोग्रॅम हा शब्दप्रयोग पचनीं पाडून घेतांना सुरुवातीला येणाऱ्या अडचणीपेक्षा हा गोंधळ अधिक होण्याचा संभव नाहीं का ? या वजनांचीं भारतीय नांवें तशींच ठेवण्याचा आपण प्रयत्न केल्यास मेट्रिक पद्धतीमुळें जे लाभ अपेक्षित आहेत ते प्रत्यक्षांत आपण गमावणार नाहीं का ? नाण्यांच्या

— फलटण तालुक्यासाठी मध्यवर्ती बँक —

**श्रीलक्ष्मी सं. को. बँक लि.**

**फलटण**

( स्थापना १९२६ )

| | |
|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. ५,००,००० |
| भागांचें वसूल भांडवल | रु. १,९०,००० |
| राज्य सरकारचें भाग भांडवल | रु. १,५०,००० |
| स्वतःचे निधी | रु. ३,१०,००० |
| खेळतें भांडवल | रु. २७,००,००० |

★ ही बँक ★

— सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारते.
— बँकिंगचा सर्व प्रकारचा व्यवहार करते.
— प्रामुख्यानें शेतकी कर्जाचा पुरवठा करते.
— सभासद, संस्था व व्यक्ति यांची शेतकीविषयक गरजांची व्यवस्था करून देते.

ही "दीपावली" व "नूतन संवत्सर" सर्वांना सुखसमृद्धीचें व उत्कर्षाचें जावो, असें इच्छितो.

अधिक माहितीसाठीं रूबरू समक्ष भेटा अगर लिहा.

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक — मु. रा. भोईटे, B. A., LL. B., चेअरमन.

**रेखा फर्निशर्स**

३२४, सदाशिव, पुणें.

(टेलिफोन नं ६५१३)

**उत्कृष्ट फर्निचरसाठी सुप्रसिद्ध; घरांची व दुकानांची शोभा वाढविणें हें आमचें वैशिष्ट्य आहे.**

भारतांत गेलीं ८० वर्षे जनतेसमोर असलेलें 'नैसर्गिक' जीवनसत्त्वें असलेलें

सॅन्डो ब्रॅन्ड

**शुद्ध व साजूक तूप**

अवश्य वापरा.

एजंटः—म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, पुणें २.

फोन नं. ६४३०

बाबतींत जें शक्य झालें त्याची वजनामापांच्या बाबतींतील तुलना अशी गैरलागू होते.

१ ग्रॅम ऐवजीं १ नया मासा, १ डिकॅग्रॅम ऐवजीं १ नया तोळा, १ हॅक्टॉग्रॅम ऐवजीं १ नया छटाक, १ किलोग्रॅम ऐवजीं १ नया मण, अशा संज्ञा देण्याची सूचना करण्यांत आली आहे. परंतु वर म्हटल्याप्रमाणें मूळ वजनांचीं मूल्यें सारखीं नसल्यामुळें या 'नयाकरणा'नें गोंधळांत अधिकच भर नाहीं का पडणार ?

मेट्रिक पद्धतीचा एक मुख्य फायदा असा आहे कीं ग्रॅम, मीटर व लिटर या पायाभूत वजनामापांनंतरचीं वजनेंमापें त्यांचे गुणक वा उपगुणक आहेत. उदा० १ किलोग्रॅम = १००० ग्रॅम, १ हेक्टोग्रॅम = १०० ग्रॅम, १ डिकॅग्रॅम = १० ग्रॅम. १ ग्रॅमनंतर १ डेसिग्रॅम = १/१० ग्रॅम, १ सेंटिग्रॅम = १/१०० ग्रॅम व १ मिलिग्रॅम = १/१००० ग्रॅम. वजनांत मूलभूत वजन 'ग्रॅम' हें आहे तसेंच राहून त्यास जोडलेल्या पूर्वशब्दावरून त्याचे गुणक वा उपगुणक प्रतीत होतात. वर उल्लेखिलेल्या नांवांचा स्वीकार केल्यास हा लाभ संपूर्णतः निघून जाईल. लांबी मोजण्याच्या व द्रवपदार्थ मोजण्याच्या वजनामापांसहि हीच गोष्ट लागू आहे.

### आंतरराष्ट्रीय संज्ञा

यांत खरा मुद्दा असा आहे कीं, एकदा मेट्रिक पद्धत स्वीकारल्यानंतर त्याची आंतरराष्ट्रीय संज्ञावली अनुसरण्यांत अतिशय फायदा आहे. आपले शास्त्रज्ञ, स्थापत्यविशारद व तंत्रज्ञ कोठल्याहि कामासाठी ही आंतरराष्ट्रीय संज्ञावलीच वापरणार; त्याशिवाय त्यांचें काम भागणार नाहीं. शाळा-कॉलेजांतील विद्यार्थीहि त्याचाच उपयोग करतील आणि म्हणून शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ इ. साठी एक व जनतेसाठी एक, अशा दोन संज्ञावली आपण तयार केल्यास गोंधळच होईल.

याबाबतींत सगळ्यांत मोठी अडचण व अधिक गुंतागुंतीचा प्रश्न म्हटला म्हणजे नव्या वजनामापांची कल्पना स्वीकारतांना व तिचा प्रत्यक्षांत अंगीकार करतांना येणाऱ्या अडचणी. हा बदल करतांना नांवांना विशेष महत्त्व नाहीं. यासंबंधांत लोक असें म्हणतात कीं, नव्या वजनामापांसाठी परकीय अशा अपरिचित नांवांऐवजीं परिचित अशीं नांवें घेतल्यास त्यांचें लोकांस अधिक लवकर आकलन होईल. परंतु, वर स्पष्ट करून दाखविल्याप्रमाणें तसें केल्यास गोंधळांत अधिकच भर पडेल.

याउलट, बहुसंख्य जनतेचा विचार करतां, मेट्रिक पद्धतीनुसार ग्रॅम, किलोग्रॅम, क्विंटोल, सेंटीमीटर, मीटर, किलोमीटर व लिटर या साऱ्या नवीन संज्ञांचीच माहिती करून घ्यावी लागेल. दैनंदिन व्यवहारांत केवळ याच वजनामापांचा संबंध येतो. ही संज्ञावली पचनीं पडणें कठीण आहे, असें म्हणतां येईल का ? मेट्रिक पद्धतींचा संपूर्णपणें अवलंब करण्यासाठी ठरविण्यांत आलेल्या ३१ डिसेंबर, १९६६ या वेळेपूर्वी कितीतरी अगोदर हीं नांवें जनतेच्या तोंडीं सहजासहजीं बसून जातील.

---

### गरजू कर्जदारानें बँकेचीहि गरज भागविली पाहिजे

तुम्हांला पैशाची गरज आहे आणि ते तुम्ही स्वतःवर खर्च करूं इच्छिता, म्हणून केवळ बँक तुम्हांला कर्ज देणार नाहीं. तुम्ही बँकेचीहि गरज भागवूं शकला, तरच बँक कर्ज देईल. ती गरज म्हणजे कर्जाला तारण हवें, कर्जाचा विनियोग योग्य प्रकारें केला जाईल, व्याज वक्तशीर दिलें जाईल आणि ठरल्यावेळीं मुद्दल फेडलें जाईल, ह्या बँकेच्या गरजा पुऱ्या पाडण्याचें बँकरला पटवून द्या, म्हणजे कर्ज मिळेल.

### खाणींच्या विकासासाठी तज्ज्ञांची जरुरी

हिंदच्या कोल कौन्सिलच्या उत्पादन कमिटीनें खाणींच्या धंद्याच्या विकासासाठी लागणाऱ्या तज्ज्ञांच्या प्रश्नाचा विचार केला आहे. कमिटीनें केलेल्या अंदाजाप्रमाणें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतामधील खाणी चालविण्यासाठी आणखी २,००० खाणी-मॅनेजरांची जरुरी लागेल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १० कोटी टन कोळशाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ठेवण्यांत येणार आहे. त्या आधारावर वरील अंदाज केला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या सालांत कोळशाचें जें ४ कोटी टन उत्पादन अधिक करण्यांत यावयाचें आहे, तें ह्याच अवधींत नव्यानें चालू करण्यांत येणाऱ्या १२० नव्या खाणींतून व्हावयाचें आहे. कमिटीच्या अंदाजाप्रमाणें ह्या काळांत ४,१२० एंजिनिअरिंग कामगार लागतील व ४७० पदवीधर एंजिनिअर्स लागतील. खाणी खोदण्यासाठी १५० ड्रिल्स लागतील, आणि ती चालविण्यासाठीं १३२ भूगर्भशास्त्रज्ञ व २,०७० ड्रिलिंग इंजिनिअर्स लागतील, कोळशाच्या खाणीशिवाय इतर धातूंच्या खाणी चालविण्यासाठी ७५० खाणी-मॅनेजरांची जरूर लागेल व त्याशिवाय खाणींतील. निरनिराळीं कामें करण्यासाठी ७ हजारांवर कुशल कामगार लागतील. हे कामगार शिकवून तयार करण्यासाठी १४ केंद्रें उघडण्याची शिफारस कमिटीनें केली आहे. नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें अशा प्रकारचीं चार केंद्रें ह्यापूर्वीच उघडलीं आहेत. ह्या केंद्रांतून सध्यां ५९२ कामगारांना शिक्षण देण्यांत येत आहे. १९५९ मध्यें त्यांचा अभ्यासक्रम पुरा होईल.

---

### खनिज तेलाच्या शोधाचे आणखी यत्न

मध्यवर्ती सरकारच्या खाणी व तेल खात्याचे मंत्री श्री. के. डी. मालवीय हे गेल्या महिन्यांत युरोपमधील आठ आठवड्यांचा आपला दौरा संपवून परतले. आपल्या दौऱ्यांत त्यांनीं निरनिराळ्या सरकारांच्या प्रतिनिधींशीं खनिज तेलाच्या शोधाविषयीं व शुद्धीकरणाच्या कारखान्यांविषयीं चर्चा केली. श्री. मालवीय ह्यांनीं रुमेनिआच्या सरकारशीं एक करारहि केला आहे. आसाममध्यें गोहाटीजवळ तेल शुद्ध करण्याचा एक कारखाना उभारण्यासंबंधीचा हा करार आहे. संकल्पित कारखान्यांत दरसाल ७,५०,००० टन तेल शुद्ध करण्याची व्यवस्था होणार आहे. रुमेनिआकडून कारखान्याच्या उभारणीसंबंधीं सर्व प्रकारचें सहकार्य मिळणार आहे. रुमेनिआप्रमाणें इटलीचें सरकारहि आसाममधील तेलाच्या शुद्धीकरणाच्या आणखी एका कारखान्यास मदत करण्यास तयार आहे. बिहारमधील बरौनी येथें हा कारखाना काढण्यांत येणार आहे. इटलीप्रमाणेंच ऑस्ट्रिआहि ह्याबाबतींत भारतास मदत करण्यास तयार आहे. रुमेनिआशीं भारत सरकारनें केलेल्या कराराच्या अटी अशा आहेत कीं, गोहाटी येथें उभारण्यांत येणारा कारखाना सर्वांत कमी खर्चांत उभारण्यांत येईल. तेलाच्या शुद्धीकरणाच्या कारखान्याखेरीज, भारताला खोदकामाच्या यंत्रसामुग्रीची आणखी गरज आहे. त्याशिवाय आसाममधील तेलाचें संशोधन मोठ्या प्रमाणावर करतां येणार नाहीं. सध्यां रुमेनिआनें पुरविलेली खोदकामाची यंत्रसामुग्री ज्वालामुखी येथें वापरण्यांत येत आहे. गोहाटी येथें उभारण्यांत येणारा कारखाना प्रत्यक्ष [illegible]लाच्या विहिरींशीं १६ इंची नळानें जोडण्यांत येणार आहे.

## नवजात लोकशाह्यांचे डोळे उघडविणारें अपयश !

### परवां ब्रह्मदेश, काल पाकिस्तान...आणि आज सयाम !

स्वातंत्र्यलढ्यांतील जखमा संभाळीत, आर्थिक दैन्य दूर करूं पाहणाऱ्या या आशियाई लोकशाह्या लागोपाठ अयशस्वी होतांना पाहून मन चरकल्याशिवाय राहात नाहीं.

लोकशाही पद्धतीनें आर्थिक प्रगति साधण्याचा भारताचा निर्धार
किती महत्त्वाचा आहे,
अखंड सावधता आणि निरंतर श्रमशीलता यांची आज किती
आवश्यकता आहे,
याची अशा क्षणीं चटका बसावा तशी जाणीव होते.

मानवी मूल्यांसाठी लोकशाही नियोजन आणि
लोकशाही नियोजनासाठी सहकारी जीवनपद्धति
अशी ही अपरिहार्य सांखळी आहे

सहकारी जीवनपद्धतीसाठी गेलीं ४१ वर्षें अविश्रांत श्रमणारें

' पुणें जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केन्द्रस्थान, '

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें २.

★ वीस शाखा ★ ठेवी सव्वादोन कोटींचे वर ★ खेळतें भांडवल तीन कोटींचे वर ★ साडेपांच टक्के व्याज देणाऱ्या ठेवरोख्यांची आकर्षक योजना ★ मजबूत व स्वस्त ठेवघरें ( Safe Deposit Vaults )

वा. ग. अळतेकर,
कार्यकारी संचालक.

### आशियांतील लोकशाहीचा आशादीप......संपन्न सात्त्विक भारत !

## महाराष्ट्र भुवन

मुजावर गल्ली—बेळगांव

महाराष्ट्राचें व कर्नाटकचें अत्यंत आवडतें
व सुखसोईनें युक्त
लॉजिंग-बोर्डिंग हाऊस.

## कॅम्फीन




कॅम्फीन

### इन्फ्ल्युएन्झानें

होणाऱ्या शारीरिक वेदनांवर, तसेंच सर्दीचा ताप, डोकें व दांतदुखी यांवर ए. पी सी. आणि कॅम्फर मोनोब्रोम असलेले वापरा.
पॅकेट किं. १० नये पैसे. ( १२ डझन पॅकेट किं. रु. १२ खर्च निराळा ) बनविणार :—स्टार कंपनी, बेळगांव.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

तूप होवोनि माघौतें । दूधपण नयेचि निरुतें ॥

( श्री ज्ञानेश्वर महाराज )

**कै. आगाशे यांच्या दीर्घ प्रयत्नानें १००० टनी फॅक्टरी सिद्ध झाली.**

— आतां प्रगतीच —

दसऱ्याच्या सुमुहूर्तावर

**नवा हंगाम सुरू झाला आहे.**

**आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना**
**ही दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !**

के. त्र्यं. चांफेकर,
B. E., A. M. I. E.,
मॅनेजर.

शं. ल. लिमये,
B. Sc., LL. B., वकील.
अध्यक्ष.

शेतकरी हा शेतांत राबणारा मजूर राहिला नसून स्वकर्तबगारीवर —

**तो शेतकरी कारखानदार बनूं शकतो**

हें स्वकृतीनें सिद्ध करून दाखविणारी शेतकऱ्यांची व शेतकऱ्यांनीं स्वतःकडे कारभार ठेवलेली

**— भारतांतील आदर्श संस्था —**

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड

माळीनगर ] स्थापना सन १९३२ [ जि. सोलापूर

**रौप्य-महोत्सवाच्या या वर्षीं**

शेतकरी, कामगार, समव्यवसायी व आमचे ग्राहक व्यापारी हितचिंतक या सर्वांचें

**दिवाळीनिमित्त अभीष्टचिंतन करीत आहे**

संचालक मंडळ

[१] रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके, चेअरमन
[२] श्री. शंकरराव भाऊराव राऊत
[३] श्री. मारुतीराव खंडुजी पांढरे
[४] श्री. भगवंतराव मेनूजी गिरमे
[५] श्री. रघुनाथराव सोपानराव इनामके
[६] श्री. शंकरराव बाळकुजी इनामके
[७] श्री. कृष्णाजी लक्ष्मणराव गिरमे
[८] श्री. भगवंतराव मारुतीराव जाधव
[९] श्री. जगन्नाथ गणपतराव रासकर
[१०] श्री. पंढरीनाथ हणमंतराव गिरमे

मॅनेजिंग डायरेक्टर
श्री. हरीभाऊ बळवंतराव गिरमे

मॅनेजर
श्री. जी. एस्. कारभारी, एम. ए., एलएल. बी.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.